सोलापूर तरुण भारत
आसमंत



# विकासाच्या पुढच्या टप्प्याची पायाभरणी

लक्ष्यवेध

हरदीप सिंह पुरी

**आज देशाची अर्थव्यवस्था उत्तुंग झेप घेताना दिसते. जपानला मागे टाकत भारत जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये चौथ्या स्थानी आला. मात्र, या प्रवासामागे केंद्र सरकारची सातत्याने सुरू असलेली विकासाची तपश्चर्या आहे. २०२५ या एका वर्षात केंद्र सरकारने सुधारणांसाठी घेतलेल्या विविध निर्णयांचा हा आढावा...**

२०२५ वर्ष सरत असताना मोठ्या मथळ्यांच्या बातम्या आपल्या सहज नजरेस पडल्या. पण, त्याचवेळी केंद्र सरकारचे शांतपणे, सातत्यपूर्णतेने सुरु असलेल्या कामाकडे मात्र आपले सहज दुर्लक्ष झाले. खरेतर या कामांनाच मला 'रिफॉर्म एक्सप्रेस-२०२५' अर्थात, 'सुधारणांची एक्सप्रेस' असे म्हणावेसे वाटते.

भारताने आपल्या सकल देशांतर्गत उत्पादनाअंतर्गत सुमारे ४.१ ट्रिलियन अमेरिकी डॉलरचा टप्पा ओलांडला असून, आता जपानला मागे टाकून भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनला. 'स्टॅण्डर्ड अ‍ॅण्ड पुअर्स'ने अलीकडेच तब्बल १८ वर्षांनंतर भारताचे सार्वभौमत्व मानांकन सुधारून ते 'बीबीबी' असे केले. हा बदल म्हणजे, भारताच्या अर्थव्यवस्थेला शाश्वतता प्राप्त झाल्याचे द्योतक आहे. आजच्या अनिश्चिततेच्या जगात, राजकीय उलथापालथ ही बाब तशी सामान्यच. मात्र, या परिस्थितीतच भारतातील स्थिर नेतृत्वामुळे सुधारणांना विश्वासार्हतेचे स्वरूप लाभले. याच विश्वासार्ह बदलामुळे खासगी क्षेत्रातील सावधगिरीच्या भावनेचे रूपांतर, गुंतवणुकीत होऊ लागले आहे. व्यापार आणि जकातविषयक सर्वसाधारण करार आणि जागतिक व्यापार संघटनेच्या व्यवस्थेपासून ते बहुपक्षीय मंचांपर्यंतच्या वाटाघाटींच्या टेबलांवरच्या माझ्या आजवरच्या अनुभवात मी हे पाहिले आहे की, नियमांच्या माध्यमातून जितके प्रोत्साहनपर लाभ निर्माण होतात, त्याच प्रमाणावर त्यांची परिणाम कारता अवलंबून असते. ज्यावेळी तुमची कार्यपद्धती पारदर्शक नसते, तेव्हा मात्र स्वेच्छाधिकाराची व्याप्ती वाढत जाते आणि मग अगदी चांगल्या हेतूने आखलेली धोरणेदेखील उद्योजकतेला प्रोत्साहन देऊ शकत नाहीत. उलटपक्षी ते त्यांच्यातला उत्साह कमी करतात. याउलट, जेव्हा कार्यपद्धती स्वच्छ आणि कालबद्धतेला अनुसरून असते, त्यावेळेस मात्र स्पर्धात्मकतेचा विस्तारच होतो. गुंतवणुकीसंबंधीच्या योजनांची अंमलबजावणी होते आणि स्वाभाविकपणे त्यापाठोपाठ रोजगारनिर्मितीही. या पार्श्वभूमीवर पाहिले तर २०२४-२५ या कालावधीदरम्यान, भारताची एकूण निर्यात ८२५.२५ अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचली असून, त्यात सहा टक्क्यांपेक्षा जास्त वार्षिक वाढही दिसून आली. या वाढत्या व्यापाराला हाताळण्यासाठी केंद्र सरकारने निर्यातदारांसाठी 'एक खिडकी' डिजिटल सुविधा म्हणून 'ट्रेड कनेक्ट ई-प्लॅटफॉर्म'सारखी, विविध डिजिटल साधनेही उपलब्ध करून दिली. त्याचबरोबर उद्योजकांना बाजारपेठांविषयी ताजी माहिती मिळावी, याकरता 'ट्रेड इंटेलिजन्स ण्ड नालिटिक्स पोर्टल'सुद्धा सुरू करण्यात आले.

जुलै २०२५ मध्ये भारत आणि ब्रिटनमध्ये सर्वंकष आर्थिक आणि व्यापार करार झाला. यामुळे भारतीय निर्यातदारांसाठी मोठ्या प्रमाणावर शुल्कमुक्त प्रवेशाची तरतूद असलेले, तसेच सेवा आणि कुशल मनुष्यबळाच्या थेट आदान-प्रदानासाठीचे एक मजबूत व्यासपीठ उपलब्ध झाले. डिसेंबर २०२५मध्ये भारताने ओमानबरोबरदेखील आर्थिक भागीदारी करार केला. या करारामुळेही वस्तु, सेवा आणि गुंतवणुकीसाठीच्या धोरणात्मक आर्थिक कॉरिडोरला बळकटी मिळाली. अगदी अलीकडेच भारताने न्यूझीलंडसोबतच्या 'मुक्त व्यापार करारा'च्या वाटाघाटीदेखील पूर्ण केल्या आहेत. यामुळे उच्च मूल्य असलेल्या बाजारपेठांमधील भारताचे अस्तित्व विस्तारले आहे, हे आपण समजून घ्यायला हवे.

भारताच्या 'स्टार्टअप' परिक्षेत्राचा विचार केला, तर आता दोन लाखांपेक्षा जास्त सरकार मान्यताप्राप्त 'स्टार्टअप्स'च्या समावेशाने हे क्षेत्र मोठ्या प्रम ाणात विस्तारले आहे. यातूनच २१ लाखांपेक्षा जास्त रोजगारांचीही निर्मितीही झाली. 'ई-वाणिज्य' व्यवस्थेसाठी उपलब्ध करून दिलेल्या 'ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स' या पोर्टलवरून, ३२६ दशलक्षापेक्षा जास्त मागण्यांवर प्रक्रिया करण्यात आली, तर दररोज सरासरी ५.९ लाखांपेक्षा जास्त व्यवहारही झाले. इतकेच नाही, तर 'गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस' अर्थात 'जेम' पोर्टलवरील एकूण व्यवहारांचे मूल्य, १६.४१ लाख कोटींच्या घरात पोहचले आहे. महत्त्वाचे म्हणजे याअंतर्गत ११ लाख सूक्ष्म आणि लघू उद्योगांकडे, ७.३५ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक मूल्याच्या मागण्यांची नोंद झाली आहे. दुसरीकडे जागतिक नवोन्मेष निर्देशांकातही भारताचे स्थान उंचावले आहे. या निर्देशाअंतर्गत भारताने जगभरातील १३९ देशांमध्ये ३८वा क्रमांक गाठला आहे. व्यवसाय सुलभतेसाठी सरकारने घेतलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ४७ हजारापेक्षा जास्त अनुपालने कमी झाली असून, चार हजार, ४५८ कायदेशीर तरतुदींचे गुन्हेगारी स्वरूपही आता रद्द करण्यात आले आहे. सरकारने उपलब्ध करून दिलेल्या 'राष्ट्रीय एक खिडकी व्यवस्थे'च्या माध्यम ातून, मंजुरीसाठी आलेल्या ८.२९ लाखांपेक्षा जास्त विनंतीवरच्या प्रक्रिया पूर्ण केल्या गेल्या आहेत. या सगळ्याच्या जोडीला, पायाभूत सुविधांच्या नियोजनातही महत्त्वाचे बदल केल्याचेही आपल्याला समजून घ्यावे लागेल. त्यादृष्टीनेच सरकारने 'पीएम गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन' आता खासगी क्षेत्रासाठीही खुला केला. त्याअंतर्गतच आता 'प्रोजेक्ट मॉनिटरिंग ग्रुप पोर्टल'वर ७६ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याचे, तीन हजारपेक्षा जास्त प्रकल्प जोडले गेले आहेत.

'विश्वासावर आधारित प्रशासन' हेच विद्यमान केंद्र सरकारचे धोरण आहे. त्यानुसारच, सरकारने संसदेत 'निरसन आणि दुरुस्ती विधेयक-२०२५' मांडले आणि ते मंजूरही झाले. हे विधेयक संमत झाल्याने, ७१ कालबाह्य कायदे रद्द झाले. दुसरीकडे जिल्हास्तरावरील सुधारणा आराखड्यांच्या माध्यमातून, व्यवसाय सुलभता आता थेट उद्योजकांपर्यंत पोहोचली आहे. स्थानिक प्रशासनाला अधिक प्रतिसादात्मक, अंदाज बांधता येण्याजोगे आणि उत्तरदायी स्वरूप मिळवून देण्याच्या उद्देशाने, या आराखड्यांमध्ये 'जिल्हास्तरीय व्यवसाय सुधारणा कृती आराखडा-२०२५'चा अंतर्भाव करण्यात आला आहे. खरेतर ज्या देशांमध्ये नोकऱ्यांचे औपचारिकीकरण आणि सामाजिक सुरक्षेची व्याप्ती वाढवण्याची गरज असते, अशा देशांकरता मोठ्या प्रमाणावरील उत्पादन आणि सेवा अर्थव्यवस्थेसाठी आधुनिक कामगारव्यवस्था महत्त्वाची असते. भारताने ही गरज ओळखून दि. २१ नोव्हेंबर २०२५ पासून, चार कामगार संहिता लागू केल्या. या चार संहितांतर्गत, भारताने केंद्र सरकारच्या २९ कामगार कायद्यांचे वेतन, औद्योगिक संबंध, सामाजिक सुरक्षा आणि कामाच्या ठिकाणच्या सुरक्षिततेशी संबंधित चार सुलभ कायद्यांमध्ये एकात्मिकरण घडवून आणले. 'प्रतिभूती' कायद्याला आधुनिक स्वरूप मिळवून देण्यासाठी, तसेच 'भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळा'च्या (सेबी) तपास आणि अंमलबजावणी क्षमतेला बळकटी देण्यासाठी, 'प्रतिभूती बाजापेठ संहिता विधेयक'ही सरकारने आणले. या विधेयकाअंतर्गत बाजारापेठांसाठीची विशेष न्यायालये, नियामकांसोबत माहितीच्या देवाणघेवाणीचा विस्तार आणि तक्रारींच्या निश्चित कालमर्यादेतील निवारणासंबंधीच्या तरतुदींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. खरेतर आज देशाच्या अर्थव्यवस्थेत किरकोळ गुंतवणूकदारांचा सहभाग वाढला असून, भारत जगभरातील वैविध्यपूर्ण गुंतवणूकदारांसाठीचे आकर्षण केंद्र ठरू लागला आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकार नियमनाच्या बाबतीत स्पष्टता आणण्यासाठी करत असलेल्या या उपाययोजना, राष्ट्रीय स्पर्धात्मकतेचाच आहेत. याची फलनिष्पत्ती गुंतवणुकीचा ओघ कायम राखण्यात झाली आहे.

खरेतर कोणतेही सरकार सुधारणांपोटी जो खर्च करते, त्याचे खरे प्रतिबिंब हे तिथल्या व्यावसायिक वाहतूक अर्थात, 'लॉजिस्टिक' व्यवस्थेत उमटलेले दिसते. त्यादृष्टीनेच सरकारनेही २०२५ या वर्षात व्यापाराचा कणा असलेल्या सागरी क्षेत्राला आधुनिक करण्यासाठी, मोठा पुढाकार घेतल्याचे आपल्याला सहज दिसून येईल. भारताच्या व्यापाराचे प्रमाण पाहिले तर सुमारे (पान ४ वर)

वेध

अनिल आठल्ये कर्नल (नि.)

# जग अस्थिरतेच्या मार्गावर

दोन वर्षांपूर्वी रशियाच्या दौऱ्यावर असताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतिन यांना सध्याचे युग युद्धाचे नसल्याचा सल्ला दिला होता. तेव्हा त्यांचा रोख रशियाने काही महिन्यांपूर्वीच युक्रेनवर केलेल्या हल्ल्याच्या दिशेने होता. आता एका दृष्टिकोनातून पाहिले तर पंतप्रधानांचे हे भाकीत चुकीचे म्हणता येईल. कारण गेल्या दोन-चार वर्षांपासून अनेक देशांमध्ये सशस्त्र हल्ले आणि चकमकी सुरू आहेत. म्हणजेच सद्यस्थितीत पंतप्रधानांना अभिप्रेत असणारी शांतता कोठेही दिसत नाही. अर्थात असे असले, तरी दुसऱ्या दृष्टिकोनातून पाहता हे सत्यही समोर येते की, या युगात लष्करी सामर्थ्याद्वारे कोणतेही प्रश्न सुटणारही नाहीत. त्यामुळेच लष्करी बळाचा वापर करण्याचा पर्याय कोणत्याही देशाने अवलंबू नये.

वर्षाच्या अखेरीस दिसणारी जागतिक परिस्थिती पाहिली तर हेच चित्र स्पष्ट दिसते. गेल्या तीन वर्षांपासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू आहे. परंतु, त्यात कोणत्याही एका बाजूला निर्भेळ यश प्राप्त झालेले नाही. मध्यपूर्वेवर नजर टाकली तर दोन वर्षांपूर्वी 'हमास' या संघटनेने इस्रायलवर अचानक हल्ला केला होता. या अचानक झालेल्या हल्ल्यात सुरुवातीच्या एक-दोन दिवसांमध्ये इस्रायलचे हजारो नागरिक मारले गेले. नागरिकांना शेकडोंच्या संख्येने बंधक बनवून हमासने गाझामध्ये डांबून ठेवले. परंतु, सुरुवातीच्या या हल्ल्यातून सावरल्यानंतर इस्रायलने प्रत्युत्तरादाखल संपूर्ण गाझावर भयंकर हवाई हल्ले करून तेथील अनेक इमारती, आरोग्य केंद्रे, यंत्रणा जवळपास भुईसपाट केल्या. परिणामस्वरूप, लाखो पॅलेस्टिनी लोकांना घरदार सोडून उघड्यावर राहावे लागले. या हल्ल्यात ३०-४० हजार नागरिकांना प्राण गमवावे लागले. परंतु, युक्रेन-रशिया युद्धाप्रमाणेच या संघर्षात कोणत्याही एका बाजूला निर्णायक विजय मिळालेला नाही. मनुष्यबळाची एवढी हानी होऊनही हमास ही संघटना आधी होती तेवढीच मजबूत आहे. पॅलेस्टिनी नागरिकांच्या नरसंहारामुळे जगभर जनमत इस्रायलच्या विरोधात झाले. वर्षअखेरीस या घटनेकडे तटस्थपणे पाहिले असता स्पष्ट दिसते की, हमास आणि इस्रायल दोघांचेही युद्धाबद्दलचे आडाखे चुकले आहेत. इस्रायल आणि हमासमधील संघर्ष त्या दोन देशांपुरता मर्यादित न राहता लेबनॉन आणि नंतर इराणपर्यंतही पोहोचला. काही महिन्यांपूर्वी मध्यपूर्वेतील अशांततेचा फायदा घेत अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हवाई हल्ले केले. त्यांचा या हल्ल्यामागील उद्देश इराणची अण्वस्त्रे बनवण्याची क्षम ता नष्ट करणे हा होता. मात्र, आज सहा महिन्यांनंतर अमेरिका या उद्दिष्टात यशस्वी झाल्याचे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. इराणच्या अण्वस्त्र बनवण्याच्या क्षमतेला धक्का अवश्य बसला. परंतु, ती पूर्णपणे नष्ट झाली, असे आज तरी वाटत नाही. या जागतिक पृष्ठभूमीवर मे महिन्यामध्ये भारतात काश्मीरमध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी एक भ्याड हल्ला करून २५ हिंदू पर्यटकांची हत्या केली. या आधी काही वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये उरी आणि पुलवामामध्ये दहशतवादी हल्ले झाले असता भारताने उत्तरादाखल पाकिस्तानवर सर्जिकल स्टाईक आणि हवाई हल्ले केले होते. म्हणजेच पहलगामच्या घटनेनंतर भारत स्वस्थ बसणार नाही, याची पाकिस्तानला जाणीव असायला हवी होती. त्यानुसार पहलगामच्या घटनेनंतर पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी भारताने ७ मे रोजी लाहोर आणि बहावलपूर येथील दहशतवादी मुख्यालयांवर दहशतवादी हल्ले केले.

१९७१च्या युद्धानंतर पाकिस्तानचे मर्मस्थान असणाऱ्या पंजाब प्रांतात प्रथमच अशा प्रकारचे हल्ले झाले. त्यानंतर ९ आणि १० मे रोजी भारताने आपली ब्रह्मोस क्षेपणास्त्रे वापरून पाकिस्तानची एक तृतीयांश हवाई क्षमता नष्ट केली. हे युद्ध आणखी काही काळ सुरू राहिले असते तर पाकिस्तानकडून अण्वस्त्रांचा वापर केला जाण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे भारताने हात आखडता घेऊन पाकिस्तानची शस्त्रसंधीची विनंती मान्य केली. या संदर्भात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाकिस्तान आणि भारत या दोन्ही देशांना अणुयुद्ध होऊ नये असे वाटत असल्याचे दिसते. त्यामुळेच ही शस्त्रसंधी झाली, असे म्हणता येईल.

वर्षअखेरीस या घटनेचे स्मरण होणे अनिवार्य आहे. दुसरीकडे मध्यपूर्वेतील इस्रायलच्या बॉम्बहल्ल्यांमुळे पाश्चिमात्य देशात त्या देशाविरुद्ध जनमत तयार झाले. त्याचा फायदा घेऊन पश्चिमेच्या देशांमध्ये स्थायिक झालेल्या मुसलमानांनी अनेकदा इस्रायलच्या विरोधात निदर्शने केली. मग अशा प्रकारच्या तणावाच्या परिस्थितीतच काही माथेफिरू अतिरेक्यांनी ऑस्ट्रेलियामध्ये आपला सण साजरा करणाऱ्या ज्यू धर्मीयांवर दहशतवादी हल्ला केला. त्यात १५-१६ नागरिक मारले गेले. वर्षाची अखेर होत असताना या घटनेने दहशतवादाचा क्रूर चेहरा नव्याने जगासमोर आणला. थोडक्यात बघायचे, तर सध्या जगभर एक प्रकारे अराजकाची स्थिती निर्माण झाली आहे.

अर्थातच याला काही मूलभूत कारणे आहेत. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघ या दोन लष्करीदृष्ट्या तुल्यबळ शक्ती होत्या. त्यामुळे कोणतेही स्थानिक युद्ध हाताबाहेर जात असल्याचे दिसले तर त्यातून जागतिक अणुयुद्धाची भीती निर्माण होत असे. या दोन शक्तींमध्ये अणुयुद्ध झाल्यास संपूर्ण पृथ्वीवरील जीवन नष्ट (पान ४ वर)



विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

# ग्राफिनचे सिमेंट झाले, विष हे अमृत झाले!

**माझे एक ज्येष्ठ स्नेही विविध प्रकारच्या गंधांचा अभ्यास करतात. त्यांचे असे म्हणणे आहे की, सुगंध आणि दुर्गंध या सापेक्ष कल्पना आहेत. म्हणजे एखादा दुर्गंध जेव्हा अति तीव्र होतो, तेव्हा कदाचित तो सुगंधात परावर्तित होतो किंवा याच्या उलटही होऊ शकते. मी एकदा त्यांच्या घरी गेलो असता, तंबाखू भाजण्याचा तीव्र गंध जाणवला. घरात तंबाखू भाजून मशेरी बनवत आहात का? या माझ्या प्रश्नावर ते हसून म्हणाले की, हा अमूक नावाचा परफ्यूम आहे आणि याला बाजारात खूप मागणी आहे. म्हणजे विष आणि अमृत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत का? जाणून घेऊया–**


तुम्ही 'योगी कथामृत' हे अद्भुत आत्मचरित्र वाचले आहे का? मुकुंदलाल घोष म्हणजेच संन्यास घेतल्यावरचे परमहंस योगानंद यांनी लिहिलेली ही आत्मकथा म्हणजे एक रोमांचक, चित्रचक्षू चमत्कारिक असा वाचनानुभव आहे. स्वामी योगानंद हे बरद्वान इथल्या स्वामी विशुद्धानंद उर्फ गंधबाबा यांना भेटले होते. गंधबाबा समोरचा माणूस म्हणेल तो सुगंध किंवा म्हणेल ती वस्तू नुसत्या इच्छेने निर्माण करीत असत. योगानंदांना (त्यावेळचे मुकुंदलाल) त्यांनी गुलाब आणि चमेलीचे सुगंध निर्माण करून दाखवले; तर त्यांचे मित्र अलकनंद यांच्या इच्छेखातर समोर ठेवलेल्या चपात्यांची मोसंबे करून दाखवली. अलकनंदांनी भीतभीतच ती मोसंबी खाल्ली, पण ती स्वादिष्ट लागली.

स्वामी योगानंद या चमत्कारांचे शास्त्रीय विश्लेषण करताना म्हणतात की, कोणतीही वस्तू ही असंख्य सूक्ष्म अणूंची बनलेली असते. या अणूचे पुन्हा प्रोटॉन, इलेक्ट्रॉन इत्यादी सूक्ष्म भाग आहेत. या सूक्ष्मातिसूक्ष्म अणूंच्या रचनेतील फरकामुळे आपल्याला प्रत्येक वस्तू वेगळी दिसते, कळते, जाणवते. परंतु प्रयोगशाळेत दिसणाऱ्या या सूक्ष्मातिसूक्ष्म भागांपेक्षाही सूक्ष्म असा भाग म्हणजे त्यावस्तूच्या अणूतील प्राणशक्ती. योगानंद या प्राणशक्तीला 'लाईफट्रॉन' असा शब्द वापरतात. हे लाईफट्रॉन पाच प्रकारचे असतात. गंधबाबा किंवा त्यांच्यासारखे सिद्धपुरुष आपल्या योग सामर्थ्याने कोणत्याही वस्तूच्या या लाईफट्रॉनच्या स्पंदनांमध्ये बदल घडवून तिचे बाह्यरूपही बदलू शकतात. नवनाथांच्या कथांमध्ये एक गोष्ट आहे. एकदा सह्यद्रि पर्वताच्या परिसरात तीर्थयात्रा करीत असताना गुरू मच्छिंद्रनाथांना वाटले की, इथे अमुक एक मोठा यज्ञ केला पाहिजे. त्यांनी पट्टशिष्य गोरक्षनाथांना तशी आज्ञा केली.

गोरक्षांनी कमंडलूतले पाणी हातात घेतले नि 'जय अलख निरंजन' म्हणून समोरच्या डोंगरावर शिंपडले. संपूर्ण डोंगर सोन्याचा झाला. त्या सोन्याचा वापर करून मच्छिंद्रांचा यज्ञ पूर्ण झाला.

लाखो लोकांना अन्नदान करण्यात आले. सगळे तृप्त झाल्यावर गोरक्षांनी पुन्हा डोंगरावर अभिमंत्रित पाणी शिंपडले. डोंगर पूर्ववत दगडमातीचा झाला. गुरुशिष्य पुढच्या प्रवासाला निघून गेले. (मी ट्रेकिंगला वगैरे गेलो की, हा डोंगर सापडतो का ते पाहात असतो. तुम्हीही शोधा.) असो. तर, भारतीय सिद्धयोग्यांच्या या योगसिद्धी सामर्थ्याचा सामान्य माणसाला त्याच्या दैनंदिन समस्यांसाठी तसा उपयोग काहीच नाही.

एका नामवंत मराठी लेखकाने एक स्वानुभव लिहिला आहे. बऱ्याच वर्षांनंतर लेखक स्वतःच्या गावी गेला. गावाच्या सुरुवातीलाच त्याच्या एका बालमित्राचे घर होते. मूळ घर साधे मातीचे होते, पण आता लेखक पाहतो, तर मित्राने मातीच्या घराच्या ठिकाणी सिमेंटचे स्लॅबचे आधुनिक घर बांधले होते. उन्हाळ्याचे दिवस होते. लेखक घरात शिरला. जुन्या मित्रांचीकडकडून गळाभेट झाली. गप्पा, चहापाणी झाले. नव्या घराबद्दल बोलताना मित्र म्हणाला, 'सगळ्या शहरी सुखसोयी करून घेतल्या खऱ्या; पण एक मिनिट पंख्याशिवाय राहावत नाही. मातीच्या घरात बाहेर कितीही उन्हाळा असला, तरी आत गारवा वाटायचा. शिमिटाच्या घरात दिवसा काय रात्रीसुद्धा भयंकर उकडते.' आपल्याकडेच नव्हे, तर सर्व जगभर घरबांधणी ही विटा, लाकूड, चुना, रेती, वाळू, माती यांच्यापासूनच होत असे. प्राचीन काळी एकदा ग्रीक लोकांना ज्वालामुखीमधली राख वापरून पाहिली. त्या राख, खडी, माती यांच्या एकत्रीकरणाला त्यांनी शब्द वापरला 'सिमेंटम्.' त्यावरूनच आधुनिक बांधकाम साहित्याचे सिमेंट हे नाव प्रचलित झाले. हा नवा पदार्थ तसा १९ व्या शतकातच प्रथम ब्रिटनमध्ये आणि नंतर अमेरिकेत उत्पादित होऊ लागला.




भारतात १९१४ साली पोरबंदर या ठिकाणी पहिला सिमेंट कारखाना निघाला. पण भारतीय काय किंवा कुठल्याच गवंडी लोकांना घर बांधायला हा पदार्थ अजिबात पसंत पडला नाही. पूल, धरणे, कारखाने वगैरे मोठमोठ्या बांधकामात मात्र सिमेंटचा उपयोग वाढू लागला. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि सिमेंटची खरी उपयुक्तता लोकांना कळली. एकदा हा पदार्थ भिजला की, तो इतका कठीण बनतो की त्याच्यावर बॉम्ब पडला तरी तो तुटत-फुटत नाही. हे लक्षात येताच युद्धसाहित्यामध्ये सिमेंटचा तडाखेबंद वापर सुरू झाला. युद्धात युरोपातले सगळेच देश आणि त्यांची महत्त्वाची शहरे जवळपास पूर्ण उद्ध्वस्त झाली. युद्धानंतर त्यांची पुनर्बांधणी करायला सिमेंट हा तुलनेने स्वस्त आणि कारखान्यांमधून यंत्रांद्वारे 'मास प्रॉडक्शन' होऊ शकणारा पदार्थ हाताशी आला. मग काय?

जगभर सर्वत्र गृहबांधणीची जुनी पद्धत मागे पडून दणादण सिमेंटची घरे बांधली जाऊ लागली. आता ८५ वर्षांनंतर त्याचे दुष्परिणाम जाणवत आहेत. सिमेंट उत्पादन होत असताना आणि वापरल्यावरही त्याच्यामधून फार मोठ्या प्रमाणावर कार्बन उत्सर्जन होत असते. त्यामुळे वातावरणातली उष्णता वाढते. ही कार्बनप्रेरित उष्णता आता इतकी टोकाला जाऊन पोचली आहे की, उत्तर ध्रुवावरचे हिमनद वितळू लागले आहेत. संपूर्ण मानवजात पर्यावरण विनाशाच्या अंतिम टप्प्यावर उभी आहे. मग यावर उपाय काय? माणसाने पुन्हा मातीची घरे बांधून त्यांत राहावे का? कार्बन उत्सर्जन करणाऱ्या मोटारी टाळून बैलगाड्या नि घोडागाड्या वापराव्यात का? नाही.

कालचक्र उलटे फिरवता येणार नाही. आधुनिक विज्ञान याच्या उत्तरादाखल 'ग्राफिन' या एका नव्याच पदार्थाकडे बोट दाखवत आहे. मुळात 'ग्राफिन' हापदार्थ ग्राफाईट या मूलद्रव्यापासून बनवण्यात आला. पण आता 'फ्लश ग्राफिन प्रोसेस' या प्रक्रियेद्वारे हा पदार्थ कोणत्याही टाकाऊ वस्तूंपासून बनवण्याचा शोध लागला आहे. म्हणजे बघा, री-सायकल न होऊ शकणारे प्लॅस्टिक पदार्थांच्या कचऱ्याचे डोंगर, इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे डोंगर, वापरून टाकून दिलेले वाहनांचे रबरी टायर या सगळ्यांचा उपयोग करून ग्राफिन बनवता येईल. याबाबतीत वैज्ञानिकांनी अधोरेखित केलेली एक गोष्ट आपल्याला भुवया उंचावायला लावणारी आहे.

त्यांच्या पाहणीनुसार जगभरातले सर्व शहरी लोक खाण्यासाठी बनवलेल्या अन्न पदार्थांपैकी किमान ३० ते ४० टक्के अन्नपदार्थ शिळे झाले किंवा खराब झाले, म्हणून चक्क फेकून देतात. हा काही प्रमाणात माजोरीपणा आहे नि काही प्रमणात नाईलाज आहे. गावात शिळे किंवा उष्टेखरकटे अन्न गुरेढोरे, कुत्री-मांजरी तर खातात.

शहरात अनेकदा ते नाईलाजाने टाकूनच द्यावे लागते. अशा अन्नापासून ग्राफिन बनू शकेल आणि हा ग्राफिन पदार्थ सिमेंट किंवा अन्य कोणत्याही कार्बन उत्सर्गी पदार्थातून कार्बनचा उत्सर्ग होण्याचे प्रमणच कमी करून टाकेल. मात्र हे करताना तो त्या पदार्थाचे बाह्यरूप बदलणार नाही.

चपात्यांची मोसंबी झाली किंवा दगडाचे प्रथम सोने आणि परत दगड बनले. तसे न होता सिमेंट हे सिमेंटच राहील. मात्र त्यातून होणारा कार्बन उत्सर्ग कमी होईल; कदाचित अजिबात होणार नाही. विषाचे अमृत होते. अमृताचे विष होते. माणूस घाम शिंपडून मातीतून मोती पिकवतो. कधी कधी माणसाची पुढची पिढी माजोरीपणाने पुन्हा त्या मोत्यांची माती करते. आता ग्राफिन कशातूनही काहीही निर्माण करेल आणि पर्यावरणही बिघडू देणार नाही. विज्ञान आणि अध्यात्म आणखी जवळ येत चाललेत. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म

डॉ. अविनाश मोहरील




मासो शल मीडियामुळे कधी कधी काही गोष्टी फार पटकन कळतात आणि त्यामुळे आपण अपडेट राहतो. अशीच एक बातमी आणि त्यासोबत एक फार सुंदर गाणे मला ऐकायला मिळाले. कधी कधी ध्यानीमनी नसताना आपल्या फार जास्त आवडीची गोष्ट अचानक आपल्यासमोर आली किंवा अनुभवायला मिळाली तर तो आनंद काही वेगळाच असतो. असाच काहीसा अनुभव मला आला. जुन्या काळातील एक नटी विद्या सिन्हा हिचे २०१९ मध्ये निधन झाले तेव्हा तिला श्रद्धांजली देणारा एक लेख फेसबुकवर माझ्या वाचण्यात आला होता. तोच लेख परत परवा पुन्हा वाचण्यात आला. वेगळ्या धाटणीच्या चित्रपटांत काम करणारी व सामान्य व्यक्तिमत्त्व सादर करणारी अशी ही गुणी अभिनेत्री होती. तो लेख तिच्या सर्व भूमिकांचे वर्णन करणारा होता व त्या लेखकाने लेखाच्या शेवटी तिच्या अनेक चित्रपटांपैकी एका चित्रपटाचे गाणे जोडले होते.

प्रेमाच्या सुंदर भावनेचे वर्णन करणारे ते गीत संपूर्णपणे बघितल्यावर कधी नव्हे तो मी एका ओळीपाशी रेंगाळलो. कितीतरी वेळा हे गाणे ऐकले होते, परंतु ही ओळ आजच्या प्रमाणे मनाला भावली नव्हती. फारच वेगळा विचार या ओळीमध्ये मला जाणवला. विशेषतः आधुनिक काळात जेव्हा वेगवेगळ्या नात्यांची घट्ट वीण जराशी सैल होताना आपल्याला जाणवते, जेव्हा इतरांचा फार विचार करणे गैर आहे म्हणून जरा स्वतःचा विचार करायला हवा अशा पद्धतीचे विचार मुलांना मुद्दाम शिकवावे लागतात, कुणाच्या मध्ये पडायलाच नको बाबा! कारण त्यामधून समस्या निर्माण होतात त्यापेक्षा आपण बरे नि आपले कामबरे, असा विचार हा खरा व्यावहारिक विचार ठरतो. ज्या काळात आई-वडील आणि त्यांची दोन मुले व त्यांचा परिवार अशा एकाच घराचे तीन वेगवेगळे परिवार झालेले आहेत किंवा ज्या काळात प्रेम करतानादेखील अटींची पूर्तता केल्यावरच ते मान्य केले जाते अशा काळात या गाण्यातला हा विचार मला फारच महत्त्वाचा वाटला. आधुनिक काळात जे बदल आपण अनुभवतो आहे त्या बदलांमध्ये केवळ भौतिक बदलच समाविष्ट नाहीत तर आपल्या जगण्यातील बदलदेखील अंतर्भूत आहेत. नात्यांचे वेगळे संदर्भ तयार झाले व म्हणूनच विद्या सिन्हाच्या काळातल्या एका गाण्यात आलेला संदर्भ मला सध्याच्या बदलांच्या संदर्भात सुरुवातीला जरासा कालबाह्य झाल्यागत वाटला.

सध्या प्रत्येक ठिकाणी निर्माण झालेला एक प्रॅक्टिकल ॲप्रोच अनेकांना यशस्वीतेकडे घेऊन जातो त्यामुळे अनेकांना तो आवडतोदेखील. प्रत्येकच नात्यात एक अंतर राखायला हवे हा नवा दृष्टिकोन आता बघायला मिळतो. अगदी प्रेमाच्या नात्यात व्यावहारिक पद्धत बाळगून स्पेस सांभाळली जाते. प्रत्येकाला स्पेस मिळायला हवी यात काहीच मतभेद असण्याचे कारण नाही, परंतु नात्याच्या सर्वच बाबींना जर बंधन मानण्यात आले व त्या बंधनामुळे एक जण दुसऱ्यावर वरचढ ठरतोय, असा विचार करण्यात आला तर मात्र अडचण निर्माण होईल. कारण प्रेम ही मूळ संकल्पना त्यागाच्या भावनेवर अवलंबून आहे असेच आपल्याला परंपरागत शिकविण्यात आले आहे व ती भावना असल्याखेरीज प्रेमाचा खरा आधार प्रेम करणाऱ्या दोघांनाही मिळू शकत नाही. परंतु यासाठी मी ऐकलेल्या गाण्यातील ती ओळ समजून घेणे महत्त्वाचे आहे. रजनीगंधा चित्रपटातील, 'रजनीगंधा फुल तुम्हारे, महके युँही जीवन मे' हे सुंदर गीत मी ऐकत होतो. आपल्या प्रियकराचा आपल्या जीवनावरील प्रेमाचा अधिकार मी मान्य केला व त्यानंतर माझे जग बदलून गेले असे हळुवार वर्णन करणारी ती प्रेयसी.

**'अधिकार ये जबसे साजन का, हर धडकन पर माना मैंने, मैं जबसे उनके साथ बंधी ये भेद तभी जाना मैने'**

आपल्या प्रत्येक श्वासावर प्रियकराचा अधिकार मानून जेव्हा मी त्याच्यासोबत बांधल्या गेली तेव्हा मला एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीची जाणीव झाली, असे ती म्हणते. ती महत्त्वाची गोष्ट म्हणजे मला आवडलेली व विचार करायला लावणारी या गीतामधील त्या ओळीमधील भावना. प्रेमाच्या उत्कट भावनेचा मनामध्ये सुंदर आविष्कार झाल्यानंतर व त्या प्रेमाच्या बंधनामधील सुख व्यक्त करणारी ती प्रेयसी म्हणते, '**कितना सुख है बंधन मे!**' बंधनाचे सुख? बंधन हे सुखकारक कसे राहू शकते? ही काय कल्पना आहे? मुळात कसलेही बंधन नको. कारण व्यक्ती म्हणून सर्व प्रकारचे स्वातंत्र्य उपभोगता आले पाहिजे व ते उपभोगण्याचा मला अधिकार आहे या अत्यंत आदर्श व मूलभूत विचारांचा पगडा सध्या सामाजिक दृष्टिकोनातून रूढ होत असल्याने या ओळीतील संदर्भाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण केले जाऊ शकते. परंतु प्रेमाच्या तरल भावनेला जर मनापासून समजून घेतले तर मात्र या ओळीमधला गर्भितार्थ लक्षात येऊ शकेल.

प्रेम हेच मुळात एक बंधन आहे. गोड आणि हवेहवेसे वाटणारे बंधन. दोन जीव या बंधनात गुंततात व हे गुंतणे त्यांना प्रचंड आवडते. असे गुंतले राहणे त्यांच्याकरीता त्यांचे म्हणून एक सुंदर विश्व निर्माण करते. त्या विश्वामध्ये आनंद असतो, सहभाग असतो, संवाद असतो व सर्वात महत्त्वाचे म्हणजे सांभाळदेखील असतो. या बंधनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे ओझे नसते. एकमेकांकरिता काही ना काही करण्याची ओढ असते. एकमेकांसाठी वेळ असतो. यामध्ये अपेक्षा असतात, अपेक्षापूर्तीसाठी प्रयत्न असतात, अपेक्षाभंग झाला तर वेदनाही असतात; परंतु त्यानंतर पुन्हा लवकरच साधली जाणारी एकरूपतादेखील असते. येथे स्पर्धा किंवा ईर्षा नसते तर एकमेकांना मनापासून सहकार्य असते, येथे एकमेकांकरिता केलेल्या कामाचा हिशोब नसतो तर केलेले काम न सांगण्याचा मनाचा मोठेपणा असतो, येथे एकमेकांवर कोणत्याही गोष्टीची जबरदस्ती नसते तर एकमेकांकरिता समर्पणाची तयारी असते, एकमेकांनी समजून घ्यावे याकरिता आर्जवे नसतात तर सहजच समजून घेतलेय हे कधी कधी समजत नाही, येथे संवादाच्या वेळा ठरवलेल्या नसतात तर सहजच संवाद घडतो. येथे मुद्दाम घडवून आणलेला सहयोग नसतो तर येथे सहयोगीता हाच जगण्याचा आधार असतो. येथे दोन जीव वेगळे स्वतंत्र अस्तित्व जपण्याची केविलवाणी धडपड करीत नाहीत तर दोघांचे मिळून एकत्र अस्तित्व जाणवून खऱ्या अर्थाने या प्रेमाच्या बंधनाचे सुख अनुभवतात आणि म्हणूनच गाण्यातील प्रेमाची उत्कट भावना व्यक्त करणाऱ्या प्रेयसीला त्या प्रेमाच्या बंधनात सुख वाटू शकते. आधुनिक काळातील व्यक्तीला स्वातंत्र्याच्या कल्पना जोपासताना कदाचित या ओळींमध्ये व्यक्त झालेला विचार हा कालबाह्य वाटण्याची शक्यता आहे. तसे वाटणे काही गैर नाही. या स्वातंत्र्याच्या कल्पना कधी कधी प्रेमाच्या भावनेतील तरलता किंवा त्यामधील त्यागाच्या सुखापासून वंचित ठेवतात की काय असे वाटू लागते. याचे कारण व्यक्तिस्वातंत्र्य या संकल्पनेची मर्यादा काही वेळा इतकी संकुचित होते. की केवळ मी पलीकडे कुणाचाच विचार केला जात नाही. मला कुणाची गरज नाही, मी सक्षम असल्याने माझाच विचार मी करणार, मला हवे तसे वागायला, राहायला मी समर्थ आहे. समाजाचा वगैरे विचार किंवा इतरांना काय वाटते याचा विचार करणे माझ्या व्यक्तिगत विचारांवर घाला आहे, असे माझे मत आहे. मला कुणाचीही गरज नाही. कुणाला जर माझ्याशी संबंध ठेवायचे असतील तर हरकत नाही; त्या कुणासाठीही मी माझ्या जगण्याच्या संकल्पना बदलणार नाही. माझ्या अटींवर शक्य होत असेल तर मान्य अन्यथा जा उडत. अशा पद्धतीचा विचार करणाऱ्या नव्या वैचारिक प्रवाहास, 'कितना सुख है बंधन में' या ओळीतील प्रेमाची आर्तता कशी कळणार? असे नितांत प्रेम करणारी व्यक्ती आयुष्यात मिळणे व त्या प्रेमाच्या जगात स्वतंत्र अस्तित्वाच्या संघर्षापेक्षा दोघांचे मिळून प्रेमाचे सहअस्तित्व जपण्याची धडपड असणे खरोखरीच नशीबच लागते.

---

संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

सनातनी हा जन्मजात सनातनी असतो, या विधानाची पुष्टी करणारे आणखी दोन संस्कार आपल्या धर्मात सांगितले आहेत. आईच्या गर्भाशयात वाढणारा गर्भ जन्मल्यानंतर सुप्रजा म्हणूनच या समाजात वावरावा म्हणूनच हा सगळा खटाटोप असतो. गर्भाच्या भविष्याची जशी चिंता असते तशीच गर्भवतीच्या मानसिक स्वास्थ्याची काळजीही असते. एका नव्या जिवाला आपल्या शरीरात वाढवताना तिच्यात होणारे शारीरिक, मानसिक, भावनिक आणि बौद्धिक बदल हे अनिवार्य आणि अपरिहार्य असतात.

'पहिलटकरीण' हा शब्द आजकाल वापरात नाही. कारण आजकाल 'हम दो हमारा एक' किंवा 'हमारा एक भी नहीं' हा नाराच सर्वत्र गाजतोय. पण पूर्वी जेव्हा स्त्री जननी म्हणून आपलं कर्तृत्व गाजवायची त्याकाळी हा शब्द पहिल्यांदाच गर्भार राहिलेल्या स्त्रीकरिता सर्रास वापरण्यात येत असे. तर, 'पहिलटकरिणी'चं कोडकौतुक करण्याचे वेगवेगळे प्रकार भारतीय भूगोलात आढळून येतात. त्यात पुंसवन आणि सीमंतोन्नयन हे दोन विधी मात्र सार्वत्रिक आहेत. अर्थात हे दोन्ही विधी त्या स्त्रीच्या प्रत्येक गर्भारपणात करायचे आहेत, असं कर्काचार्यादि विद्वान म्हणतात.

यातला पुंसवन हा विधी गर्भधारणेच्या दुसऱ्या महिन्याच्या अखेरीस किंवा तिसऱ्या महिन्याच्या शेवटी म्हणजे ४५ दिवस पूर्ण झाल्यानंतरच करण्याचा असतो. हा विधी नेम का याच कालखंडात का करायचा? त्याचा मागोवा घेताना लक्षात आलं की, आयुर्वेदानुसार फलित बीजांड गर्भाशयातील मऊ संरक्षक आणि पोषक अस्तराला जाऊन चिकटतं; त्याला सर्वसाधारणपणे ४५ दिवस लागतात. ही क्रिया घडली की, बीजांडाचं रूपांतर भ्रूणात होतं. भ्रूण म्हणजे नाळेच्या माध्यमातून गर्भाशयातील अस्तराला खिळलेलं आणि त्यातून पोषण घेणारं फलित बीजांड. भ्रूणाचा विकास झाला की त्याचा गर्भ होतो. त्याकरिता जन्माला येईपर्यंत ते नाळेसह त्या गर्भाशयाच्या अस्तराशी संलग्नच असायला हवं.




संपूर्ण गर्भारपणात भ्रूण, गर्भ आणि अर्भक हा विकास व्यवस्थित व्हावा, त्याचे सर्व अवयव यथायोग्य प्रकारे वाढावे आणि बाळंतपण सुलभ व्हावे म्हणून करण्याचा हा विधी आहे. त्यामुळे फलित बीजांड गर्भाशयाच्या अस्तराशी जोडल्या गेलं, गर्भ स्थिरावला की लगेचच करण्याचा हा संस्कार आहे. फलित बीजांड गर्भाशयाच्या अस्तराशी जोडल्या गेल्यानंतर गर्भाशयाची 'क्षेत्रशुद्धी' करून त्यात स्थापित गर्भ 'पुमान' होण्यासाठी पुंसवन विधी करीत आहोत, असं या विधीचा संकल्प सांगतो. पुमान हा शब्द 'पुंस्.'

अनेक संस्कृत विद्वानांनी पुमान या शब्दाचा अर्थ 'पुरुष'असा सांगितलेला आहे. त्यामुळे साहजिकच होऊ घातलेलं बाळ हे मुलगा म्हणजे पुल्लिंगी होण्यासाठी हा विधी केला जातो, असंही प्रतिपादित करण्यात येतं. कारण 'पुंस्' अर्थात नर त्यामुळे शब्दश: ते बरोबरही आहे. आजच्या आधुनिक जनुकशास्त्राप्रमाणे गर्भाचं लिंग ठरवणारे दोन गुणसूत्र असतात- 'क्ष (द)' आणि 'य (ध)'. पैकी 'क्ष' हे गुणसूत्र स्त्रीलिंगी आणि 'य' पुल्लिंगी असतं. स्त्री बीजांडात दोन 'क्ष' गुणसूत्रं असतात तर पुरुष शुक्राणूत एक 'क्ष' आणि एक 'य' गुणसूत्र असतं. ज्यावेळी बीजांडाचं फलन होतं त्यावेळी मातेकडून 'क्ष' गुणसूत्र अधिक २२ गुणसूत्रं आणि पित्याकडून 'क्ष' किंवा 'य' गुणसूत्र अधिक २२ गुणसूत्रं असे एकत्र येतात आणि एकूण ४६ गुणसूत्रांचा नवा संच निर्माण होतो. त्यातून नव्या जिवाची रुजवात होते.

यातली मेख अशी शुक्राणूकडून नेमकं 'क्ष' गुणसूत्र घ्यायचं की 'य' ही निवड कशी होते किंवा ठरते? बरं, दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, हे 'य' गुणसूत्र 'क्ष' गुणसूत्राच्या तुलनेत आकारानं अतिशय लहान आणि अशक्त असतं. यावरूनच गर्भाचं लिंग निश्चित होत असतं. आईकडून 'क्ष' आणि पित्याकडूनही 'क्ष' असा गुणसूत्राचा मेळ झाला तर भ्रूण स्त्रीलिंगी निपजतं तर मातेकडून 'क्ष' आणि वडिलांकडून 'य' अशी गुणसूत्रं एकत्र आली की, भ्रूण पुल्लिंगी होतं. त्यामुळे वंश हा पुरुषांवरूनच ठरतो. हे जीवशास्त्रीय सत्य आहे. त्यात स्त्रीला कमी लेखणे किंवा पुरुषी वर्चस्ववादी वगैरेसारखे पुरोगामी विचार नाहीत.

गेल्या काही वर्षांपूर्वी एका जनुकशास्त्रज्ञानं जेव्हा जगभरातल्या विविध वंशांच्या 'य' गुणसूत्रांच्या इतिहासाचा धांडोळा घेतला तेव्हा एक अतिशय आश्चर्यकारक माहिती पुढे आली. इ. स. पूर्व ५६०० ते ५५०० या कालखंडानंतर भारतीय वंशाच्या 'य' गुणसूत्राच्या विविधतेत अचानक तीव्र दुष्काळ निर्माण झाला. इंग्रजीत त्याला 'सडन क्रंच' असा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. हे एक शुद्ध वैज्ञानिक स्वतंत्र संशोधन आहे. त्याचा प्राचीन भारतीय इतिहासाशी किंचितही संबंध नाही. पण नीलेश ओक यांनी महाभारतात नोंदविलेल्या खगोलीय नोंदींच्या आधारे करून संशोधन महाभारत युद्धाच्या कालनिश्चिती केली. त्यात त्यांनी वर्ष सांगितलं आहे इ. स. पूर्व ५५६१. आता ही दोन संशोधनं एकमेकांशी जोडून घेतली तर त्या विशिष्ट कालखंडात 'य' गुणसूत्राच्या विविधतेत अचानक दुष्काळ का निर्माण झाला, त्याचं कारण कळेल. केवळ १८ दिवसांत १८ औक्षिहिणी (३.९ कोटी सैनिक संख्या) पुरुष मारले गेलेत; तो प्रसंग म्हणजे महाभारताचं युद्ध! त्यामुळे मुळातच आखूड आणि अशक्त असलेलं हे 'य' गुणसूत्र भारतीय वंशात जपायलाच हवं होतं. त्यासाठी मुलगा होणं हा सर्वात महत्त्वाचा बिंदू झाला, हे सुज्ञ व्यक्तींना वेगळ्यानं सांगायला नको. म्हणून या संस्काराचं नाव 'पुंसवन विधी' असं ठेवण्यात आलं असावं. पण हा विधी केल्यानं मुलगाच होईल, याची काहीही शाश्वती नाही, हे आपल्या पूर्वजांना नक्कीच माहिती होतं. त्यामुळे गर्भ ज्या गर्भाशयात वाढणार आहे ते क्षेत्र शुद्ध- स्वस्थ- निरोगी व्हावं, गर्भ सुदृढ राहावा म्हणजे गळून पडू नये, तो कोणत्याही लिंगाचा असो पण तेजस्वी, सद्गुणी आणि बलवान व्हावा याकरिता करण्यात येणारा हा विधी आहे. इथून सनातनी व्यक्ती घडायला सुरुवात होते. म्हणून होणाऱ्या मातेनं हा संस्कार निश्चित करून घ्यावा, हा आग्रह आपण धरायलाच हवा.

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

# मान्सूनचा नवा चेहरा



**हवामान बदलाच्या आजच्या काळात कधी भयानक उष्णता असते. कधी दुष्काळाचे तर कधी मुसळधार पावसाचे विक्रम नोंदविले जात असतात. कमी दिवसांमध्ये मुसळधार पाऊस हा मान्सूनचा नवा चेहरा आहे. कोटो वादळाच्या प्रभावामुळे व्हिएतनाम जोरदार पावसाचा सामना करीत आहे. थायलंडमध्ये पुरामुळे सुमारे २.३ दशलक्ष लोक प्रभावित झाले. दक्षिण आशिया जास्त तापत आहे. त्याचा परिणाम हवामानावर होत आहे.**

भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) ताज्या आकडेवारीनुसार, २०२५ मान्सून सलग दुसऱ्या वर्षी 'सामान्यपेक्षा जास्त' होता. पावसाळी दिवसांची संख्या कमी होत आहे; परंतु कमी दिवसांत जास्त पाऊस पडत आहे. 'जर्मन वॉच'च्या अहवालानुसार, १९९५ ते २०२४ दरम्यान जगभरात ९७०० हून अधिक वेळा हवामानात झालेल्या मोठ्या बदलामुळे आठ लाख ३२ हजार लोकांचा मृत्यू झाला आणि ४.५ ट्रिलियन डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले. आजकाल श्रीलंका, इंडोनेशिया, फिलिपाईन्स, मलेशिया, थायलंड आणि व्हिएतनाममध्ये एकाच वेळी आलेल्या विनाशकारी वादळांनी दक्षिण आशियात हजारो लोकांचा बळी घेतला आणि लाखो लोकांना विस्थापित केले.

सेन्यार आणि देत्वाह चक्रीवादळांनी चार दशलक्ष लोकांना प्रभावित केले. यापूर्वी भारत (विशेषतः पंजाब), पाकिस्तान, नेपाळ आणि बांगलादेशमध्ये पूर आला होता. यावर्षी मुसळधार पाऊस आणि त्याचे व्यापक परिणाम (भूस्खलन आणि अचानक पूर) संपूर्ण आशियाला भेडसावत आहेत. हवामान बदलामुळे दक्षिण आशियात तापमान जागतिक सरासरीपेक्षा दुप्पट वेगाने वाढत आहे. यामुळे पूर, चक्रीवादळे, उष्णतेच्या लाटा आणि दुष्काळ यासारख्या आपत्ती वारंवार येत आहेत. अतिरेकी हवामान आता संपूर्ण आशियासाठी एक वारंवार येणारे संकट बनले आहे. हवामान शास्त्रज्ञ चिराग धारा (क्रिया विद्यापीठ), रॉक्सी मॅथ्यू कोल (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटेरोलॉजी) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या अलिकडच्या अभ्यासानुसार गेल्या दशकात (२०१५-२०२४) भारताचे सरासरी तापमान सुमारे ०.९ अंश सेल्सिअसने वाढले आहे.

१९५० च्या तुलनेत पश्चिम आणि ईशान्य भारतात वर्षातील सर्वात उष्ण दिवसाचे तापमान १.५ ते २ अंश सेल्सिअसने वाढले आहे. परिणामी आसाम, अरुणाचल प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांमध्ये २० टक्क्यांपर्यंत कमी पाऊस पडला आहे. गेल्या ३० वर्षांमध्ये जगातील सुमारे ४० टक्के लोकसंख्येचे (तीन अब्जांहून अधिक) लोक उष्णतेच्या लाटा, चक्रीवादळे आणि पूर यासारख्या अतिहवामान घटनांनी सर्वाधिक प्रभावित झालेल्या ११ देशांमध्ये राहतात. या देशांमध्ये भारत (नववा), चीन (अकरावा), लिबिया (चौथा), हैती (पाचवा) आणि फिलिपाईन्स (सातवा) सारखे इतर देश समाविष्ट आहेत. यापैकी चीन वगळता कोणत्याही श्रीमंत, औद्योगिक राष्ट्रांचा समावेश नाही. हे सर्व विकसनशील देश आहेत. या वर्षाच्या सुरुवातीपासून पॅसिफिक आणि हिंदी महासागरात किमान १६ चक्रीवादळे आणि डझनभर कमी दाबाचे पट्टे निर्माण झाले आहेत. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटेरोलॉजी'च्या हवामान शास्त्रज्ञ रॉक्सी मॅथ्यू कोल यांच्या मते, मध्यम चक्रीवादळेदेखील आता मुसळधार पाऊस पाडतात आणि मोठ्या प्रमाणात पूर आणू शकतात. हवामान बदलामुळे दक्षिण आशिया वेगाने गरम होत आहे. त्यामुळे आपत्तींच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. आयआयटी मुंबई आणि जर्मन विद्यापीठाच्या एका नवीन अभ्यासातून दिसून आले आहे की, दोन महिन्यांच्या उष्णतेच्या लाटा वेगवेगळ्या घटकांमुळे आल्या होत्या; परंतु एकत्रितपणे त्यांनी भारत आणि दक्षिण आशियावर मोठा परिणाम केला.

मार्च आणि एप्रिल २०२२ हे दोन महिने देशातील लाखो लोकांसाठी आपत्तीपेक्षा कमी नव्हते. अचानक उष्णतेत वाढ झाल्याने सामान्य जीवन विस्कळीतच झाले नाही तर पिकेही सुकली. शाळा लवकर बंद झाल्या आणि विजेच्या मागणीमध्ये विक्रमी वाढ झाली. ही परिस्थिती उत्तर भारतातच नव्हे, तर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानसारख्या देशांमध्येही अत्यंत गंभीर बनली आहे. आयआयटी मुंबई आणि जर्मनीतील मेंझ येथील जोहान्स गुटेनबर्ग विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी या अतिउष्णतेमागील खरी कारणेशोधण्यासाठी एक संयुक्त अभ्यास केला. या अभ्यासातून दिसून आले आहे की, मार्च आणि एप्रिलमधील उष्णतेच्या लाटा वेगवेगळ्या घटकांमुळे उद्‌भवल्या होत्या; परंतु एकत्रितपणे त्यांनी दक्षिण आशियातील परिस्थिती आणखी बिकट केली. हे संशोधन अलिकडेच प्रतिष्ठित 'जर्नल ऑफ जिओफिजिकल रिसर्च : ॲटमॉस्फियर्स'मध्ये प्रकाशित झाले आहे. त्याचे शीर्षक आहे '२०२२ मध्ये सलग पूर्व-मान्सून दक्षिण आशियाई उष्णतेच्या लाटांची विरोधाभासी चालक.' 'मार्च २०२२ ची उष्णतेची लाट : एक आपत्ती' या अभ्यासाचे प्रमुख लेखक आणि आयआयटी मुंबई येथील 'सेंटर फॉर क्लायमेट स्टडीज'मधील पीएचडी विद्यार्थी रोशन झा स्पष्ट करतात की, मार्चमधील उष्णतेची लाट प्रामुख्याने वरच्या वातावरणातील वाऱ्यांच्या विशिष्ट हालचालीशी जोडली गेली होती. तिला 'रॉसबी' लाट म्हणतात. हवामानाच्या पद्धतींवर परिणाम करणारे उच्च उंचीचे, फिरणारे वारे अशी त्यांची ओळख आहे. उत्तर ध्रुवाजवळील उष्णकटिबंधीय जेट प्रवाह आणि विषुववृत्ताजवळील उपोष्णकटिबंधीय जेट प्रवाह जवळ आल्यावर त्यांच्यातील ऊर्जा एकमेकांमध्ये मिसळतात. यामुळे 'रॉसबी' लाटांची शक्ती अचानक वाढते. परिणामी भारतासह दक्षिण आशियामध्ये उष्णतेची लाट येते. एप्रिलमध्ये तापमान वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे जमीन कोरडी होणे आणि गरम वारे वाहणे.

माती ओली असते, तेव्हा सूर्यप्रकाशातील उर्जेचा मोठा भाग बाष्पीभवनासाठी वापरला जातो. यामुळे वातावरणात जास्त उष्णता पसरण्यापासून रोखले जाते; परंतु जमीन आधीच कोरडी असेल, तर सर्व सूर्यप्रकाश हवा गरम करतो तसेच पाकिस्तान आणि अफगाणिस्तानातून उष्ण वारे भारतात प्रवेश करतात, तेव्हा आधीच गरम असलेली जमीन त्यांना अधिक धोकादायक बनवते. आपण सहसा उष्णतेच्या लाटांना एकच घटना मानतो; परंतु या अभ्यासातून दिसून आले आहे की, उष्णतेच्या एका लाटेनंतर दुसरी येते, तेव्हा त्याचा परिणाम अधिक गंभीर असू शकतो. मार्च आणि एप्रिल २०२२ मधील अतिउष्णता ही केवळ हवामानाची घटना नव्हती, तर वातावरणीय आणि पृष्ठभागाच्या घटकांची मालिका होती, जी एकत्रितपणे दक्षिण आशियाला तापवत होती. हवामान बदलाचे मुख्य कारण असलेले हरितगृह वायू उत्सर्जन अद्याप कमी झालेले नाही; उलट वाढत आहे. २०२३ दरम्यान उत्सर्जन एक टक्क्याहून अधिक वाढले आहे.

शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार २०३० पर्यंत उष्णता शिखरावर पोहोचेल आणि नंतर २५ टक्क्यांनी कमी होऊन ४० टक्क्यांपर्यंत येईल. दक्षिण आशियामध्ये राहणाऱ्या आपल्यासारख्या लोकांना वारंवार तीव्र उष्णतेच्या घटना, पूर आणि दुष्काळाचा सामना करावा लागेल. याचा आरोग्यावर आणि अर्थव्यवस्थेवर लक्षणीय परिणाम होईल. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा अंदाज आहे की, २०३० पर्यंत दक्षिण आशियातील कामगार उत्पादकता पाच टक्क्यांनी कमी होईल.

हवामान बदल केवळ देशाला वर्षानुवर्षे मागे टाकत नाही तर विद्यमान धोक्यांचा परिणामदेखील वाढवू शकतो. उदाहरणार्थ उच्च तापमान अधिक ओझोनशी जोडले जाऊ शकते. त्यामुळे वायू प्रदूषण वाढू शकते. आता अनेक देश कमी कार्बन भविष्याकडे वाटचाल करीत आहेत; परंतु किमान दीड अंश तापमान कमी करण्याइतकी वेगाने वाटचाल होत नाही. हे संक्रमण जितक्या वेगाने होईल, तितके ते अधिक विनाशकारी होईल.

विद्यमान उद्योग विस्कळीत झाल्यामुळे पेट्रोल कार उत्पादन आणि कोळसा खाणकाम यासारख्या क्षेत्रातील नोकऱ्या गमावल्या जातील आणि त्याऐवजी दुसऱ्या क्षेत्रात उपलब्ध होतील. लोकांना त्यांचा प्रवास, घरातील थंडी आणि खाण्याच्या सवयी बदलण्यासाठी राजी करावे लागेल. सरकारांसाठी हे राजकीयदृष्ट्या महाग असू शकते. सामाजिकदृष्ट्या विघटनकारी बदलाच्या भीतीमुळे देश आक्रमक वचनबद्धता करण्यापासून सावध आहेत.

(पान ६ वर)



**मनमोहन भुतडा यांच्या सुखी जीवनाचा कानमंत्र 'योग' या योगासनांची माहिती देणाऱ्या पुस्तकावर ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी दिलेला अभिप्राय...**

# सुखी जीवनाचा कानमंत्र 'योग'




श्री राम! 'सुखी जीवनाचा कानमंत्र : योग !' हे आटोपशीर पण अत्यंत समर्थपणे योगासनांची माहिती देणारे पुस्तक श्री. मनमोहन भुतडा यांनी सिद्ध करुन, योगोत्सुक वाचकांना मोलाचे मार्गदर्शन केले आहे. योग हा शब्द उच्चारायला सोपा वाटत असला तरी त्याची समग्र कृती- प्रणाली, त्यापाठचे सूक्ष्म विज्ञान आणि पंचकोशीय विकासाचे चिंतन खूप गंभीर स्वरुपाचे आहे. श्री. भुतडा यांनी हे सूत्र मनात ठेवून, योगाचा उपयोजित विचार आणि पद्धती खूप सोप्या आणि चित्ताकर्षक पद्धतीने मांडली आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन ïह

योगविधीची केवळ सैद्धांतिक बाजू न मांडता सप्रमाण आणि सहज अंगिकारता येईल अशा पद्धतीने विषय मांडला आहे. १९९० पासून ते योग प्रशिक्षण देत आहेत.

२५ हजारांहून अधिक योगोत्सुकांनी त्याचा लाभ घेतला आहे. देश - विदेशातही असे वर्ग श्री.भुतडा यांनी घेतले आहेत. त्यामुळे या पुस्तकात 'विद्यार्थ्याची' मनोभूमिका लक्षात घेऊन त्यांनी सुलभ विवरण केले आहे.

सध्या आहारशुद्धी, जगण्यातील नियमितता, निसर्गाशी सम्यक जीवनशैली याचे विस्मरणच नव्हे तर याची हेळसांड करत आपण जगत आहोत. शारिरीक सहज हालचालीही जणू विसरून चाललो आहोत. परिणामी मनोकायिक लहानमोठ्या व्याधी कायमच्या वस्तीला आल्या आहेत.

मानसिक ताण तणाव आणि कायिक जडता वाढत आहे. यावर योग किती आणि कसा प्रभावी उपाय आहे,हे प्रस्तुत पुस्तक ठामपणे पटवून देते.

५८ प्रकारच्या आसनांची सचित्र उलगड या पुस्तकात आहे. केवळ आसनेच नव्हे तर प्राणायामाचाही नेटका विचार या पुस्तकात केला आहे. योग अभ्यास संच तर पुस्तकाचा कलशाध्यायच आहे. शारीरिक व्याधी आणि मन:शांतीचा मार्ग दाखवणारे हे पुस्तक लिहून उत्तम कार्य केले आहे.

**अभिनंदन आणि शुभेच्छा!**

कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

# ताल ठेका पदन्यास

भर्तृहरीने फार पूर्वी एक सखोल विधान केलेले आहे आणि ते आजही लागू होते. 'साहित्यसंगीतकलाविहीनः साक्षात पशुः पुच्छविषाणहीनः' म्हणजे साहित्य, संगीत, कला ज्या माणसाला आवडत नाही तो माणूस शेपटी आणि शिंगे नसलेला पशूच आहे. भारतीय कला फक्त इंद्रिय सुख देत नाही. ती आध्यात्मिक अनुभूती आहे. कलावंत जेव्हा त्याची कला सादर करतो तेव्हा असं म्हणतात की, त्याच्या अंगात देवतेचा संचार असतो. त्यामुळे त्याच्या कलानिर्मितीचे संपूर्ण श्रेय तो परमेश्वराला देतो.

वात्सायनाच्या कामसूत्रात सांगितलेले आहे की, कला ६४ प्रकारच्या असतात. त्यातील नृत्यकलेचा जन्म कसा झाला असेल? ब्रह्मदेवाने भरताला नाट्यवेद शिकविला. नाट्यवेदाला प्रमाण मानून भरताने नाट्यप्रयोग बसविला आणि कैलासावर शिवापुढे करून दाखविला. त्रिपुरासुर संहाराचे नाट्य भरताने सादर केले होते. ते पाहून भगवान शंकर प्रसन्न झाले. ते बोलले, 'नाट्यप्रयोग अतिसुंदर झाला, पण त्यात एक उणीव आहे. तुझ्या नाट्याला नृत्याची जोड नाही. निदान नाट्याच्या पूर्वांगात तरी नृत्य पाहिजेच.' पण भरताला नृत्य येत नव्हते. त्यामुळे शिवाने आपला शिष्य तंडू याला आज्ञा केली की, 'तू भरताला नृत्य शिकव.' तंडूने भरताला नृत्य शिकवले. त्यामुळे त्याचे नाव 'तांडव' पडले. पण तांडवामध्ये सुकुमारता नव्हती.

पार्वतीला 'लास्य' नावाच्या लालित्यपूर्ण नृत्यकलेचे ज्ञान होते. तिने भरताला 'लास्य' शिकवले आणि अशाप्रकारे पूर्णत्व असलेला शास्त्रीय नृत्य प्रकार आपल्या देशात लोकप्रिय झाला. कलावंतांच्या अभ्यासाला 'साधना' आणि कलावंतांना 'साधक' असे आपण म्हणतो. पूर्वी नृत्याच्या माध्यमातून परमेश्वराची आळवणी करण्यात येई. मोठमोठे राजे महाराजे नृत्यकलेला राजदरबारी आश्रय देत. तंजावरमध्ये गोविंदाचारी नावाचा शिल्पकार होता. त्याची मुलगी कल्याणी कुशल नृत्यांगना होती. एक दिवस राजराजे चोळ याने वेषांतर करून कल्याणीचे नृत्य पाहिले. त्याने प्रसन्न होऊन तिच्यासमोर राजनर्तिकेचा प्रस्ताव मांडला. पण गोविंदाचारी म्हणाले की, माझी मुलगी फक्त देवासमोरच नाचेल. त्यामुळे चोळ राजाने तिच्यासाठी बृहदेश्वर मंदिर बांधले. नृत्यांगनांच्या अशा अनेक सुंदर कथा आपल्या संस्कृतीत रुजलेल्या आहेत आणि नृत्य निर्मितीच्या अनेक गोष्टी आजही रंगवून सांगितल्या जातात. आंध्र प्रदेशमध्ये सिद्धेंद्र हा नृत्य गुरू श्रीकृष्णाचा भक्त होता. तो कुचिपुडीमध्ये राहायचा. त्याने पारिजात हे नृत्यनाटक बसवले. असे वाटते की, राजाचा सेनापती नृत्यात कसा निपुण असणार! पण आंध्रप्रदेशमध्येच काकतीय राजाच्या दरबारात जयपसेन नावाच्या सेनापतीने 'नृत्यरत्नावली' नावाचा एक सुंदर ग्रंथ लिहिला आहे. त्याच्या ग्रंथाचे प्रमाण मानूनच मंदिरातील अनेक नृत्यशिल्पे शिल्पकारांनी कोरली आहेत. आंध्रप्रदेशमध्येच मुव्वा नावाच्या खेड्यात क्षेत्रज्ञ कवी राहायचा. तो गोपालस्वामीचा परमभक्त होता. आपल्या देवावर त्याने हजारो गीते लिहिली आणि आपल्या रचना तो देवासमोर नृत्य सादर करून गात असे. त्याच्यामुळे भरतनाट्यम्‌मधील 'पदम्' प्रकार जन्माला आला. आंध्रप्रदेश म्हणजे नृत्य रत्नांची खाणच होती. वरंगळचा राजा प्रताप रुद्र नृत्य कलेचा मोठा चाहता होता. त्याच्या दरबारी 'माचले देवी' नावाची राजनर्तिका शिवाची आराधना करीत असे. तिने 'यक्षगान' हा लोकप्रिय नृत्य प्रकार रूढ केला. रंगीबेरंगी पोशाख, गडद मुखवटे, नृत्य आणि गाण्यांचा सुरेख मिलाप यक्षगानमध्ये दिसून येतो.



महाभारत आणि रामायणातले अनेक प्रसंग यामध्ये अंतर्भूत केले असतात. आश्चर्य म्हणजे दक्षिणेकडील सर्व राजांनी नृत्यकलेला निव्वळ राजाश्रय दिला नाही तर स्वतः अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहून भारतामध्ये नृत्य संस्कृती विकसित केली. रेड्डी वंशाचा कोडविडू येथील राज कुमरगिरी राजाने 'वसंतराजियम' हा मोठा ग्रंथ लिहिला. येथील राजे नृत्यकलेचे फक्त चाहते नव्हते. त्यांना स्वतःला नृत्यकलेचे बारीक ज्ञान होते. इकडे उत्तर भारतातही राजे-महाराजे, संत-महंत सर्व जणांनी नृत्यकलेला प्रोत्साहन दिले. चैतन्य महाप्रभू ंनी बंगालमध्ये राधाकृष्णाची भक्ती गाणी गाऊन, नृत्य करून जागोजागी पेरली. कवी जयदेव आणि त्यांची पत्नी यांनी गीतगोविंद रचना नृत्यात पेश केल्या. हा प्रकार अष्टपदी आट्टम म्हणून केरळमध्ये खूपच लोकप्रिय झाला. चैतन्य महाप्रभू बंगालमध्ये 'कीर्तनीया' हा भावोत्कट नृत्यप्रकार घेऊन आले. संत शंकरदेवांनी आसाममध्ये 'अंकियानटला' जन्म दिला. संत हरिदासांनी कथक नृत्याची मुहूर्तमेढ उत्तरेत रोवली. कथक म्हणजे नृत्यातून ईश्वरचरणी लीन होऊन त्याची कथा सांगणे. पूर्वी मंदिरांमध्ये देवाबद्दलच्या कथा सांगितल्याजायच्या. पण त्या जेव्हा नाचून, अभिनय करून सांगितल्या जाऊ लागल्या, तेव्हा त्या कथक रूपाने लोकप्रिय झाल्या. तसे बघितले तर कीर्तन हा प्रकार कथकचाच अंश म्हणावा लागेल. कीर्तन करताना बुवा जेव्हा रंगून जातात, तेव्हा नाचतात, गातात, गोष्ट सांगतात. हाच तर कथकचा आत्मा आहे. कथकसाठी तबला, बासरी, मृदंग, सारंगी, पेटी असा वाद्यवृंदाचा साज असतो. मंद्र स्थिर लयीपासून दुप्पट, चौपट, आठपट अशी लय वाढविली जाते. खरे कथक नृत्य तत्कारापासून सुरू होते. त्यानंतर परन, कवित्व, तोडा, तुकडा, तुक्रा असे तबल्याचे बोल कथक नृत्य रंगवतात. भरतनाट्यम् हे सुद्धा मंदिरनाट्य आहे. असे म्हणतात की, तांडव आणि लास्यचा समन्वय म्हणजे भरतनाट्यम् आहे. पण अशीही एक कथा आहे की, एकदा अजु र्न स्वर्गात गेला असताना उर्वशीने त्याला हे नृत्य शिकवले होते. अज्ञातवासाच्या काळात जेव्हा त्याने बृहन्नडेचे रूप घेतले तेव्हा विराट कन्या उत्तरेला त्याने ही विद्या दिली होती. अनेक विद्वान मंडळींचे असे मत आहे की, भरतनाट्यम् या नृत्य प्रकारात नटुवा मेळ्याचे सदिर नाट्य, भागवत मेळा हे नृत्यप्रधान नाट्य आणि कुरवंजी नावाचे लोकनाट्य या तीनही प्रवाहांचा मनोहर संगम झालेला आहे. योग, सात्विक अभिनय आणि नृत्यकलेचा सुंदर मेळ म्हणजे भरतनाट्यम्. दाक्षिणात्य राजांनी या कलेला राजाश्रय दिला. दुर्दैवाने पाश्चिमात्य राज्यकर्त्यांनी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात अपप्रचार केला. पण श्री. इ. अय्यर या वकिलाने भरतनाट्यम्‌चा १९ व्या शतकाच्या सुरुवातीस पुनरुद्धार केला. मणिपूरचे रास नृत्य अतिप्राचीन समजले जाते. यामध्ये श्रीरामांची आराधना करण्यात येते. मुख्य प्रकाराला लैहरीब असे नाव आहे आणि त्यात टाळ्या वाजवून नृत्य सादर केले जाते. एकदा भगवान शंकरांनी रासलीला बघण्याची इच्छा श्रीकृष्णाजवळ व्यक्त केली. श्रीकृष्ण म्हणाले, मी परवानगी देतो, पण फक्त ऐकण्याची. बघण्याची नाही. रासलीला सुरू झाली. पण भगवान शंकरांनी अट पाळली नाही. तल्लीन होऊन ते रासलीला बघू लागले आणि त्या क्षणी नृत्य बंद झाले. शंकराने ठरवले, पार्वतीला आणि तिच्या सखींना रासलीला शिकवायचीच, पण उंच-सखल कैलासात रासलीला कशी करता येईल? त्यामुळे सपाट पृष्ठभाग असलेल्या दरीची निवड करण्यात आली. दरीच्या पाण्याचा त्रिशूलाच्या साहाय्याने निचरा करण्यात आला. पण अजून एक प्रश्न होता. दरीमध्ये प्रकाश कसा आणायचा? भगवान शंकराचे नागराज मदतीसाठी सरसावले आणि आपल्या मण्याच्या साहाय्याने त्याने प्रकाशयोजना केली. त्यामुळे या प्रदेशाला 'मणिपूर' नाव मिळाले आणि नृत्याला 'मणिपुरी नृत्य' म्हटले जाऊ लागले. मणिपुरी नृत्य म्हणजे श्रीकृष्णाबरोबर भक्तिभावाने सादर करण्यात येणारे लैहरीब अर्थात आनंद नृत्य. लैहरीब, भांगी वृंदावनी किंवा कुसुम पराग हे तीनही लास्य डौलात हळुवारपणे केले जाते आणि गोष्ट भांगी किंवा वृंदावनी हे नृत्य उग्रतांडवात सादर केले जाते. सूत्रधाराने रासलीलेची घोषणा केली की, सगळे गावकरी जमा होतात. राधाकृष्णाचे लटके भांडण वृंदा सोडवते आणि रासलीला सुरू होते.

कथाकली शैलीचा उगम केरळमध्ये झाला. असे म्हणतात की, नम्बुद्री ब्राह्मण समाजाने कथाकली नृत्य प्रकार निर्माण केला. कथाकलीमध्ये पुरुषच रात्रभर नृत्य प्रकार सादर करतात. तांडव नृत्याच्या जवळची ही शैली आहे. जयदेवाचे गीतगोविंदसुद्धा यात सादर करतात. मृदुंग, बासरी या वाद्यांमुळे परिसरावर एक धुंद अवस्था असते. कुचिपुडी आणि कथाकली जवळपास सारख्याच नृत्यशैली आहेत. कथाकली शैलीचा आचार्य आंध्र प्रदेशातील कुचिपुडी येथे राहायला आला आणि त्याने कथाकलीचा आंध्रमध्ये विस्तार केला. रामायण-महाभारतातील पात्रे रंगमंचावर आपली कला साजरी करतात. यातही वेगवेगळे प्रकार आहेत. कृष्ण नट्टम्‌मध्ये कृष्णकथा सादर होते. चामु ंडा देवीच्या पूजेसाठी मुडियेत्त केले जाते. चकयारकुट्टमध्ये त्रिपुरासुर विजयाची गाथा सादर होते. रामनट्टम्‌मध्ये रामकथेचा नृत्याविष्कार असतो. भरतनाट्यम्, कथक, कुचिपुडी यांपासून गरबा नृत्य, बोहाडा नृत्य, टिपरी किंवा दांडिया नृत्य, लावणी, सोंगी भजने, कीर्तने, तमाशा हे लोकसंस्कृतीतील रत्न निर्माण झाले का, हा मोठाच प्रश्न आहे. प्रत्येकाची शैली वेगळी, पण तरी कुठेतरी सारखेपणाचा भास होतो.

कृषी जीवनात भरभराट असेल तर जीवनात स्थिरता येते, हे सूत्र प्राचीन काळापासून माणसाने जाणले होते. त्यासाठी दैवतांना पृथ्वीवर वाजतगाजत भक्तिभावाने विराजमान करण्यात आले. मांगल्य, सुफलता, स्थैर्य येण्यासाठी उत्सवांची मालिका सुरू झाली. उत्सवांना माणसाने परिस्थितिनुरूप आपल्या प्रतिभेने नटविले. आकार दिला. नृत्य, नृत्त, नाट्य, गायनाने अवघे भूमंडळ प्रफुल्लित झाले. कीर्तन, खेळे, बोहाडे, भारुडे, टिपरी, भजने मंदिर प्रांगणात रंगू लागली. राजदरबारी कथक, भरतनाट्यम्, कुचिपुडी या शास्त्रीय नृत्यप्रकारांना अभय मिळाले. राऊळा-देऊळांवर नृत्य शिल्पे स्थिर झाली. भक्ती परंपरा निर्माण झाली. त्यामुळे भरतनाट्यम् कथकसारख्या शास्त्रीय कला असोत किंवा भजने, कीर्तने, लळिते, लावण्या, टिपऱ्या, गरबे असोत; शेतीप्रधान संस्कृतीमागील उत्सवप्रिय प्रेरणा एकच आहे. सर्व नृत्य प्रकारांमागील मूलस्रोत माणसाला इच्छित असलेली कृषिप्रधान स्थिरता, सुखसमृद्धी आणि त्यामुळे ईश्वरावर असलेली त्याची प्रगाढ श्रद्धा हाच आहे.




**सोनेरी किरणांच्या पिवळसर धाग्याच्या गुंतावळीत, स्वप्नांच्या धुक्यांतून क्षणभंगुर दवांच्या माळा लेवून समग्र चराचारासमोर नवीन वर्षाची पहाट प्रसन्न हास्याची उधळण करत उभे राहते. खरे तर नवीन वर्ष येण्यापूर्वीच त्याची चाहूल लागलेली असते. अगदी डिसेंबर महिन्याच्या उत्तरार्धात नवीन वर्षाची हाक आपल्याला ऐकू येत असते. जाणारे वर्ष मरगळ घेऊन जाते आणि येणारे प्रसन्नतेचा शिडकाव घेऊन येत अशी आपली धारणा.... खरे, तर अशी धारणा आणि जाणीव होण्यासाठी, हेमंत ऋतूतील गारवा डिसेंबर आणि जानेवारी दोन्ही महिन्यांच्या अस्तित्वाला गारठून टाकत असल्यामुळे नैसर्गिकदृष्ट्या ३१ डिसेंबरला निरोप देताना किंवा एक जानेवारीचे स्वागत करत असताना, प्रसन्नतेची कोणती लाट एका रात्रीतून जादूची कांडी फिरवते ते आजपर्यंत कोणालाच कळलेले नाही. त्यामुळेच अनेकदा प्रसन्नता आणि मरगळ ह्या भावना निसर्ग निगडित नसून माणसाच्या मनामनात सुरू असलेल्या स्पंदनांचा खेळ आहे असे पटवून द्यायचे असले तर मी एकाच ऋतूत, सारख्याच गारव्यात, किंचित अर्ध्या पाऊण मिनिटाच्या फरकाचा सूर्योदय आणि सूर्यास्त असणार्या ३१ डिसेंबर आणि एक जानेवारी या दोन दिवसांचे उदाहरण देत असतो.**

# नव्या वर्षाचे पसायदान




साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

३१ डिसेंबर जाताना वर्षभराची मरगळ घेऊनच जाणार आणि नवीन वर्षाची पहाट जीवनात प्रसन्नता घेऊनच येणार, ही भावना आपण आपल्या मनावर इतकी प्रतिबिंबित केली आहे की 'कालचा होता तसाच आजचा दिवस आहे' हे सर्वार्थाने ठाऊक असून आपल्या मनाचा नवीन वर्षा निमित्ताने अनेक सकारात्मक नवीन आशा पल्लवीत झालेल्या असतात. आपल्या सभोवतीच्या अनेक बिंबांना आणि प्रतिबिंबांना सोबत घेऊन आवरत सावरत नव्या आवर्ताच्या स्वागतासाठी आपण उभे असतो. येणारे नवीन वर्ष त्याच्या पोतडीत नेमके काय घेऊन येणार आहे? याची आपल्याला उत्सुकता असतेच, मात्र या काळाच्या पोतडीत सुखाचे लखलखणारे चांदणे असेल तर त्या चांदण्यांना फुलवणार्या काळेकुट्ट दु:खाचा कॅनव्हास राहणारच आहे, हे आपल्याला माहित असूनही आपल्याला फक्त सुखाच्या चांदण्याची ओढ असते.

जीवनातील खरतड वाटेवरचे खाचखळगे कुणाला चुकले आहेत? थकून भागून 'चला हे वर्ष निघून जाईल, नवीन वर्ष येईल आणि सर्व चांगले होईल'. हा आशावाद कधीपासून कार्यरत आहे हे सांगणे कठीण... मात्र नवीन वर्षाच्या पहाटे मन पुन्हा उभारी घेणार. मरगळीची पानगळ झटकून हिरवी कोवळी पालवी जन्मास येणार असे आपल्या प्रत्येकाला वाटत असते. काळाची ओरखडे काळजावर उमटवून अनेक वर्ष आले तसे गेलेत, वर्षाच्या रकान्यात नाव बदलून जीवनात काय फरक पडणार? ही सजग जाणीव असली तरी नवीन वर्षाच्या सकारात्मक फसव्या, भुलव्या स्वप्नानां आपण भुलून जातो. कारण काळाचा हल्ला झाल्यावर आपण हतबल असतो. ही हतबलता स्वीकारण्याची हिम्मत खरे तर आपल्यात नसते आणि म्हणूनच आपण त्या फसव्या स्वप्नात सत्याचा अविष्कार शोधत नव्या उमेदीने उभे राहतो. दवांच्या ओल्या दहीवरात मुलायम वाटणारी ही पहाट आपल्याला भारुन टाकते. हे भारून टाकणारे क्षण ओळखी अनोळखी घाटातून आणि वाटातून आपल्यापर्यंत येतातच. ह्या मुहूर्तावर नवीन कामाचे संकल्प करून ते पूर्णत्वास नेण्याचा चंग अनेकांनी मनात बांधलेला असतो.

माझ्यासारखे अनेकजण तर 'लहानपणी एक जानेवारीपासून नियमित व्यायाम करायचा, पहाटे धावायला जायचे ह्या संकल्पापासून आता खूप झाले बरं, ढेरी दिसू लागली आतातरी नवीन वर्षात हळूहळू का होईना फिरणे सुरू करावे लागेल' या वयापर्यंत कधी पोहोचले ते कळले नाही, पण नवीन वर्षाच्या पहाटे नवीन वर्षी आवर्जून तोच संकल्प किती वेळ करावा लागतोय याबाबत विचार करायलाही पण वेळ काढत नाही. जुने वर्ष सरते आणि नवीन वर्षाचा रथ आपल्या वेगाने धावू लागला, की साधारण पहिल्या आठवड्यात तारीख आणि महिना बरोबर लिहिला तरी आपण आपल्या सही खाली जुनेच वर्ष अधोरेखित करत आहोत हे जसे लक्षात येते अगदी तसेच आठ दहा दिवसांपूर्वी केलेला संकल्पही आपण पूर्ण करण्यासाठी वेळ काढू शकत नाही असे म्हणत आपण स्वत:चे समाधान करून घेतो. तसेही जुने वर्ष निघून जात असलं तरी ते पूर्णपणे आपल्या मनातून कधीच निघून जात नाही, त्याच्या समृद्ध सुखाच्या किंवा संपन्न दु:खाचे पडसाद ते आपल्या मनाच्या कप्प्यात कैद करून ठेवत. या रेंगाळणाऱ्या अनेक आठव खुणा आपल्याला जीवनभर वाट दाखवण्याचे काम करत असतात. या प्रवासात नवीन वर्षाच्या वळणावर कोणता रम्य देखावा आपली वाट पाहत आहे याची उत्सुकता आपल्याला लागलेली असते. सरत्या वर्षाच्या पाऊलखुणांचा मागोवा जितका वास्तव येत्या वर्षाच्या पाऊलखुणाचा आदमास तेवढाच अनाकलनीय आणि फसव्या मोहाचा.

नवीन वर्ष सुरू होण्यापूर्वी रानातल्या बोरी आंबट गोड बोरांनी लगडलेल्या असतात जणू काही जाणारे वर्ष आणि येणारे वर्ष आपल्या पदरात आंबट गोड आठवणीची उधळण करणारे असते हेच ते काटेरी झाड आपल्याला सांगत असते. धुक्यातून हरवलेल्या रानवाटा कुंद होऊन पडलेल्या असतात अशावेळी त्याच वाटेने रात्रीच्या अंधारात एखादे वर्ष माघारी फिरते आणि उजाडणीच्या वेळेस त्याच वाटेने नवे वर्ष प्रसन्नतेने आपल्यासमोर उभे राहते. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी मनाची तयारी करत असतांना कधीकधी मन उगाच भूतकाळात जाऊन पोहोचते, नवीन वर्षाच्या स्वागतासाठी स्वत:च्या हाताने तयार केलेल्या भेटकार्ड आणि पुढे आर्चिस गॅलरीतील आकर्षक भेटकार्डे, त्याही पुढे जाऊन मराठमोळी अस्मिता दाखवण्यासाठी प्रसाद कुलकर्णी यांच्या शब्दातून साकारलेले मराठी शुभेच्छापत्रे ह्या सर्व आठवणी मनातून जे खाली लागतात. मी स्वत: अनेक जवळच्या लोकांना स्वत:च्या शब्दात लिहिलेले शुभेच्छापत्र दिल्याच्या आठवणी मनात अजूनही ताज्या आहेत. नवीन वर्षाचे असंच एक आकर्षण म्हणजे दिनदर्शिका. मेहकरमध्ये माझ्या लहानपणापासून आजही घरोघरी फिरून कॅलेंडर विकणारे मानवतकर मामा आले की बँकांचे, संस्थांचे, वर्तमानपत्रांचे असे विविध कॅलेंडर घरात असले तरी त्या मामांकडून कॅलेंडर विकत घेण्याची आपुलकी आज ३०-३५ वर्षात कायम आहे. याचे समाधान आहे कारण अनेक दिनदर्शिका बदलल्या तरी आपण बदललो नाही ही जाणीव माझी मलाच आनंद देणारी ठरते. दिनदर्शिकेबाबत डॉक्टर लोकांकडे येणार्या दिनदर्शिका मला जास्त मोहात पडतात. कॅलेंडर प्रमाणेच नवीन वर्षाच्या डायर्या ही एक आनंद देणारी बाब असे, माझ्या घरी माझे वडील भारतीय स्टेट बँकेत असल्याने त्या बँकेची डायरी आणि आकर्षक असे कॅलेंडर २०११पर्यंत आवर्जून घरी येत असे, आणि ती माझ्या पुढे ठेवून, घे लिही ह्याच्यात कविता आणि जरा अक्षर सुधार असं वडील आवर्जून म्हणत.

पुढे लहान भाऊ एलआयसीमध्ये काम करू लागल्यावर त्याच्या डायऱ्याही घरात जमा होऊ लागल्या. मात्र २०११ मध्ये बाबा गेले त्यांच्या सोबत त्या डायर्या आणि कॅलेंडरही येणे बंद झालं, मात्र मनात दु:ख आहे ते २०११ पासून हक्काने बोलणारे, रागावणार छत्र डोक्यावर उरलं नाही त्याच. जाणाऱ्या वर्षाचा सूर्यास्त आणि नवीन वर्षाच्या सूर्योदय पाहण्यासाठी अनेक भ्रमणप्रेमी गावापासून दूर पर्यटन करत सरत्या वर्षाला निरोप देत असतात. मला मात्र माझ्या गावातील सूर्य माझ्याच क्षितिजावर रेंगाळून केसरी झालेला आवडतो.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी रिकाम्या होणाऱ्या दारूच्या बाटल्या,डीजे वरील नाचगाणे मला आवडत नसले तरी अनेकांना त्याच्या शिवाय नवीन वर्षात उडी मारल्याचे समाधान होत नाही. वेळ धावतच राहते, आठवणी धूसर होऊ लागतात. नव्याची सवय होऊ लागते, एक तारीख बदलते, वर्ष बदलते मात्र मौसम होते तसेच राहतात, ऋतू आहेत तसेच राहतात माणस, माणसाचा स्वभाव असं सर्वकाही अगदी होतं तस असल्याची जाणीव होते. अश्या ह्या नवीन वर्षाने येताना कसे यावे याबाबत माझ्या काही अपेक्षा आहेत, त्या दरवर्षी असतातच. त्या पूर्ण झाल्याचे समाधान आजपर्यंत कधीही मिळाले नाही. मात्र, आपल्या अपेक्षा पूर्ण न करणाऱ्या आपुलकीच्या आणि जिव्हाळ्याच्या माणसांवर मी कधी नाराज झालो नाही तर ज्या काळाचे मी गुलामी करतो त्या काळावर नाराज होण्याचा हक्क तरी मी कुठून उपलब्ध करू? असा प्रश्न माझ्यापुढे उभा असला तरी नवीन वर्ष कसे असावे ते मला सांगावेच वाटते आणि मग मी नवीन वर्षाचे एक पसायदान लिहून मोकळा होतो, **व्हावे लयबद्ध, दिलाश्याचे शब्द, उजळो प्रारब्ध, सामान्यांचे। मानवास लाभो, यथार्थ सुबत्ता, विचारित पत्ता, सुख येवो। प्रसन्न हसावा, आकाशीचा राणा, चिमणीस दाणा, मिळो यंदा। निर्भय जगव्या, गावातल्या पोरी, जीव देण्या दोरी, शोधू नये। पिकून विकावा, माल सारा रास्त, शेतकरी स्वस्त, ठरू नये। भ्रष्ट ती व्यवस्था, बदलावी सारी, जन्म होता प्यारी, लेक वाटो। उगवत्या सूर्या... तुला हा सलाम, माणूस गुलाम, ठेवू नको।**

अशा साध्या आणि सरळ सोप्या अपेक्षा दरवर्षी उगवणाऱ्या नवीन सूर्याच्या कडे मी व्यक्त करतो. मात्र, दिलासांच्या शब्दाचे खैरात जगाकडे मागावी आणि ती पूर्ण व्हावी इतकी दानत आजच्या काळातील माणसाकडेच उरली नाही तर मग ती हृदयात अंगार घेऊन फिरणार्या सूर्याच्या मनात (पान ६ वर)

पान १ वरून

## विकासाच्या पुढच्या टप्प्याची पायाभरणी

पुढाकार घेतल्याचे आपल्याला सहज दिसून येईल. भारताच्या व्यापाराचे प्रमाण पाहिले तर सुमारे ९५ टक्के इतके, तर मूल्याच्या प्रमाणात पाहिले तर त्यापैकी ७० टक्के व्यापार हा सागरी मार्गानेच होतो. त्यामुळेच बंदरे आणि जहाजांची कार्यक्षमता हा स्पर्धात्मकतेचा मुद्दा असल्याचे, आपल्याला नाकारता येणार नाही. याअनुषंगानेच सरकारने 'भारतीय बंदरे कायदा-२०२५' लागू केला. आता या कायद्याने जुन्या वसाहतकालीन कायद्याची जागा घेतली आहे. 'मर्चंट शिपिंग क्ट-२०२५' आणि सागरी मार्गाने 'वस्तुमाल वाहतूक कायदा-२०२५' या माध्यमातून, सरकारने जहाजबांधणी आणि मालवाहतुकीशी संबंधित कायद्यांना आधुनिक स्वरूप मिळवून दिले. तसेच सागरी मालवाहतुकीशी संबंधित कायदे, जबाबदाऱ्या आणि उत्तरदायित्व, त्याचबरोबर समकालीन व्यापाराला अनुरूप आधुनिक स्वरूप मिळवून देण्यासाठी, ते अद्ययावत करण्याचे कामही सरकारने याच वर्षात केले.जहाजबांधणी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने, ६९ हजार, ७२५ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. याअंतर्गत २५ हजार कोटी रुपयांच्या सागरी क्षेत्र विकास निधीसह (एमडीएफ) आर्थिक सहाय्याशी संबंधित, इतर घटकांचाही समावेश आहे. या क्षेत्रात सखोलता निर्माण करणे, अवलंबित्व कमी करणे आणि मालवाहतुकीवर खर्च होणारे मूल्य भारतातच राखून ठेवणे हा यामागचा उद्देश. खरेतर हे एक आदर्श औद्योगिक धोरण म्हणायला हवे कारण, यामुळे जोखिमांबाबत स्पष्ट आराखडा समोर असल्याच्या परिस्थितीतच, खासगी भांडवलाची गुंतवणूक होणार आहे. त्याचवेळी केवळ बंदरांच्या ठिकाणीच नाही, तर जहाजबांधणी केंद्रे, सुटे भाग, अभियांत्रिकी आणि सेवा क्षेत्रातही रोजगाराची निर्मिती होऊ शकणार आहे. या जोडीला सरकारने ऊर्जा क्षेत्राअंतर्गत केलेल्या सुधारणांची आखणीदेखील, दीर्घकालीन गुंतवणुकीचे उद्दिष्ट समोर ठेवूनच केली आहे. तेल क्षेत्र दुरुस्ती, तसेच 'पेट्रोलियम आणि राष्ट्रीय वायू इंधन नियम-२०२५' या नव्या नियमांच्या माध्यमातून, सरकारने भाडेतत्त्वाच्या संपूर्ण कालावधीत अटींमध्ये स्थैर्य राखण्यावर भर दिला. या माध्यमातून सरकारने, गुंतवणूकदारांची जोखीम कमी करण्याचाही प्रयत्न केला आहे. दुसरीकडे 'ओपन एकरेज लायसन्सिंग पॉलिसी' (ओएएलपी) अंतर्गत, उत्खननाचे क्षेत्र विस्तारण्याची प्रक्रिया निरंतरपणे सुरूच आहे. याच दृष्टीने सरकारने दहाव्या फेरीत सुमारे ०.२ दशलक्ष चौरस किलोमीटर क्षेत्रातील २५ ब्लॉक्समध्ये, उत्खननाला परवानगी देण्यासाठी पुढाकार घेतला होता. प्रामुख्याने खोल सागरी क्षेत्र आणि अत्यंत खोल सागरी क्षेत्रात, उत्खननाच्या संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या होत्या. यासोबतच, 'नॅशनल डीप वॉटर एक्सप्लोरेशन मिशन' ही मोहीमही सरकार राबवते आहे. सरकारने २०२५च्या अर्थसंकल्पात अणुऊर्जा अभियानासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद केली होती. 'स्मॉल मॉड्युलर रिक्टर्स' (एसएमआर) आणि इतर प्रगत डिझाईन्सना गती देणे, हा यामागचा मुख्य हेतू. २०४७पर्यंत १०० गीगावॅट अणुऊर्जा क्षमतेपर्यंत पोहोचण्याचे आपले राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करता यावे, याअनुषंगानेच ही तरतूद करण्यात आली. याअंतर्गत २०३३ पर्यंत देशात स्वदेशी बनावटीचे पाच 'स्मॉल मॉड्युलर रिक्टर्स' कार्यान्वित करण्याचे लक्ष्य सरकारने समोर ठेवले आहे. एकूणच, २०२५ या वर्षात सरकारने केलेल्या या सर्व सुधारणांमधून एक स्पष्ट आकृतिबंध आपल्या समोर उभा राहतो, तो म्हणजे कायद्यांच्या पुस्तकी गुंतागुंतीपासून सुटका, किरकोळ तांत्रिक बाबींची गुन्हेगारी स्वरूपापासून मुक्तता, कामगारविषयक अनुपालनांचे आधुनिकीकरण, बाजारविषयक प्रशासनाला बळकटी देणे, उद्योग-व्यापारविषयक प्रक्रियांचे डिजिटायझेशन, व्यावसायिक वाहतूकविषयक व्यवस्थेत सुधारणा आणि ऊर्जा क्षेत्रातील दीर्घकालीन गुंतवणुकीमधील जोखिमांमध्ये या पैलूंनी व्यापलेला हा आराखडा आहे. उत्पादकता अनेक पटींनी वाढत राहावी, यासाठी उद्योजकांवरील ताण कमी करणे हेच सरकारचे काम असल्याची बाब आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी कायमच मांडत आले आहेत. हाच 'रिफॉर्म एक्सप्रेस-२०२५'चा खरा धोरणात्मक अर्थ आहे. सरकार अत्यंत शांतपणे करत असलेली ही कामे आणि प्रयत्नांमध्येच, विकास दरातील दोन अंकी वाढीकडे होत असलेल्या भारताच्या विकास यात्रेच्या पुढच्या टप्प्याची बीजे पेरली गेली आहेत. विशेष म्हणजे, एकीकडे अनेक देश आपल्या मार्गापासून भरकटलेले असताना, भारत मात्र हे काम अतिशय सातत्यपूर्णतेने करतो आहे. (लेखक केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री आहेत.)

## जग अस्थिरतेच्या मार्गावर

महाशक्ती म्हणून चीनचा उदय झाला असला, तरी हा देश आर्थिक महासत्ता आहे. लष्करी क्षेत्रात मात्र चीन अमेरिकेच्या बराच मागे आहे. ९० च्या दशकात काही काळापुरती अमेरिका ही एकच महाशक्ती जगात होती. परंतु, कालांतराने म्हणजेच २१ वे शतक उजाडता अमेरिकेचा लष्करी आणि आर्थिक प्रभाव कमी होऊ लागला. स्वाभाविकच भारतालाही त्याची झळ बसली. परंतु, अमेरिकेच्या या धोरणांचा फटका सहन करणारा भारत हा एकमेव देश नाही. त्याच्याबरोबर सर्व युरोपीय देश आणि दक्षिण अमेरिकेतील ब्राझील, आफ्रिकेतील दक्षिण आफ्रिका इत्यादी देशांनाही याची झळ पोहोचली आहे. थोडक्यात, आज आर्थिक आघाडीवर अमेरिका विरुद्ध बाकीचे जग असे चित्र निर्माण झाले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर एक काळ अमेरिका आर्थिकदृष्ट्या संपूर्ण जगाला पुरून उरणारा देश होता. परंतु, आजची स्थिती वेगळी आहे. आज अर्थव्यवस्थेबाबत चीन अमेरिकेचा तुल्यबळ आहे. लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनेही अमेरिकेला शह देऊ शकणाऱ्या राष्ट्रांचा गट 'ब्रिक्स'च्या नावाने पुढे येत आहे. यात भारत, रशिया, चीन, ब्राझील इत्यादी देशांचा समावेश आहे. थोडक्यात सांगायचे तर, गेल्या शतकात करू शकत होता तशी धोरणे आणि दंडेली अमेरिका करू शकेल अशी आजची स्थिती नाही. पण अमेरिका हे विचारात घेत नाही. विचार करता कळते की, जगातील सर्वच संघर्ष त्या त्या राष्ट्रांची शक्ती आणि उद्दिष्ट यांचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे होत आहेत. आज जगातील सर्व महत्त्वाच्या देशांचे नेतृत्व घड्याळाचे काटे फिरविण्याची इच्छा ठेवून आहे. ट्रम्प यांना १९५० च्या दशकातील अमेरिकेचे वर्चस्व परत आणायचे आहे. म्हणूनच मग त्याला 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' हे गोंडस नाव दिले जात आहे. परंतु आज जागतिक परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. चीनमध्ये शी जिनपिंग यांना हजार वर्षांपूर्वीचे जुने चिनी साम्राज्य उभे करायचे आहे. म्हणूनच आज चीन भारताच्या सीमाभागांवर तसेच दक्षिण चीन समुद्रावर दावा करत आहे. म्हणजेच पुतिन आणि ट्रम्प यांना बदललेल्या परिस्थितीशी जुळवून घेता येत नाही. तीच गत शी जिनपिंग यांचीही आहे. भारतामध्ये मोदींना रामराज्य परत आणायचे आहे. परंतु, मध्यंतरीच्या हजार वर्षांच्या काळामध्ये देशाच्या सामाजिक परिस्थितीमध्ये झालेला आमूलाग्र बदल लक्षात घेता भारत हे हिंदू बहुसंख्य राष्ट्र असले, तरी हिंदू राष्ट्र कधीच होऊ शकत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे देशाच्या २० टक्के लोकसंख्येचा या कल्पनेला विरोध आहे. अशा प्रकारे हे उद्दिष्ट सद्यस्थितीत तसेच भविष्यकाळातही साध्य न होणारे आहे. जागतिक नेतृत्वांची ही विचारसरणी जगातील अस्थिरतेच्या तसेच अशांततेच्या मुळाशी आहे. येत्या वर्षात यात काही बदल होण्याची शक्यता दिसत नाही. पण विचारसरणी बाजूला ठेवून जागतिक नेतृत्वाने यथार्थवाद आपलासा केला तर मात्र येत्या काळात जगात शांतता नांदू शकते.

**प्रा. शशिकांत जाधव हे मराठी विषयाचे उत्कृष्ट प्राध्यापक आहेत. ते विद्यार्थी प्रिय प्राध्यापक असून एक लेखक, कवी व समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. शब्दकळा साहित्य संघ, मंगळवेढा याचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. दरवर्षी जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात मंगळवेढा येथे साहित्य संमेलन भरवून सर्व साहित्यिकांचा येथोचित सत्कार स्वखर्चाने करतात. त्यांच्या पुन्हा स्वातंत्र्याच्या शोधात या कवितासंग्रहात आजच्या वास्तवतेवरील बऱ्याच विषयांना त्यांनी आपल्या ओघवत्या लेखणीतून आपले विचार मांडले आहेत. आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याच्या बाबतीत ते असे म्हणतात .**

## पुन्हा स्वातंत्र्याच्या शोधात

पुस्तक परिक्षण
नरेंद्र गुंडेली पद्मकवी
भ्र. ९८२३६४८७६५

**नाही बापू तुमच्या क्रांतीच स्वप्न**
**देशद्रोह्यांना पूरं करता नाही आलं**
**या पंच्याहत्तर वर्षाच्या स्वातंत्र्ययुगात**
**कुणब्याला जगताही नाही आलं**

मायबाप सरकारबद्दल शेतकऱ्यांची व्यथा अत्यंत पोटतिडकीने ते मांडतात. शेतकऱ्यांची होणारी दैना त्यांना पहावत नाही. शेतकरी कुणब्याविषयी मायबाप सरकार बद्दल लिहितात.

**कुणब्यांना कोणी कर्ज देत नसतो**
**श्रीमंताची कागदपत्रे पहात नसतो**
**स्टॅम्पवाले, शेअर्सवाले,**
**आदर्शवाले, बलात्कारवाले असे**
**राम निर्दोष सुटले तरी चालतील**
**कर्जबुडव्या मल्ल्याचा विजय झालाच**
**पाहिजे, पण मायबाप सरकार टिकलं पाहिजे**
**आमचं मायबाप सरकार टिकलं पाहिजे**

दारुड्या नवऱ्यासोबत संसार करणाऱ्या महिलेविषयी ते अत्यंत करुणा बाळगतात. पोटच्या गोळ्यांसाठी अपार कष्ट करणाऱ्या दारिद्र्यात जीवन व्यतीत करणाऱ्या विषयी म्हणतात.

**ज्या माता पोटच्या गोळ्यासाठी**
**अनेक कष्ट उपसतात**
**मज सारखे अनेक शब्द वेडे**
**तिला 'आई' म्हणूनच संबोधतात**




आजकाल राजकारणातील नेते रातोरात पक्ष बदलतात. सत्तेच्या खुर्चीसाठी पक्षनिष्ठा गहाण ठेवतात. कार्यकर्त्यांच्या मर्जीनुसार म्हणून आपली टोपी बदलतात. प्रसंगी पांढऱ्या रूपातील नेते सरड्यासारखे रंग बदलतात, याविषयी ते म्हणतात.

**पारतंत्र्यातील शूरवीरांनो**
**स्वातंत्र्याचे हेच स्वप्न होते का?**
**पुन्हा स्वातंत्र्याच्या शोधात तुम्ही**
**त्यासाठी पुन्हा, तुम्ही जन्म घ्याल का?**

विनाअनुदानित शिक्षकांची होणारी होरफळ त्यांनी अत्यंत सहानुभूतीने मांडली आहे. परिस्थितीशी झुंज देत होणारी अवहेलना त्यांना सहन करावी लागते. ना पुढे जाता येत नाही, ना मागे येता येत नाही. 'दोरी' या कवितेत ते म्हणतात,

**आई सुखात ठेव गं माझ्या पिल्ल्याला**
**लहान सहान लेकरूच की गं ते**
**बाप कुठे गेला? विचारलं तर सांग**
**अनुदान शोधण्या त्याची काया दहनात गेली**

आज काल राजकारणातील स्वार्थी नेते सत्तेसाठी काही करायला डगमगत नाहीत. कोणाशीही, कशीही अभद्र युती करून ज्या तत्त्वावर जनता त्यांना निवडून देते ते तत्त्वच विसरून जातात. अशा साठी ते म्हणतात,

**अशा बाजिंद्या सत्तेसाठी**
**किती लाल गोठणार आहात**
**असा लोकशाही धर्माचा झेंडा**
**स्वार्थी सत्तेसाठी किती फाडणार आहात?**

भारतातील राजकारणात घराणेशाही पसरलेला आहे. एका नंतर पुढची पिढी वारसा चालवायला तयार असते. कार्यकर्त्यांना मात्र सतरंज्या उचलायचे त्याच्या भाळी लिहिलेले असते. घोषणा देणे एवढेच काम असते. त्यावर प्रहार करताना 'फेल गुड' कवितेत म्हणतात,

**घराणेशाहीचे राजकारण**
**देशभर पसरू लागलं**
**दीनदुबळ्यांचं अश्रू**
**गालावरून ओसरू लागलं!**

बहुजनांच्या आधारावर शिवरायांनी महाराष्ट्र उभा केला आहे. महिलांच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले यांनी अतोनात कष्ट सोसलेत. क्रांतिवीरांनी स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती दिलेली आहे. अशा देशात आराजकता आहे. 'शोधतो आहे' कवितेत ते म्हणतात

**स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर पार करणाऱ्या**
**चांद्रयान युगात साम्राज्यशाहीच्या**
**गुलामगिरीतून स्वातंत्र्याचा शोध घेतो आहे**

राजकारणात पैसाच सर्वस्व झालेला आहे. पैशाच्या जोरावर रातोरात सत्ता काबीज केली जाते, पक्ष फोडले जातात. पैसाच सर्व काही करवितो याबद्दल आपल्या वात्रटिकांमध्ये म्हणतात,

**दोन्ही झेंड्यांना तो सांगतो आहे**
**मी तुमचाच आहे**
**पस्तीस गावाला वाटतो**
**तो आमचाच आहे**

प्रा.शशिकांत जाधव स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर झालेल्या स्थित्यंतराचे अतिशय सूक्ष्म निरीक्षण करून सदरची काव्यरचना अत्यंत पोटतिडकीने मांडलेली आहे. वाचकांना सदरची काव्यरचना निश्चितच भावेल, अशी माझी खात्री आहे. शब्द शिवार प्रकाशनाने सदरच्या काव्यसंग्रहाची उत्कृष्ट मांडणी केलेली आहे. सुंदर असे मुखपृष्ठ साकारलेले आहे. सदरच्या पुस्तकाला डॉ.महादेव देशमुख यांची प्रस्तावना लाभलेली आहे. मलपृष्ठ लिखाण जेष्ठ कवी सुरेश शिंदे यांचे मिळालेले आहे.

**पुस्तकाचे नाव:** पुन्हा स्वातंत्र्याच्या शोधात (काव्यसंग्रह )
**लेखकाचे नाव:** प्रा.शशिकांत जाधव
**पाने:** ७६
**पुस्तक मूल्य :** १५० रूपये.

## नीळ-प्रभा दिसे निळेपण वसे, निळीये आकाश हारपल

संत

**प्रकाश एदलाबादकर**

प्रवासात असलो म्हणजे टीव्ही बघायला मिळत नाही. माझ्या कारमध्ये तशी सोय अजून नाही आणि बघून बघून बातम्याच बघायची ओढ. मोबाईल असतोच जवळ. परंतु प्रवासात जर जंगलाची वाट किंवा अवघड घाट असेल तर तो मोबाईलही बहिरा आणि मुका होतो. अशा वेळेस शांतपणे गाडीच्या खिडकीतून बाहेरचा आसमंत न्याहाळणे हाच उद्योग असतो. अशाच एका प्रवासात घाटातून वळणे घेत घेत गाडी चालली होती. घाटाचा चढाव एकदमच तीव्र चक्राकार होता. दिवस हिवाळ्याचे होते. दुपारचे साडेतीन-चार वाजण्याचा सुमार होता. गाडीच्या प्रत्येक वळणानिशी निसर्ग आपले रूप पालटत होता. उतरत्या उन्हाची चकाकणारी किरणे त्यावर सोन्याचा मुलामा चढवित होती. बदलत नव्हता मात्र एकच रंग! तो म्हणजे आभाळाची अथांग निळाई! कोणत्याही कोनातून बघा, आकाशात उगाचच रेंगाळणारे दोन-चार बारके चुकार ढग सोडले, तर सर्वत्र अथांग निळाई. ही अथांग निळाई मी डोळ्यात भरून घेत होतो, आधाशासारखी पीत होतो. निळा रंग हा मनात भरलेल्या करुणेचा, चित्तामधल्या रसरंगांचा, भक्तीच्या सागरातील जिवंत थेंबस्पर्शाचा, मनात दाटलेल्या भक्तिगंधाचा. मी भान हरपून ती निळाई निरखत होतो. आकाशाचे ते निळेपण सर्वांगाला लपेटून घ्यावे, असेच सारखे वाटत होते. ग्रेसच्या ओळी मनात रिंगण घालायला लागल्या...

'असे रंग आणि ढगांच्या किनारी।
निळे ऊन लगे मला साजणी
निळे घाटमाथे निळ्या राऊळांचे।
निळाईत माझी भिजे पापणी
निळ्याशार मंदार पाऊलवाटा।
धुक्याची निळी भूल लागे कुणा
तुला प्रार्थनेचे किती अर्घ्य देऊ।
निळ्या अस्तकालीन नारायणा ।।'

हा संधिकाळ म्हणजे खरा साधनेचा काळ. मनातले आर्त झऱ्यासारखे बाहेर येते. कुणाच्या तरी हुळहुळत्या आठवणीने मन कातर होत होते. संधिकाळ, मग तो गोपाळ मुहूर्तावरचा असो किंवा गोरज मुहूर्तावरचा असो, मनाला नेहमीच हुरहूर लावणारा असतो. गोपाळ मुहूर्तावर मन प्रसन्नतेने काठोकाठ भरलेले असते तर गोरज मुहूर्तावर करुणेने! मनाच्या धारणांना अशा कातरवेळी हजारो अंकुर फुटतात. निळ्या आकाशाकडे बघताना आपणही त्याचाच अंश होतो. वृत्ती एकाग्र आणि नम्र होतात. मन रामरूप होते...

'नाभासारिखे रूप या राघवाचे । मनी चिंतिता मूळ तूटे भवाचे ।
तया पाहता देहबुधी उरेना । सदासर्वदा आर्त पोटी पुरेना ।'

एका शब्दात समर्थांनी रामरूपाचे यथार्थ वर्णन केले आहे. परमेश्वर हा नभासारखा आहे. आकाश, आभाळ आणि नभ या तीनही शब्दांमध्ये सूक्ष्म फरक आहे. स्वच्छ निळाईने भरलेले निरभ्र अवकाश म्हणजे आकाश. मेघांनी गच्च भरलेले, ढगांनी दाटलेले ते आभाळ आणि करुणेच्या नितळ निळाईसह भक्तिगंधाने भरलेले ते नभ! न म्हणजे नम्रता आणि भ म्हणजे भक्ती. रूप, रस, गंध, स्पर्श आणि शब्द हे पंचमहाभूतांचे स्थायीभाव सांगितलेले आहेत. गंध हा पृथ्वीचा, रस हा पाण्याचा, स्पर्श हा वायूचा, ज्वलन हा तेजाचा म्हणजे अग्नीचा आणि शब्द हा नभाचा स्थायीभाव किंवा लक्षण आहे. आपले शरीरही पंचमहाभूतांपासूनच निर्माण झालेले आहे. म्हणूनच प्रभातकाळी या पंचमहाभूतांचे स्मरण करणे आवश्यक असते.

'पृथ्वी सगंधा सरसः च आपा स्पर्शीचवायुर्ज्वलनंच तेजा ।
नभः सशब्दम महता सहैव कुर्वंतु सर्वे मम सुप्रभातं ।।'

शब्द हा नाभाचा भाव आहे. सार्थ आणि भक्तीने ओथंबलेले शब्द नभाचे आणि पर्यायाने राघवाचे रूप घेतात. हे शब्द मनाच्या तळाशी शिंपल्यातल्या मोत्यासारखे जपून ठेवावे लागतात. या शब्दांच्या वीणीतूनच अवघ्या जीवनाचे वस्त्र विणले जाते. या जीवनाला आत्मसाक्षात्काराचा स्पर्श झाला की, करुणेची निरपेक्ष निळाई जीवनवस्त्राला प्राप्त होते.

साक्षात्काराचा वर्ण निळा असतो. हे निळे प्रसादचिन्ह म्हणजे साफल्याचा क्षण असतो. निळ्या आकाशाचा शब्द मग अनाहताचा नाद होतो. म्हणूनच प्रभू रामचंद्र, भगवान श्रीकृष्ण, आदिनाथ शंभू महादेव यांनी जणू हा नीलवर्ण स्वतःचा अंगराग म्हणून अंगीकारलेला आहे. 'गगनसदृशं मेघवर्णम शुभांगं'चे मर्म हे आहे. या मेघवर्णाला अनेक ठिकाणी श्यामवर्ण असेही संबोधलेले दिसते. श्याम म्हणजे निळा किंवा निळसर-काळसर. नीलवर्णाची छटा मिसळलेला. हा अत्यंत तेजस्वी असतो. परंतु, गंमत अशी आहे की, भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात नीलवर्ण हा बीभत्स रसाचा वर्ण आहे तर श्याम हा शृंगाराचा वर्ण आहे.

'श्यामो भवति शृंगारः सितो हास्य:प्रकीर्तिताः ।
कापोतः करुणश्चैव रक्तो रौद्र:प्रकीर्तिताः ।।
गौरो वीरस्तु विज्ञेयः कृष्णश्चैव भयानकः ।
नीलवर्णस्तु बीभत्स:पीताश्चैवादभुतः स्मृतः ।।'

असे असले, तरी 'श्याम' या शब्दाचा अर्थ पुढे निळसर काळा किंवा काळसर निळा असाच घेतला जातो. साक्षात्कारी संतसाहित्यात निळ्या रंगला अपार महत्त्व आहे. संत ज्ञानेश्वरांनी कृष्णाचे वर्णन 'सुनीळु' असे केलेले आहे. दुसऱ्या अध्यायात माउली म्हणते,

'म्हणोनि सहजे सुनीळु । कृपामृते सजळु ।
तो वोळला श्रीगोपाळु । महामेघु ।।'



इंद्रनील नावाचे एक रत्न आहे. ते निळे असते. भगवान श्रीकृष्णाचा रंग या रत्नासारखा निळा आहे, असे माउलीला अभिप्रेत आहे. विश्वरूपदर्शनयोगाच्या ११ व्या अध्यायात आपल्या रूपाचे वर्णन करताना भगवान म्हणतात...

'एकें शुद्धस्फटिकसोज्वळें ।
एकें इंद्रनीळ सुनीळे।
एकें अंजनाचल सकाळे ।
रक्तवर्णे एकें।।'

कृष्णाचा वर्ण निळा आहे, हे माउलीने आणखी एका स्थानी स्पष्टपणे म्हटलेले आहे.

'कैसे नीलोत्पलाते रावित।
आकाशाही रंगु लावित।
तेजाची वोज दावित।
इंद्रनीळा।। '

प्रत्येकच चित्रात या दैवतांचा वर्ण निळा का, याचा उलगडा व्हायला लागला. समर्थांच्या करुणाष्टकात, विशेषतः तिन्हीसांजेला, अशाच अथांग करुणेच्या नीलवर्णाचा अनुभव येतो. आकाशाचा निळा वर्ण हा सोशिकतेचा वर्ण आहे.

सर्वसमावेशकतेचा रंग आहे. निळ्या वर्णात आप-पर भावाला स्थान नाही. संत ज्ञानेश्वरांनाही हा नीलवर्ण अत्यंत प्रिय वर्ण आहे, हे वर उद्धृत केलेल्या अनेक वचनांवरून लक्षात येईल.

'नीळ-वर्ण रजे नीळ-वर्ण बुझे । नीळीमा सहजे आकारिली ।
नीळ-प्रभा दिसे निळेपण वसे । निळीये आकाश हारपले ।
निळेपण ठेले निळीये गोविले । निळेपण सोवळें आम्हां जालें ।
ज्ञानदेवो निळा पर-ब्रह्मी गोविला । कृष्णमूर्ती सांवळा हृदयी वसे ।'

यासाठी त्या निळ्या सावळ्याच्या कृपेचा वर्षाव सर्वांना हवा असतो. त्यासाठी भक्तीला करुणेचा नीलस्पर्श हवा असतो. हा स्पर्श झाला की, थेट भगवंताशी संवाद साधला जातो. आपल्या भक्तीला अहंकाराचा रक्तवर्ण लागला की, भगवंताशी तर दूरच; परंतु सर्व जगाशी आणि प्रत्यक्ष स्वतःशीच आपला संवाद तुटून जातो. स्वतःशीच संवाद तुटण्यासारखा दुर्दैवी प्रसंग नाही अहंकाराच्या रक्तवर्णापेक्षा करुणेचा नीलवर्ण केव्हाही श्रेष्ठ!

गाडीच्या खिडकीतून आकाशाकडे बघता बघता अनंत विचारांची आवर्तने सुरू होती. दिवेलागण झाली होती.

मुक्कामाचे ठिकाण हाकेच्या अंतरावर आले होते. आकाशाचा रंग बदलायला लागला होता. संध्यादेवीची सखी रजनी शांतपणे आकाशाला कवेत घेत होती. पिवळ्याफिकट चंद्रकोरीसोबत नक्षत्रमाला आणि तारांगण उतरून आले. त्या सावळ्याचे रूप डोळ्यात साठवून घेताना पुन्हा ग्रेस आठवला...

'निळेगार वारे जळाची शिराणी ।
निळ्या चंद्रओवीत संध्या डुले ।
निळे दुःख चोचीत घेऊन आली ।
निळ्या पाखरांची निळी पाऊले ।
निळे सूर आणि निळी गीतशाळा ।
निळाईत आली सखीची सखी ।
निळ्या चांदण्याने निळ्या चंदनाची ।
भिजेना परी ही निळी पालखी ।'

# मंत्रपुष्पांजली

## वैदिक राज्यशास्त्राचे सूक्त विधान

प्रबंधांची बीजे

**श्रीरंग हिर्लेकर**

मूर्तीवर मंत्रोच्चारपूर्वक पुष्पार्पण करण्यापूर्वी उच्चारण्यात येणारे हे सूक्त म्हणजे मंत्रपुष्पांजली. याचा थोडक्यात अर्थ सांगावयाचा तर ज्याप्रमाणे पूर्वी देवांनी यज्ञाद्वारे प्रजापतीचे पूजन करून यज्ञ आणि धर्मपालनाद्वारे स्वर्गप्राप्ती केली, त्याच कामनेने राजाधिराज वैश्रवण कुबेराला मी वंदन करतो. त्याने मला सर्व काही अनुकूल करून माझ्याही कामनांची पूर्ती करावी. आमची सत्ता कल्याणकारी असावी, आमचे साम्राज्य सर्व उपभोग्य वस्तूंनी समृद्ध असावे, आम चे महाराज्य आसक्ती आणि लोभमुक्त असावे. समुद्रवसना पृथ्वीच्या टोकापर्यंत अनंतकाळ परमश्रेष्ठ अशा महाराज्यावर आमचीच एकछत्री अधिसत्ता असावी.

जगातील सर्व सुष्ट व्यक्ती, शक्ती येथे सदैव आश्रयास असोत. सर्वत्र शांती वास करो. यात कुबेराची प्रार्थना असून त्याला कामेश्वर असे संबोधले आहे. कुबेर हा सर्व संपत्तीचा अधिपती. अर्थाशिवाय राज्य आणि सत्ता संभवत नाही. कौटिल्याचे राज्यशास्त्र म्हणजेच अर्थशास्त्र कारण अर्थप्राप्तीचा आधार पृथ्वी. तिचा सांभाळ, वृद्धी आणि रक्षणाची व्यवस्था ज्यात सांगितली आहे ते राज्यशास्त्र. अर्थामुळे सुखोपभोग मिळतात म्हणून त्यांचा ईश्वर तो कामेश्वर. नामसहस्रात विश्वंभर विश्वपती, विश्वपालक म्हणून विष्णूचा 'कामदेव कामपाल: कामी कान्तः कृतागमः' असा गौरव केलेला असून या व्यतिरिक्त-

'श्रीवत्सवक्षाः श्रीवासः श्रीपतिः
श्रीमतांवरः।
श्रीदः श्रीशः श्रीनिवासः
श्रीनिधिः श्रीविभावनः।
श्रीधरः श्रीकरः श्रेयः
श्रीमाँल्लोकत्रयाश्रयः।।'

अशा नामांत नीती, धृती, श्रुती, प्रीती, भक्ती अशा दैवी संपत्तीचे श्रेष्ठत्व वर्णिले आहे.

**वैदिक संदर्भ**: ऋग्वेद, तैत्तिरीय आरण्यकातील या मंत्रपुष्पांजलीचा नित्यब्रह्मकर्मातील देवेमध्येही समावेश आहे. यात अग्नी, वरुण, इंद्र, अश्विनी, मरुत, सूर्य, बृहस्पती या देवतांचे स्मरण करून नित्यब्रह्मकर्म आणि यज्ञीय अधिकारास देवसाक्षीने प्रारंभ असे हे आवाहन असते. राजा हा देवांचा प्रतिनिधी. तेव्हा त्याच्या स्तुतिपाठानंतर मंत्रपुष्पांजलीचे उच्चारण केले जाते. त्यातील शब्दरचना राज्यव्यवस्थेतील विविध टप्पे आणि कर्तव्यांच्या व्यापकतेची निदर्शक आहेत.

उपनिषदीय परंपरेतून 'योऽपां पुष्पं वेद-योऽन्नं वेद-अपां पुष्पं पृथिवी-पर्जन्यो वै अपां पुष्पम्' म्हणजे अन्न- पर्जन्य-पृथ्वी-प्रजा-यज्ञ-ऋत अशी शृंखला आहे. अर्थात ही सर्वसंगपरित्यागीं ऋषींसाठी नसून राजसत्तेसाठी आहे. वेदातही राज्य-राजा-यज्ञ-पर्जन्य-अन्न-प्रजा-स्थैर्य असाच क्रम असून 'राजा राज्यस्य गोप्ता' म्हणजे राजा हा राज्याचा पालक हा अर्थ ब्राह्मण ग्रंथ, उपनिषद आणि कौटिल्य असा सर्वत्र आढळतो.

यामुळे मंत्रपुष्पांजली म्हणजे वैदिक राज्यशास्त्राचे सूक्त विधान असे म्हणणे योग्य ठरते.

वैदिक राज्याभिषेकात असे घोषित केले जाते की, राजा हा देवांचा प्रतिनिधी नसून ऋतांचा रक्षक आहे. त्याची सत्ता ही आज्ञा नसून यज्ञ-कर्तव्य-जबाबदारी अशी आहे. राजा हा प्रजेसाठी आहे; प्रजा राजासाठी नाही. तेव्हा राज्याभिषेकानंतर राजाला विधिबंधनांची जाणीव करून देण्यासाठी हे मंत्रोच्चारण असते. मंत्रपुष्पांजली म्हणजे त्या ऋताची कार्यपद्धती. वरील शृंखला म्हणजे एक कठोर शिस्त आहे. गीता सांगते- 'यज्ञात् भवति पर्जन्यो: पर्जन्यात् अन्न संभव:' राज्य व्यवस्थित तर पर्जन्य व्यवस्थित, पर्जन्य नीट तर अन्नव्यवस्था चांगली आणि ती चांगली तर स्थैर्य. याउलट क्रमाने राज्यव्यवस्था बिघडली तर पर्जन्यमान ढळते, मग अन्न व्यवस्था बारगळते.



**तात्पर्य**: वेदोक्त राजकीय अर्थव्यवस्था आहे. राज्यशास्त्रधर्मशास्त्र-अर्थशास्त्र यांचे हे संयुक्त सूत्र आहे. उपनयनांतर राज्याभिषेकापूर्वी क्षत्रियाला पुढील मंत्रोपदेश केला जातो. वेदोनारायण गागाभट्टांनी शिवाजी महाराजांचे उपनयन करून हाच उपदेश केला. ब्राह्मणाला जे मोल गायत्री मंत्राचे, तेच क्षत्रियाला पुढील मंत्राचे.

'आ कृष्णेन रजसा वर्तमानो
निवेशयन्नमृतं मर्त्यं च।
हिरण्येन सविता रथेना देवा
याति भुवनानि पश्यन्।।'

म्हणजे प्रेरणादायी सूर्य सुवर्णरथावर आरूढ होऊन अंधकार उजळीत देव आणि मानवांना कार्यप्रवण करून उत्तर दिशेकडे अवलोकन करत मार्गक्रमण करीत आहे. राजसूय यज्ञ आणि राज्याभिषेक विधीतही वरील मंत्र उच्चारण्यामागे हाच भाव आहे. सत्ता म्हणजे गती, समन्वय आणि सर्वदर्शन. प्रजां रक्षति स धर्मः (प्रजेचे रक्षण हाच धर्म). राजाने धर्ममार्गाने प्रजारक्षण करावे. 'स नो बन्धुर्जनिता स विधाता.' राजा म्हणजे जनिता-बंधू आणि विधाता म्हणजे नियमनकर्ता.

वरील मंत्र मंत्रपुष्पांजलीचा कणा असून तिच्या रचनेच्या पायऱ्या अशा: १) अधिष्ठान हे ऋत, नियम आणि संविधानावर असावे. म्हणजे राजाने स्वेच्छाधारी नसावे, २) राजा देव नसून कर्ता आहे, तो धर्माचा वाहक आहे. त्याचे अधिकार कर्तव्यनिष्ठ आहेत. ३) त्याचे उद्दिष्ट- प्रजा पोषण, रक्षण, समत्व, स्थैर्य व शांती. थोडक्यात मंत्रपुष्पांजली ही व्यक्तिपूजा नसून व्यवस्थेची पूजा आहे. आता इतक्या दीर्घ प्रास्ताविकानंतर या मंत्रांचा अर्थ राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने बघू.

**१) राजाधिराजाय प्रसह्य साहिने** : सर्वोच्च सत्ता पण स्वेच्छाधारी नाही तर धर्मनिष्ठ. सत्तेने धर्ममर्यादेत राहावे.

**२) नमो वयं वैश्रवणाय कुर्महे:** कुबेर-अर्थसत्ता, कोषाध्यक्ष. यशस्वी राज्य चालवायचे तर आर्थिक शिस्त हवी.

**३) समे कामान् काम**

**४) कामाय मह्यम्:** प्रजेच्या योग्य इच्छा पूर्ण करणे हे राजाचे कर्तव्य.

**५) कामेश्वर** : राजाचे स्वतःच्या इच्छांवर नियंत्रण असेल तरच तो न्याय्य मार्गाने प्रजेला संतुष्ट करू शकेल.

कौटिल्याच्या मते राजा हा देव नसून धर्माचा पालक व नियंत्रक आहे. तो राजाधिराज असून त्याचे सर्व श्रेय देवतेला अर्पित असावे. धर्म आणि नीती हीच सर्वोच्च सत्ता. कुबेराला वंदन म्हणजे अर्थव्यवस्थेला शिस्त असावी. सवंग लोकप्रियतेच्या नादी लागून योजना आखू नयेत. कारण समृद्धता नसेल तेथे धर्मही राहत नाही. राजाचा काम म्हणजे भोग नव्हे तर प्रजाहित. कौटिल्याचा सिद्धांत सांगतो की, 'प्रजासुखे सुखं राज्ञ प्रजानां च हिते हितम्।' स्वतःच्या इच्छांचे नियंत्रण करू शकत नसेल त्याच्यावर प्रजेचे स्वामित्व सोपवू नये. राजा श्रीमंत योगी असावा. मंत्रमय पुष्प म्हणजे राज्यघटनेचे सार. त्यांची अंजली अर्पण करणे म्हणजे सत्तेचे धर्माप्रति समर्पण. मंत्रपुष्पांजली राज्य कारभाराचा दैनंदिन आचरण्याचा संविधानपाठ आहे. हिचे विस्मरण झाल्यास सत्तेचा नाश अटळ आहे. आपले राज्यशास्त्र हे धर्म- अर्थ-काम या त्रिपुटीच्या समन्वयावर उभे आहे. राजाधिराज हा सर्वोच्च असला, तरी धर्मापेक्षा मोठा नाही, हे सुचवून ते मंत्र म्हणजे राज्यघटना त्या व्यक्तीला वंदन करत नसून तर अंजली अर्पण करतात.

**मंत्रपुष्पांजलीतील राज्यव्यवस्थेची विविध रूपे**

**१) स्वराज्य** : स्वतःच्या भूमीवर स्वतःचे शासन. लोकइच्छेवर आधारित सत्ता. शिवाजी महाराजांनी हे ओळखून हे राज्य व्हावे 'हे तो श्रींची इच्छा' हा मंत्र दिला किंवा लोकमान्यांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे' असे सांगितले. अशा मंत्रांचे बळ असेल तेथे स्वराज्य संभवते.

**२) भौज्य** : भूमीतून उगवते त्या सर्व उपभोग्य संसाधनांवर आणि संपत्तीवर अधिकार हवा. महाराजांनी प्रजेच्या संपत्तीचे रक्षण केले, न्यायनिवाडे करून प्रजाजनांचे पूर्वापार हक्क अबाधित ठेवले. महात्माजींनीही याच दृष्टिकोनातून ब्रिटिशांविरुद्ध मिठाचा सत्याग्रह केला.

**३) सार्वराज्य** : सर्व संबंधित, अनुकूल, प्रतिकूल, प्रासंगिक सत्तांवर मैत्रीपूर्ण पण साम्राज्यात्मक पद्धतीने वर्चस्व. कौटिल्याने यालाच षाड्यमैत्रीसंबंध असे म्हटले आहे.

(पान ६ वर)

## ओल्या मातीला आकार देताना...

उगवतीचे रंग

**विश्वास देशपांडे**
भ्र. ९४०३७४९९३२



लता मंगेशकर यांच्या लहानपणीचा एक प्रसंग आहे. लता ही मंगेशकर भावंडांमध्ये मोठी होती. त्यावेळी त्यांची परिस्थिती चांगली होती आणि मास्टर दिनानाथ हयात होते. एकदा त्यांच्या घरातील साबण संपला. त्यांच्या घरातील नोकर समोरच्या दुकानात साबण आणण्यासाठी गेला. परंतु त्याच्या हातात त्यावेळी जे दोन पैशांचे नाणे होते ते नाणे खोटे आहे, असे म्हणून दुकानदाराने साबण देण्यास नकार दिला. जेव्हा छोट्या लताला ही गोष्ट कळली तेव्हा तिला अतिशय राग आला आणि तो दुकानदार साबण कसा देत नाही ते मी पाहते असे म्हणून तिने त्या नोकराकडून ते नाणे घेतले. त्या दुकानदाराकडे जाऊन त्याच्या गल्ल्यात ते भिरकावले आणि मी मास्टर दीनानाथ यांची मुलगी आहे. मला साबण हवा आहे असे सांगितले. आता त्या दुकानदाराची पंचाईत झाली. त्याला गल्ल्यातून खोटे नाणे शोधता येईना. शिवाय मास्टर दिनानाथांची मुलगी खोटं कशाला बोलेल असे त्याल वाटले. त्याने साबण दिला आणि तो साबण घेऊन लता आनंदाने घरी आली. जेव्हा मास्टर दिनानाथांना ही गोष्ट कळली तेव्हा त्यांना अतिशय वाईट वाटले. त्यांनी तिला जवळ बोलावले आणि म्हटले, त्या दोन पैशांच्या नाण्यासाठी तू खोटं बोललीस! जा असाच्या असा हा साबण त्या दुकानदाराला परत करून ये आणि त्याला माझी चूक झाली आहे हे सांग. साबण घेण्यासाठी हे दुसरे पैसे घेऊन जा. त्यावेळी लताला बाबांच्या सांगण्याचा राग आला परंतु त्यांच्यासमोर बोलण्याची तिची हिंमत नव्हती. ती गेली आणि दुकानदाराला खरे काय ते सांगितले. तिच्या कोवळ्या मनावर त्यावेळी खोटे बोलणे चुकीचे आहे आणि आपल्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही हा संस्कार मास्टर दिनानाथांनी केला. असे अनेक प्रसंग त्यांच्या जीवनात घडले. आपल्या मनाला जी गोष्ट योग्य वाटते तीच कर. जी गोष्ट अयोग्य आहे असे आपले मन सांगते, ती कधीही करू नकोस. असे संस्कार मास्टर दिनानाथांनी मंगेशकर भावंडांवर केले आणि हे संस्कार पुढे कायम टिकले. अनेक प्रसिद्ध व्यक्तींच्या जीवनाला त्यांच्या आई-वडिलांनी लहानपणीच असे संस्कार करूनच आकार दिला आहे.

लहान मुलांना नेहमी ओल्या मातीच्या गोळ्याची उपमा दिली जाते. मातीचा गोळा ओला असताना त्याला हवा तसा आकार देता येतो. पण एकदा का त्यातील ओलावा संपला की त्यातील लवचिकता आणि आकार घेण्याची क्षमता नष्ट होते. त्यानंतरही आकार देण्याचा प्रयत्न केला तर त्याचे तुकडे पडतात. ज्या आई-वडिलांना, पालकांना आणि गुरुजनांना यातील मर्म कळले त्यांना मुलांना कसे घडवायचे हा प्रश्न पडत नाही. आज मानसशास्त्रामध्ये बालमानसशास्त्राचा अभ्यास मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. जीन पियोगेट, लेव व्योगोत्स्की, लिसन गोपनिक, रॉस थॉम्पसन इत्यादी शास्त्रज्ञांनी बालमानसशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे संशोधन केले आहे. त्यांच्या संशोधनामुळे शिक्षणतज्ज्ञ आणि पालकांना मार्गदर्शन मिळत आहे. परंतु तरीदेखील आजच्या काळात मुलांना घडवणे पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे. याची अनेक कारणे आहेत. पूर्वीची एकत्र कुटुंब पद्धती नष्ट होऊन विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आली आहे. घरामध्ये लहान मुलांकडे आवर्जून लक्ष देणारे कोणी उरले नाही. आई-वडील कामावर जाणारे असल्यामुळे त्यांना मुलांकडे लक्ष देण्यासाठी फारसा वेळ मिळत नाही. मुलांच्या शाळा आणि शिकवण्या या ठिकाणी जे संस्कार होतील त्यावरच त्यांना अवलंबून राहावे लागते. विभक्त कुटुंबांमध्ये हल्ली आजी आजोबांना स्थान राहिले नाही. बऱ्याच पाठ्यपुस्तकात आणि लहान मुलांचे पुस्तकात कुटुंब म्हणजे फक्त आई-वडील आणि मुले अशा प्रकारची चित्रे आणि पाठ दिलेले असतात म्हणजे ही गोष्ट जणू काही शासनमान्य झाली असे खेदाने म्हणावे लागेल. पण शासन किंवा पाठ्यपुस्तके ते सांगत नसेल तर ते सांगणे आई-वडिलांचे काम आहे. पूर्वी तर एकत्र कुटुंबात काका, काकी चुलत भावंड अशी अनेक माणसे असत. त्यासोबतच मुलांच्या हातात मोबाईल, टीव्हीचा रिमोट यासारखी साधने आली आहेत. जेव्हा पालकांना वेळ नसतो तेव्हा मुले त्यांना आवडतील असेच कार्यक्रम टीव्हीवर पाहतात. मोबाईलवर हवे ते गेम्स खेळतात किंवा नको त्या साइटस् पाहतात. आपली मुले कोणत्या मित्रांच्या संगतीत खेळतात हे देखील पालकांना माहिती नसते. अपघाताने एखादा प्रसंग घडतो आणि मुलांमध्ये निर्माण होणारे दुर्गुण आई-वडिलांच्या लक्षात यायला लागतात. अशा वेळी आपला मुलगा खोटं बोलतो आहे हे त्यांना कळतं. कधीकधी मुलं आक्रमक होतात आणि उलट उत्तर देतात. मोठ्या व्यक्तींची उद्धटपणे वागतात. कधी कधी अपशब्दांचा वापर करतात, घरातील वस्तूंची आदळआपट करून नुकसान करतात. हे सगळे पाहिल्यानंतर आई-वडिलांना सहाजिकच धक्का बसतो. त्यांच्या मनात प्रश्न येतो की आपण तर यांना असे काही शिकवले नाही, मग हे असे का करतात? तर याचे उत्तर घरामध्ये त्यांच्याकडे लक्ष देणारे कोणी राहिलेले नाही. त्यांना केवळ हव्या त्या वस्तू आणि त्यांच्या गरजा वेळोवेळी भागवल्या म्हणजे त्यांच्यावर संस्कार होत नाहीत. त्यांना वेळ देण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची गरज सर्वात जास्त महत्त्वाची असते.

संस्कार म्हणजे उपदेश नव्हे, सवय आहे. संस्कार म्हणजे धडपडताना दिला गेलेला हात, निसर्गात रुजवलेलं मूल्य, प्रेमाने दाखवलेली दिशा. संस्कार हे सांगण्यापेक्षा 'जगून दाखवण्याचे' असतात. संस्कारांसोबतच आई-वडिलांनी मुलांना द्यायचं असतं एक संवेदनशील मन. घर म्हणजे एक चालतंबोलतं पुस्तक असतं. घरातील मुले काही न बोलता हे पुस्तक मुकाट्याने वाचत असतात आणि त्याचे अनुकरणही करत असतात. जेव्हा वडिलांना मिळालेले बक्षीस किंवा पगार ते त्यांच्या आईच्या हातात ठेवून तिला नमस्कार करतात तेव्हा पुढची पिढीही हे पाहत असते. मग मुलांना जेव्हा पुरस्कार मिळतो तेव्हा त्यांना सांगावे लागत नाही तू पुरस्कार ते आई वडिलांच्या हातात ठेवून त्यांना आपोआपच नमस्कार करतात. काही सुशिक्षित आणि बालमानसशास्त्राची जाण असणारे पालक आपल्या या दृष्टीने मुलांसाठी वेळ देण्याचा प्रयत्न करतात. मोबाईल आणि टीव्हीवर नको ते कार्यक्रम पाहून मुलांच्या विध्वंसक वृत्तीत वाढ होत जाते. बाहेर आपल्या मित्रांमध्ये खेळताना त्यांनी दिलेल्या शिव्या किंवा वापरलेले अपशब्द मुले सहज आत्मसात करतात आणि आपल्या बोलण्यात त्यांचा वापर करू लागतात. पालकांशी किंवा शिक्षकांशी उद्धट वर्तन करतात. खोटं बोलणं, आक्रस्ताळेपणा करणं यासारख्या गोष्टी ते करतात. या सगळ्या प्रसंगी पालकांनी मुलांना समजून घेणे आवश्यक असते.

बहुतांश वेळी विश्वासात घेऊन, समजावून सांगून अशा गोष्टी चुकीच्या कशा आहेत हे मुलांना पटवून दिले पाहिजे. खोटं बोलल्याने किंवा मोठ्या व्यक्तींची उद्धटपणे वर्तन केल्यामुळे त्यांच्या मनातील तुमच्या प्रतिमेला कसा तडा जा-तो ते त्यांना समजावून सांगितले पाहिजे. आपले म्हणणे योग्य शब्दात सांगणे, संयम, शांतता आणि सहनशीलतेचे महत्व उदाहरणासहित पटवून देणे या गोष्टी अशावेळी महत्त्वाच्या ठरतात. सकारात्मक आणि चांगल्या वागण्याचे फायदे त्यांच्या लक्षात आणून दिले पाहिजेत.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, ४ जानेवारी ते शनिवार, १० जानेवारी २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ४ जानेवारी-** इष्टि, द्वित्तीया श्राध्द, भगवानबाबा पुण्यतिथी भगवानगड, समाधगिरजी महाराज पुण्यतिथी सोरडी (जत), केशवबुवा पुरकर पुण्यतिथी पारनेर, खंडोबा यात्रा कोरठण पिंपळगाव, श्री देव नाईकबाबा देवस्थान जत्रा मळेवाड (सावंतवाडी) ✻ **सोमवार, ५ जानेवारी-** तृत्तीया श्राध्द, खंडोबा यात्रा बलखड खानापूर, सातेरी केळबाई देवस्थान जत्रा फणसे, बसवलिंगेश्वर रथोत्सोव केसर जवळगा, परमहंस श्री योगानंद जन्मदिन ✻ **मंगळवार, ६ जानेवारी-** अंगारक चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २१: ०८, अहिल्यानगर- २१: १३, कलबुर्गी-२१: ०६, कोल्हापूर-२१: १८, जालना-२१: ०८, धाराशिव-२१: ०९, नांदेड-२१: ०२, पंढरपूर-२१: १२, परभणी-२१:०४, पुणे-२१: १७, बीड-२१: ०९, बीदर-२१: ०३, लातूर-२१: ०६, विजापूर-२१: ११, छत्रपती संभाजीनगर-२१: १०, सातारा-२१: १८, सोलापूर-२१: १०), आचार्य बाळशास्त्री जांभेकर जयंती, पत्रकार दिन, तळेश्वर यात्रा तळदेव, खंडोबा पाकळणी उत्सव पाल ✻ **बुधवार, ७ जानेवारी-** संत जळोजी- मळोजी सुतार महाराज पुण्यतिथी पंढरपूर, श्री धुंडामहाराज देगलूरकर पुण्यतिथी पंढरपूर, ब्राम्हणदेव मंदिर सावरघाट उत्सव, डिपोली, श्री भगवती देवी उत्सव मुणगे, देवगड ✻ **गुरुवार, ८ जानेवारी-** कोटणीस महाराज पुण्यतिथी सांगली, भालचंद्र महाराज जयंती कणकवली, हरिदास महाराज पुण्यतिथी अस्वलेवाडी (शिराळा) ✻ **शुक्रवार, ९ जानेवारी-** स्वामी विवेकानंद जयंती (तिथी), यल्लमा देवी यात्रा मणेराजुरी, भुवनेश्वर देवी यात्रा शिरवाड, कामादेवी यात्रा सांगवी (ता. राजापूर) ✻ **शनिवार, १० जानेवारी-** कलाष्टमी, गुळवणी महाराज पुण्यतिथी, रामानंदाचार्य जयंती, विश्व हिंदी दिनें स्नानारंभ, कुलधर्म, अन्वाधान, काळुबाई यात्रा मांढरगाव, राजमाता जिजाऊसाहेब भोसले जयंती (तिथीप्रमाणे), महिलामुक्ती दिन, सावित्रीबाई फुले जयंती, रेणुका यात्रा सौंदी, श्री यमाईदेवी रथोत्सव औंध

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ८ जानेवारी (१२ नंतर), १० जानेवारी ✻ **डोहाळ जेवण-** ५ जानेवारी (१३ पर्यंत) ✻ **बारसे-** ५ जानेवारी (१३ पर्यंत) ✻ **जावळ-** ५ जानेवारी (१३ पर्यंत) ✻ **गृहप्रवेश-** ५ जानेवारी (दुपारी १३ पर्यंत)

### मेष :- नव्या विचारांना चालना

तृत्तीयातील गुरुचा शुक्र- मंगळाशी प्रतियोग होत आहे. याची याची फळे सप्तहाच्या उत्तरार्धात आपणास मिळतील. भाग्योदयकारक घटना घडतील. नव्या विचारांना चालना देता येईल. उपजतकाला गुणांना चांगल्या संधी लाभतील. अनावश्यक खर्च टाळावेत. गुंतवणूक विचाराने करावी. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. सरकारी कामे करून घ्यावीत. स्पर्धा परीक्षेत यश मिळेल. शुभ ता. ५, १०

### वृषभ:- फार आग्रही राहू नका

धनस्थ गुरुचा शुक्र- मंगळाशी होणारा प्रतियोग आर्थिक कामे यशस्वी करणार आहे. ज्ञानदान, बँक, शेअर मार्केट अशा क्षेत्रात असणार्यांना विशेष शुभ लाभदायी कालावधी आहे. फार आग्रही अथवा टोकाची भूमिका घेऊ नका. शारीरिक तक्रारींची दखल घ्यावी लागेल. कारखानदारीत नव्या संधी लाभतील. निश्चित होऊन वाटचाल करावी. शुभ ता. ५, ७, ८

### मिथुन:- चांगली प्रगती

राशीतील गुरुचा सप्तमातील शुक्र- मंगळाशी प्रतियोग होत आहे. अंगीकृत कार्यात समाधानकारक यश मिळेल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. भागीदारीच्या व्यवसायात चांगली प्रगती साधता येईल. अडचणींवर मात कराल. आत्मविश्वास वाढत जाईल. अपेक्षित घटना घडतील. गुढ विद्येचा गौरव होईल. गुरुकृपा आहे, श्रद्धेने पर्वत हलवू शकाल. शुभ ता. ५, ८

### कर्क:- हितशत्रूंवर विजय

षष्ठातील शुक्र- मंगळ गुरुशी प्रतियोग करणार आहेत. नोकरीत अधिकार वाढतील. हितशत्रूंवर विजय मिळवू शकाल. अपेक्षित संधी लाभतील. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. भाग्यवृंध्दिंगत होईल. अडचणींवर मात कराल. फार चिंता करू नका. सर्व काही मनासारखे होत जाईल. सरकारी कामे करून घ्यावीत. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. ५, ८, १०

### सिंह:- क्रीडा, कला क्षेत्रात विकास

लाभातील गुरूचा पंचमातील शुक्र- मंगळाशी प्रतियोग होत आहे. त्यामुळे शिक्षण अनुभवातून चांगली प्रगती साधता येईल. क्रीडा, कलाक्षेत्रात चांगला विकास सधता येईल. नव्या संधी लाभतील, स्वीकार करावा. अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. फार घाईने कोणताही निर्णय घेऊ नका. प्राप्तीचे प्रमाण विविध मार्गाने वाढेल. चिंता नको. शुभ ता. ७, १०

### कन्या:- अडचणींवर मात

कर्मस्थ गुरुचा सुखस्थ शुक्र- मंगळाशी प्रतियोग होत आहे. कार्यक्षेत्रात चांगली वाटचाल करू शकाल. स्थावरबाबतीत शुभ घटना घडतील. सरकारी कामे मनासारखी होतील. वाहन सौख्य लाभेल. अपेक्षित संधी लाभतील. अडचणींवर मात कराल. ज्ञानदान, विमा, बँक क्षेत्रात अनुकूलता राहील. सुख स्वास्थ लाभेल. वादाचे प्रसंग टाळावेत. शुभ ता. ५, ८

### तुला:- चांगल्या संधी लाभतील

भाग्यस्थ गुरुचा शुक्र- मंगळाशी प्रतियोग होत आहे. अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. नोकरीत आर्थिक अधिकार लाभतील. नव्या विचारांना चालला देता येईल. राजकारणात चांगली संधी चालून येईल. लाभ उठवावा. अडचणींवर वेळीच मात कराल. गुरुकृपेने विविध प्रश्न मार्गी लावू शकाल. बिनधास्त होऊन वाटचाल करावी. शुभ ता. ५, १०

### वृश्चिक:- कलेतून अर्थार्जन

धनस्थ मंगळ, शुक्राचा अष्टमातील गुरुशी होणारा प्रतियोग आपणास शुभ फले मिळवून देणारा ठरेल. सरकारी येणे वसूल होईल. वाणीवर नियंत्रण ठेवावे. वादाचे प्रसंग टाळावेत. पत्रकारिता क्षेत्रात असणार्यांचा गौरव होईल. कलेतून अर्थाजन घडेल. नवे विचार विचाराने मार्गी लागतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. ५, ८, १०

### धनु:- बिनधास्त रहावे

राशी स्वामी गुरुशी राशीतील शुक्र, मंगळ प्रतियोग करणार आहेत. अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. कार्यक्षेत्रातील नवीन बदल लाभदायक ठरतील. सर्व समस्या सुटत जातील. चौथ्या शनिची सध्या चिंता नको. आत्मविश्वास वाढविणार्या घटना घडतील. बिनधास्त रहावे. शुभ ता. ५, ७

### मकर:- चांगले मार्गक्रमण

षष्ठातील गुरुचा व्ययातील शुक्र- मंगळाशी प्रतियोग होत आहे. कार्यक्षेत्राच्या दृष्टीने हा प्रतियोग लाभदायक ठरणार आहे. नव्या योजना मार्गी लावता येतील. अडचणींचे प्रमाण कमी झाल्याने समाधान वाटेल. सरकारी कामासाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. विचाराने रहावे. चांगले मार्गक्रमण करता येईल. गुंतवणुकीचा योग्य परतावा मिळेल. चिंता नको. शुभ ता. ५, १०

### कुंभ:- आर्थिक आघाडीवर प्रगती

पंचमातील गुरुचा लाभातील मंगळ-शुक्राशी प्रतियोग होत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत मनासारख्या घटना घडतील. विधी, कारखानदारी अशा क्षेत्रात लक्षणीय प्रगती साधता येईल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणी कमी होतील. प्रतिकूलतेवर मात कराल. सरकारी कामे करून घ्यावीत. यशस्वी होतील. आर्थिक आघाडीवर चांगली प्रगती करू शकाल. शुभ ता. ५, ७

### मीन:- चिकाटी सचोटीने प्रगती

सुखस्थानी असलेल्या राशी स्वामी गुरुचा कर्मस्थ मंगळाशी होणारा प्रतियोग कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती करणारा राहील. प्राप्तीचे प्रमाण विविध मार्गाने समाधानकारक राहील. राशीतील शनिमुळे चिकाटीने सचोटीने प्रगती साधता येईल. सुख स्वास्थ लाभेल. सरकारी कामे करून घ्यावीत. अडचणींवर वेळीच मात करू शकाल. शुभ ता. ५, ७, १०

!! शुभ भवतु !!

पान ३ वरून

## मान्सूनचा नवा चेहरा

त्याऐवजी त्यांना ऊर्जा संक्रमणाच्या गती आणि व्याप्तीवर लवचीकता हवी आहे. भारताच्या उर्जेच्या गरजा प्रचंड आहेत आणि दरडोई उत्सर्जन पातळी कमी असल्याने, हवामान बदल कमी करण्याची आपली जबाबदारी मर्यादित आहे.

विशेषतः ऊर्जा क्षेत्रातील व्यत्यय महागडे असू शकतात. स्वच्छ उर्जेमध्ये पुढाकार घेतल्याने भारतीय अर्थव्यवस्थेला संभाव्य फायदे मिळतात. आंतरराष्ट्रीय आघाडीवर भारताचे संभाव्य पर्याय विवेकी आहेत. उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि वित्तपुरवठ्यासाठी विकसित देशांवर दबाव कायम ठेवणे आणि आंतरराष्ट्रीय प्रतिज्ञा मर्यादित करताना देशांतर्गत ऊर्जा संक्रमणाची तयारी करणे आवश्यक आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

पान ४ वरून

## नव्या वर्षाचे पसायदान

कुठून असणार? असा प्रश्नही मला पडतो.




मानवास यथार्थ सुबत्ता लाभो ह्या माझ्या मागणीचे कधीकधी मलाच हसू येते कारण निसर्गाने कितीही दिले, अगदी ओंजळ भरून ती सांडू लागली तरीही माणसाच्या मनात जे दिसेल ते स्वतःच्या पदरात रिचवून घ्यावे असे हपापलेपण कायम आहे, त्यामुळे त्याची ओंजळ भरली तरी मन भरणार नाही हेही मी जाणतो.

चिमणीस दाणा मिळावा असे लिहून परसात डोकावून माझ्या बालपणी माझे घास मोजणारी चिमणी कोठे हरवली ते शोधण्यासाठी मी व्याकुळ होतो. तेव्हा अनेक घरातून चिमणी तर सोडा पण घास भरवणारी आईच दिसेनासी झाल्याच्या जाणिवा व्याकुळ करतात. किमान येणाऱ्या वर्षी पाऊस पाणी नीट व्हावे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत, सृजनाच्या वाटेवरील या पथिकाला संपन्नतेचे दिवस लाभोत आणि सृजनोत्सव साजरी करणारी दुसरी शक्ती म्हणजे स्त्री तिचा जन्मोत्सव आणि जीवनोत्सव समाजमान्य होवो असे मला सातत्याने वाटत राहत. अपेक्षा व्यक्त करणे हे आपल्या हातात असले तरी त्या पूर्ण होतील न होतील हे काळाच्या हातात असते. हे जाणून नवीन वर्षाच्या उदरात सकल विश्वासाठी संपन्नता, शांतता आणि समृद्धी भरभरून नांदो एवढ्यात शुभेच्छा व्यक्त करणे माझ्या हातात असते, नाही का?

# चंदन-वंदन



दुर्ग जिज्ञासा

**प्राची पालकर**

सह्याद्रीतील शंभू महादेव डोंगररांगेपासून पुढे चंदन-वंदन, वर्धनगड, महिमानगड असे तीन प्रमुख फाटे दक्षिणेला विस्तारलेले आहेत. त्यापैकी चंदन-वंदन फाटा खंबाटकी घाटाच्या पूर्वेला असलेल्या हरळीपासून सुरू होऊन दक्षिणेला कृष्णा-वसना नद्यांच्या संगमस्थानापर्यंत पसरलेला आहे. या डोंगररांगेमुळे कृष्णा आणि वसना नद्यांची खोरी विलग झाली आहेत. चंदन-वंदन हे जोडकिल्ले या डोंगररांगेच्या मध्यावर आहेत. चंदन-वंदन ही दुर्ग-जोडी सातारा जिल्ह्यात असून साताऱ्याच्या अलिकडे २४ कि.मी. अंतरावर वसलेली आहे. सुमारे ३८०० फूट उंच हे जुळे दुर्ग दुर्गविश्वात प्रख्यात आहेत. पुणे-सातारा मार्गावर असलेले चंदन-वंदन सपाट माथा असल्यामुळे लगेच ओळखायला येतात. यातील चंदन हा वंदनच्या तुलनेत उंचीने जरा लहान असून तो कोरेगाव तालुक्यातील बनेवाडी गावाच्या जवळ आहे आणि वंदन मालगावच्या जवळ वसलेला आहे. पुणे-सातारा मार्गावर भुईज गाव आहे. तेथून २० कि.मी. अंतरावर असलेल्या किकली या गावात पोहोचलात की, या दोन्ही गडांवर जाणे सोपे आहे. वाई आणि सातारा अशा दोन्ही ठिकाणांवरून किकली गावासाठी बससेवा आहे. किकली गाव गाठले की, त्याच्या जवळच असलेल्या बेलमाची गावात पोहोचावे. तेथून एक वाट चंदन-वंदन किल्ल्याच्या मधल्या खिंडीत जाते. अर्ध्या चढणीवर भैरोबाचे मंदिर आहे. दर्शन घेऊन प्रथम वंदन किल्ल्यावर चढायला सुरुवात करावी. वंदन हा किल्ला चंदनपेक्षा उंचीने जास्त आहेच; शिवाय अधिक विस्तीर्ण आणि मोठाही आहे. प्रचलित रस्त्याने गडप्रवेश करताना एक मोडकळीस आलेला दरवाजा दिसतो. हे किल्ल्याचे पहिले प्रवेशद्वार आहे. दरवाज्यातून आत गेलात की, दगड ढासळून बंद झालेले पुरातन द्वार आहे. त्यावर फार्सी भाषेत काही मजकूर कोरलेला आढळतो. येथून पुढे वाट थोडी कठीण आहे; त्यावरून चालत गेलात की, सरळ गडमाथ्यावर प्रवेश होतो.

गडमाथ्यावर असंख्य पडक्या वास्तू आहेत. यावरून पूर्वी येथे गजबजलेली लोकवस्ती होती, असे लक्षात येते. गडाच्या उत्तर टोकावरील बुरूज सुस्थितीत आहे. या वाटेवर एक समाधी दिसते. सरकारवाड्याचे अवशेष तसेच तीन खोल्यांची छप्पर नसलेली वास्तू पाहून, त्याच्या जवळच असलेली पाण्याची दोन टाकी पाहावीत. किल्ल्याला फार कमी बांधलेली तटबंदी आहे; मात्र नैसर्गिक तटबंदीमुळे किल्ला बुलंद भासतो. गडाच्या मध्यभागी प्रशस्त चौथरा आहे. यावर पूर्वी एखादी महत्त्वाची वास्तू असावी. सुमारे एक ते दीड तासात वंदन किल्ल्याची फेरी पूर्ण होते. त्यानंतर परत खिंडीत उतरावे. खिंडीत आल्यावर चंदनगडाला वळसा घालून गडाच्या पलीकडल्या टोकावर पोहोचावे. चंदनगडावर चढण्यास पायऱ्या आहेत. पायऱ्या चढून गेल्यावर गडाच्या पहिल्या दरवाज्यातून गडप्रवेश करावा. दरवाज्याच्या पुढे अजून थोडे चढून आपण गडमाथ्यावर पोहोचतो. माथ्यावर एक प्रचंड वटवृक्ष आणि महादेवाचे मंदिर आहे. श्रावणात येथे भविकांची गर्दी असते. महादेवाचे दर्शन घेऊन मंदिराच्या समोरील पायऱ्यांनी वर चढताना महाकाय दगड एकमेकांवर चढवून तयार केलेले दोन स्तंभ दिसतात. हे दगड एकमेकांवर चढवले कसे हा प्रश्न पडतो. वर चढून गेलात की सपाट पठार आहे. त्यावर कोरडे तळे तसेच वाड्याचे अवशेष दिसतात. काही ठिकाणी तटबंदी बांधली असून पाण्याची टाकी खोदलेली आहेत. गडावर फिरण्यास एक तास पुरेसा आहे. चंदन-वंदन या जुळ्या किल्ल्याची भटकंती एका दिवसात सहज पूर्ण होते.

चंदन-वंदन या जुळ्या किल्ल्यांची निर्मिती इ. स. ११९१- ९२ मधील आहे. याचे पुरावे काही पुरातन ताम्रलेखात सापडले आहेत. हे किल्ले शिलाहार राजा दुसरा भोज यांनी बांधले असून या परिसरातील बऱ्याच किल्ल्याचे बांधकाम भोज राज्यांनी केल्याचा उल्लेख आढळतो. शिवरायांनी राज्याभिषेकापूर्वी झंझावती मोहीम आखली होती. या मोहिमेतच १६७३ मध्ये चंदन-वंदन स्वराज्यात सामील झाले. १६८५ मध्ये किल्ल्यावर अमानुल्ला खानाने हल्ला केला; मात्र यात त्याच्या हाती काही आले नाही. स्वराज्यातील काही घोडे आणि सामान मात्र गेले. १६८९ पर्यंत हा परिसर मराठ्यांच्या ताब्यात होता. नंतर मात्र मोघलांचे आक्रमण अधिक दाहक झाले. पुढे १७०१ मध्ये या जुळ्या किल्ल्याचा ताबा औरंगजेबाकडे गेला.

१७०७ मध्ये शाहू महाराजांनी पुन्हा किल्ले स्वराज्यात आणले. सन १७५२ याच किल्ल्यावर पुरेसा फौजफाटा देऊन बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी दादोपंत वाघांची नेमणूक केली होती. किल्ले विजयदुर्गावर इंग्रज मराठे यांच्या संयुक्त मोहिमेत पराभूत झालेले तुळाजी आंग्रे या किल्ल्यावर बंदिवासात होते. पुढे १८१८ मध्ये चंदन-वंदनचा ताबा ब्रिटिशांकडे गेला. पारतंत्र्याचे दिवस पुन्हा सुरू झाले. वैभवशाली हिंदुस्थानावर अनेक शत्रूंचा डोळा होताच; मात्र आपल्या देशात आपसातील मतभेदामुळे परकीयांचे मनसुबे पूर्ण होत गेले. फक्त हिंदू म्हणून एकत्र राहणे आपल्याला जमले नाही आणि म्हणूनच धर्मनिरपेक्षतेचे पाठ आपल्यालाच पढविण्यात आले.

आपण आता तरी इतिहासातून धडे घेऊन शत्रूचे मनसुबे ओळखायला हवे आणि पूर्ण ताकदीने हाणूनही पाडायला हवे. स्वराज्याचे वैभव असलेले हे सह्याद्रीतील गडकोट शिवरायांनी प्राणापलीकडे जपले; पण आपले दुर्दैव होते की, छत्रपती शिवाजी महाराज अल्पायुषी ठरले. महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कार्यात स्वतःला झोकून दिले होते.त्यापुढे त्यांनी स्वतःच्या शरीराची कधीच काळजी केली नाही. आपल्या जाणत्या राजाला दीर्घायुष्य लाभले असते तर इंग्रजांची पाळेमुळे हिंदुस्थानात रुजलीच नसती. इंग्रजांची पकड घट्ट होऊ लागली, मूठभर परकीय लोकांसमोर अंतर्गत कलहामुळे हात टेकावे लागले. पारतंत्र्याचे सावट पुन्हा हिंदुस्थानाला घेरू आपला दबदबा निर्माण करण्यासाठी किल्ले जिंकण्याचे सत्र सुरू केले. त्यांच्या अत्याधुनिक हत्यारांनी आपल्या किल्ल्यांवरील बांधकामाचे अतोनात नुकसान केले. इतक्या उंचीवर आपल्या पूर्वजांनी या वास्तू बांधताना घेतलेली मेहनत आक्रमणांनी अक्षरशः वाया गेली. आता प्रत्येक किल्ल्यावर त्या काळी असलेल्या वैभवाच्या खुणा फक्त शिल्लक आहेत. एक मात्र खरे की, हे किल्ले सर करताना अंगात आगळीच स्फूर्ती जाणवते. कारण ही आपल्या पूर्वजांची धारातीर्थे आहेत.

चंदन व वंदन या दोन्ही किल्ल्याची भटकंती करून पुन्हा पायथ्याच्या किकली गावात पोहोचावे. किकली गावात काळ्या पाषाणात सुबक कोरीव काम केलेले अतिशय सुरेख असे शिव मंदिर आहे. नैसर्गिक प्रतिकूलता आणि अनास्थेने ग्रासलेले हे मंदिर आपले मूळ वैभव टिकविण्याची धडपड करीत अजून उभे आहे. मंदिराचे अप्रतिम प्रवेशद्वार आणि दीपमाळा आपल्याला स्तंभित करतात. आपल्या पुरातन वास्तूंचे स्थापत्यशास्त्र पाहिले की, हिंदुस्थानात जन्माला आलो, याचा निश्चितच अभिमान वाटतो. महाराष्ट्राच्या ज्वलंत इतिहासात शिवकाळाचे मानाचे स्थान आहे. त्या काळात हिंदू धर्माच्या रक्षणासाठी कित्येकांनी घरावर तुळशीपत्र ठेवून आयुष्य अर्पण केले. आज आपण निदान त्या धगधगत्या इतिहासाच्या पाऊलखुणा जपण्याचा प्रयत्न करायला हवा. आपल्यातील आपसी मतभेदांचा फायदा अनेकांनी घेतला. त्यामुळेच शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकजागर घडवून आणला.

सगळ्यांना एकीच्या घट्ट बंधनात बांधून स्वराज्य स्थापन केले. आजही जातिभेद विसरून हिंदूंनी एक कुटुंब म्हणून एकत्र होणे आवश्यक आहे. कित्येक वर्षांनी आपल्याला लाभलेल्या योग्य नेतृत्वाच्या पाठीशी जनता ठामपणे उभी राहिली तरच भारत विश्वगुरुपदी नक्की विराजमान होईल. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने सारासार विवेकबुद्धीने विचार करण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीतील डोंगररांगात वसलेल्या किल्ल्यांच्या आणि मावळ्यांच्या साथीने स्वराज्य स्थापनेचे कठीण कार्य पूर्णत्वास नेले. आपणदेखील स्वराज्य आणि स्वधर्माच्या अभिमानाचे प्रतीक हे गडकिल्ले सर करून अखंड धर्मज्योत प्रज्वलित करूया.

पान ५ वरून

## मंत्रपुष्पांजली वैदिक राज्यशास्त्राचे सूक्त विधान

**४) पारमेष्ठ्य :** नैतिक व वैचारिक अधिपत्य करताना शिवाजी महाराजांनी परधर्म आणि परस्त्रियांचा कधीही अवमान होणार नाही, याची दक्षता घेतली. त्यांच्या श्रद्धास्थानांना व धार्मिक भावनांना दुखावले नाही.

**५) महाराज्य :** भौगोलिक विस्तार करावाच, पण नंतर तेथे उत्तम प्रशासनिक वर्चस्वही हवे.

**६) आधिपत्य :** स्वत:चे कायदा व प्रशासन चालावे. अल्पायुष्यामुळे शिवाजी महाराजांच्या हयातीत भौगोलिक विस्तार फारसा होऊ शकला नाही हे खरे, पण त्यांचा दूरदर्शी विस्तारवाद, सुरक्षा व्यवस्थेतील सुदृढता आणि आदर्श प्रशासन याविषयी औरंगजेब आणि इंग्रजही जाणून होते.

**७) ब्राह्म्य :** विवेक, न्याय आणि आत्मसंयम या शाश्वत तत्त्वांशी एकरूपता त्या तत्त्वांचे अधिष्ठान असावे. धर्माधिष्ठता असावी, पण धर्मांधता नको. नीती, धृती, श्रुती, प्रीती, भक्ती अशा दैवी संपत्तींनी युक्त असे आनंदवनभुवन निर्माण व्हावे.

**निष्कर्ष :** म्हणून मंत्रपुष्पांजलीचे प्रयोजन देवता पूजनानंतरच्या आरतीपेक्षा राजधर्मासाठी अधिक आहे. मंत्रपुष्पांजली हा राजधर्माचा सिद्धांत आहे. वर उल्लेखिलेला क्षात्र उपदेशाचा 'आकृष्णेन रजसा..' हा मंत्र त्या सिद्धांताचा प्राण आहे. छत्रपती शिवाजी महाराज ही त्या सिद्धांताची चालतीबोलती आदर्श प्रयोगशाळा आहे. रूढ पूजाविधीतून समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र मांडणे, मंत्रातून संविधान सांगणे आणि परंपरेतून तत्त्वे मांडणे ही भारतीय पद्धत आहे. मंत्रपुष्पांजली हे वैदिक राष्ट्रगीत आहे.

## ओल्या मातीला आकार देताना...

रामायण- महाभारतातल्या गोष्टी आपल्या मुलांचे व्यक्तिमत्व घडवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मार्गदर्शक ठरू शकतात. पूर्वीच्या अनेक पिढ्या त्यावरच घडल्या आहेत. त्या संस्कारक्षम गोष्टी आहेत. त्यावर धार्मिक म्हणून शिक्का मारून त्या बाजूला ठेवता येणार नाहीत. त्याचप्रमाणे थोरांची चरित्रे त्यांच्यापुढे ठेवताना या थोर व्यक्तींनी आपल्या आयुष्यात कशाप्रकारे अडचणींना आणि अपयशाला तोंड दिले हे त्यांना आवर्जून सांगितले पाहिजे.

इतिहासातील थोरांचे योगदान, देशभक्तांनी देशासाठी केलेल्या समर्पण लहानपणी त्यांना आलेल्या अडचणी यांची उदाहरणे मुलांना सांगता येतील असे सुंदर व्हिडिओ किंवा धारावाहिक त्यांना दाखवता येतील किंवा त्यांना आवर्जून तेच पाहायला लावले पाहिजे. वाईट संगतीचे दुष्परिणाम त्यांना युक्तीयुक्तीने समजावून त्यापासून दूर राहिले पाहिजे हे त्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे. मुले शाळेत जातात त्याचप्रमाणे इतर मुलांबरोबर ती खेळत असतात त्यामुळे मुलांबरोबर जाणे किंवा मिक्स होणे हे टाळता येण्यासारखे नाही. अशा परिस्थितीत मुलांच्या मित्र-मैत्रिणींचाही परिचय पालकांनी करून घ्यावा. त्यांच्या मित्र-मैत्रिणींशी संवाद साधणे देखील उपयुक्त ठरू शकते.

मुलांमधील हिंसक आणि आक्रमक प्रवृत्ती कमी होण्यासाठी परमेश्वराची प्रार्थना त्यांच्या उपयोगी पडू शकेल. दररोज संध्याकाळी किंवा एखाद्या नियमित वेळी पालकांनी स्वतः मुलांसोबत बसून प्रार्थना करावी, चांगल्या विचारांचे उच्चारण आणि चिंतन करावे. यातून त्यांची आक्रमक वृत्ती कमी होण्यासाठी मदत होऊ शकेल. आपली चूक मान्य करणे, झालेल्या चुकीबद्दल क्षमा याचना करणे ही मोठी गोष्ट आहे हे त्यांना शिकवावे. मुलांची प्रवृत्ती चौकशी असते. त्यांना अनेक प्रश्न पडत असतात. साहजिकच या प्रश्नांची उत्तरे ते आपल्या आई-वडिलांकडून शोधत असतात. परंतु बऱ्याच वेळेला त्यांच्या शंकांचे समाधान न झाल्याने ते अन्य मार्ग शोधतात. असे मार्ग प्रसंगी घातक ठरू शकतात म्हणून आई-वडिलांनी मुलांची जिज्ञासा न मारता त्यांच्या परीने त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बालभारतीच्या पुस्तकातील गोष्टी, चंपक, नंदन किंवा अक्कड बक्कड यासारखी पुस्तके मुलांच्या भावनिक विकासाला आणि व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतील. आपल्या मुलांना अशी पुस्तके जरूर उपलब्ध करून दिली पाहिजे. त्याचप्रमाणे मुलांमधील चांगल्या गोष्टी जसे की त्यांची गाण्याची आवड, खेळ, चित्रकला यासारख्या गोष्टींना आवर्जून प्रोत्साहन द्यावे. संस्कार 'दंडाने' नाही, तर 'स्नेहाने' रुजतात हे आपण पालक म्हणून लक्षात ठेवणे आवश्यक आहे. शिल्पकार नको असलेला मूर्तीतील भाग काढून टाकतो आणि मगच सुंदर मूर्ती तयार होते. या लेखामध्ये मी सांगितलेली थिअरी समजायला सोपी आणि चांगली वाटते, परंतु आचरणात आणण्यासाठी ती तेवढीच कठीण आहे याची मला जाणीव आहे. प्रत्यक्षामध्ये मुलांना घडवताना अनेक अडचणी येतात, परंतु मुलांना घडवणे ही क्रिया एखादे बटण दाबून जसा विजेचा दिवा लागतो तशी लगेच होणारी नाही. त्यासाठी दीर्घकाळ प्रयत्न करत राहावे लागतात. म्हणूनच असे म्हटले जाते की आई वडील होणे सोपे आहे परंतु चांगले पालक होणे मात्र कठीण! शेवटी मुलांना काय द्यायचे मोबाईल की वेळ, शब्दांच्या माध्यमातून सांगायचे की कृतीच्या माध्यमातून? हे आपणच ठरवायचे आहे. आज तुमच्या माझ्यासमोर प्रश्न आहे की या ओल्या मातीला आपण कोणता आकार देतो आहोत?

# जीवनार्थाचा अंत:स्वर

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com




## अंत:स्वराचे स्रोत

झपाटून टाकणाऱ्या अनुभवांचे संकलन, स्वतःच्या मूल्यांशी तडजोड न करणे आणि जीवनार्थासाठी कृतार्थता अनुभवणे

* दिशादर्शनासाठी गतानुभवांचे निरीक्षण आणि त्यांच्याशी जुळणारे जीवित ध्येय अशी वाटचाल केली तर जीवनाचा मार्ग स्पष्ट होतो.
* विकासासाठी झोकून देणे आणि इतरांच्या अभिप्रायांचे मनन करणे

**तिथे ध्यानी येते-** अर्थ शोधायचा नसतो तर तो निर्माण करायचा असतो. त्यासाठी पार्श्वभूमी असावी लागते

**अल्बर्ट कामूच्या प्रश्नाची-** जीवनला खरंच काही अर्थ असतो कां किंवा अधिक धाडसीपणे स्वतःला **विचारता आलं पाहिजे-** जगण्यासाठी जीवनात काही अर्थ आहे का, उरला आहे का?

### जीवनार्थाचा शोध

अर्थहीन अस्तित्वाबाबत प्रश्न पडल्यावर अल्बर्ट कामू ने सुचविले की पळवाट शोधण्यापेक्षा आयुष्य भरभरून जगावे म्हणजे त्या प्रक्रियेत कधीतरी जीवनाचा अर्थ सापडून जातो.

कामूचा समकालीन सार्त्र याच्या मते अस्तित्ववाद हा मानवाचा असाधारण पैलू आहे. या दृष्टिकोनातून जीवनाला स्वतःचा अंतर्भूत असा अर्थ नसतो. आपण मुक्त असतो स्वतःचा अर्थ शोधण्यासाठी.

### मुळात अस्तित्ववादाचा स्रोत काय?

मुक्तद्वार हा पर्याय देणारे अस्तित्ववादाचे देणे फार महत्वाचे आहे. कोठल्याही वैश्विक घटना, प्रसंग नसतातच आणि मनुष्य त्यापासून अलग, विभक्त असतो. तो एकटाच जन्मतो, जगतो आणि एकटाच मारुन जातो. अशावेळी स्वतःची मूल्ये, स्वतः चे अर्थ स्वतःच निर्माण करण्यात गैर ते काय? अर्थ तसाही वस्तुनिष्ठ नसतो, तो बाह्य विश्वात वास करीत नाही पण व्हर्नोक च्या १९७० सालच्या विधानानुसार तो आपल्या मानसिक अवस्थेमधून तयार होत असतो. म्हणूनच आपल्या कृती, आपली मूल्ये साऱ्यांची जबाबदारी आपणच घेणे अनुस्यूत असते. सार्त्र अस्तित्वहीनतेकडे बघताना नमूद करतो- वयाच्या प्रत्येक टप्प्यावर आधाराविना, मदतीविना स्वतःचा शोध घेणे प्रत्येकावर बंधनकारक आहे. स्वातंत्र्य असलं तरीही त्याचा दुरुपयोग कसा टाळता येईल याचा विचार करून स्वतःबरोबर सगळ्यांचीच जबाबदारी आपल्यावर असते हे मान्य करायलाच हवे. त्यासाठी आपण काय करतो याच्यावर बारीक लक्ष ठेवणे क्रमप्राप्त असते. या टप्प्यावर विज्ञान आणि मानसशास्त्र आपल्या मदतीला धावून येते.

### मानसशास्त्र आणि जीविताचा अर्थ

शरीरांतर्गत, मनांतर्गत समन्वयाचा शोध हा मानसशास्त्राचा आवडता अध्ययन विषय आहे. त्यामधून कृतकृत्यता आणि आनंद यांचे महत्व वाढत्या क्रमाने निर्देशनास येत आहे.

जीविताचा अर्थ गवसलेली माणसे प्रायः सुखी दिसतात, जीवन समाधानाचा निर्देशांक वाढीव दर्शवितात आणि त्यांच्यात नैराश्याचे प्रमाण लक्षणीय रित्या कमी आढळते.

जीवनार्थ मुळातच विविधांगी असतो आणि त्याचे पैलू वेगवेगळ्या दृष्टिकोनातून बघावे लागतात- आकलनक्षमता, अर्थदायी घटना, जीवनहेतू साध्य करण्यासाठी आवश्यक प्रेरणा इत्यादी इत्यादी!

मानसशास्त्रातून जीवनार्थाच्या अनेक व्याख्या दृष्टीस पडतात त्यापैकी सर्वसमावेशक व्याख्या लॉरा किंग या मिसूरी विद्यापीठात काम करणाऱ्या मानसशास्त्रज्ञाने दिलेली आहे- जीवनातील अर्थ म्हणजे आयुष्यातील ध्येय, अर्थवत्ता आणि सुसंगतता यांचे अस्तित्व असणे. वैचारिक परावर्तन मानवाच्या आकलनातून घडत असते आणि मनाच्या कार्यासाठी महत्वाचे असते. खरे तर दैनंदिन अनुभवाला आपण प्राधान्य देत असतो आणि त्यालाच अर्थवाही संदर्भ देत असतो. आपले हेतू साध्य होण्यासाठी आवश्यक ती वातावरणनिर्मिती करणे हेही तितकेच महत्वाचे. २०२० साली जीवनार्थाचा वेगळा पैलू एका अध्ययनातून समोर आला. आयुष्यात एकमेव ठाम सत्य म्हणजे मृत्यू.

दहशत व्यवस्थापन संकल्पना (टीएमटी- टेरर मॅनेजमेन्ट थिअरी) असं सुचविते- आपल्या मर्त्य अवस्थेची आठवण करून देणाऱ्या घटना मरण विचाराची अधिक भीती निर्माण करतात. पण जीवनात जगण्याचे हेतू जर समाविष्ट असतील तर अशी भीती निर्माण होत नाही. मानवी अस्तित्वाचा गाभा म्हणजेच जीवनातील अर्थ.

### स्व-मदतीची दहा तंत्रे

अर्थ व्यक्तिगत, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर बदलता आणि व्यक्तिनिष्ठ असतो.

(१) इतरांना मदत करणे - वेगवेगळ्या संस्थांशी संलग्न होऊन नातेबंध विकसित करणे

(२) जवळीक वाढविण्यासाठी सुखदुःखांच्या कानगोष्टी करणे

(३) स्वतःपलीकडे जाऊन नव्या जबाबदाऱ्या, छंद स्वीकारणे

(४) आदर आणि समानता अनुभवणे आणि व्यक्त करणे

(५) काही व्यक्तींसाठी भौतिक गरजांची पूर्ती जीवनाला अर्थपूर्ण बनवित असते.

(६) स्वतःच्या मूल्यांशी जुळणाऱ्या क्षेत्रांमध्ये कामगिरी करून दाखविणे

(७) व्यावसायिक ध्येयांचा पाठपुरावा

(८) आनंददायी कृतींचा समावेश दिनचर्येमध्ये करणे

(९) अर्थदायी स्रोतांचा अभ्यास करणे

(१०) वाढत्या वयातील आनंदाचा अर्थबोध

आपले अनुभव आणि परिस्थिती यांचा आपल्या वयाशी प्रत्यक्ष संबंध असतो. प्रत्येक टप्प्यावर येणारी आव्हाने भिन्न असतात आणि त्यांच्यावर मात केल्यावर लाभणारी कृतार्थता तितकीच वेगळी असते. तसेच अनेक आघात आपल्याला झेलावे लागतात- पालकांचा मृत्यू, क्वचित जोडीदार गमावणे, नौकरी जाणे, प्रकृती-अस्वास्थ्य. पण यावरही मात करीत किमती आयुष्य शक्य असते.

आयुष्याच्या उत्तरार्धात आपण व्यस्त राहणे निवडू शकतो आणि त्याचे सकारात्मक परिणाम म्हणजे एकटेपण, नैराश्य, स्वास्थ्याविषयक तक्रारी कमी होऊ शकतात. शंभरी गाठणाऱ्या व्यक्तींमध्ये सकारात्मकतेचे प्रमाण अधिक आढळून येते.

त्या टप्प्यावर अधिक निवांतपण, सामाजिक बंधांना जपणे सहज शक्य होते. अचानक स्वभाव प्रवृतींमध्ये बदल घडवून आणणे अवघड जाते पण विचारांचा सांधा नक्कीच बदलता येतो. समाज बंध, त्यातील सहभागाने सुधारता येतात. भलेही नवी नाती निर्माण करणे सहज होत नसेल कारण कार्यस्थळासारखे परिचित वातावरण सेवानिवृत्ती नंतर उरत नसते.

### सामाजिक तंदुरुस्ती (शारीरिक आणि मानसिक यासह)

आपल्या नात्यांचे मूल्यांकन करून ज्यांच्या सहवासात मनमुराद जगता येते त्यांना अधिक वेळ देणे, समाज माध्यमांद्वारे जोडलेले राहणे- काहींना गाळणे तर काहींना समाविष्ट करून घेणे, नैमित्तिक गाठीभेटी , व्यवसाय/कुटुंब /संस्कृती आणि अशा सर्व विषयांवर चर्चा करणे यातून सामाजिकदृष्ट्या आपण प्रवाहात राहतो आणि असंबद्ध किंवा कालबाह्य होत नाही. याबाबत खूप हृद्य मार्गदर्शन मॅनस् सर्च फॉर मिनींग हे फ्रँकेल यांचे पुस्तक करते. त्यामध्ये मिळणारे धडे संक्षिप्तपणे असे नमूद करता येतील-

(१) सहन करण्यापेक्षा जिवितार्थ अधिक बळकट असतो आणि हे समजले की आत्मा अधिक उच्च स्थानावर पोहोचतो.

(२) दुःसह परिस्थितीतही माझे स्वातंत्र्य अबाधित असते.

(३) दुःखाला दिशा दिल्याशिवाय ते अर्थपूर्ण होऊच शकत नाही.

(४) जीवनार्थ फक्त प्रेमाच्या मार्गाने गेल्यासच गवसतो.

(५) जीवनाच्या प्रश्नांचे एकच उत्तर असतं - वाढत्या जबाबदाऱ्या. ( जीवनार्थ म्हणजे आपण जीवनाकडून कडून काही मागणे नाही तर आपणच त्याचे काही देणे लागत असतो याचे भान)


(६) आशा परावलंबी नसते, तिला काळजीपूर्वक जपावे लागते कारण ती जीवनरेखा (आयुष्यरेषा) असते.

(७) खरं स्वातंत्र्य आतमध्ये वस्तीला असतं आणि अर्थपूर्ण मनाला कोणताही तुरुंग बंदिस्त करू शकत नाही.

(८) अर्थपूर्ण जीवनाने मनात निर्माण केलेला अवकाश कोठल्याही परिस्थितीला व्यापता तर येतच नाही, पण नष्टही करता येत नाही.

जेव्हा जेव्हा अंतर्यामी वाटते आपण संकुचित होतोय, आक्रसतोय. केवळ आणि केवळ स्वतःभोवती चकरा मारतोय- छोट्याछोट्या गोष्टींनी आपली चिडचिड होतेय तर लक्षात येईल की जीवनार्थ गवसत नाहीए. अशावेळी स्वतःचा नव्याने शोध घेणे, अधिक काही मिळविण्याचा प्रयत्न करणे, स्वतःपेक्षा बाह्य रिंगणावर ध्यान देणे आणि आदर दाखविणे हे मार्ग दीर्घकालीन ठरतात. निसर्ग, नाती, प्रकल्प, स्वतःमधील संभाव्य शक्ती याकडे अधिक लक्ष देणे सहज शक्य आहे- मनात आणले तर. मग स्व कडून बाहेरचा प्रवास सुरु होतो आणि खराखुरा अर्थ सापडतो. जीवितहेतू हाच मानवाचा खरा प्राणवायू असतो. याचा शोध साध्या पेन आणि कागदापासून सुरु करता येतो. प्रेम, सेवा आणि दयाभाव असले की विनाअट इतरांच्या कामी येणे जमते. या सदराचा शेवट या लेखाने होणे उचित कारण सकारात्मकतेचा संदेशच मुळी जिवितार्थाचा शोध असतो. २०२० सालापासून सुरु झालेले हे सदर आता सलग तीनशेच्या टप्प्यावर थांबतेय. यातील सकारात्मक दृष्टिकोनाचे विविध पैलू जर अंगिकारता आले तर आपला जीवन हेतूंचा आणि जीवनाच्या अर्थाचा शोध संपेल.

# ॥ परमार्थ साधनेतील विघ्ने ॥



अग्रहायण
नारायण पांडव

**॥ गणपती बाप्पा मोरया ॥**
**॥ मंगलमूर्ती मोरया ॥**

परमार्थ साधनेत अंतराय येतात. खरंतर हा शब्द योगामध्ये वापरला जातो. अंतराय म्हणजे विघ्न किंवा अडथळे. आपल्या साधनेत आणि उपासनेत कधीही विघ्न येऊ नये म्हणून आपण विघ्नहर्ता गणेशाला प्रार्थना करतो आणि आपल्या मनातील त्याला सांगतो. आपल्या परमार्थाच्या साधनेत कोणत्या प्रकारचे विघ्न किंवा अंतराय येतात ते आपण आता पाहूया...

**एक आधी :-** परमार्थातील पहिले विघ्न आधी. आधी म्हणजे मानसिक रोग कमी जास्त प्रमाणात हा सर्वांना असतोच. मानसिक चिंता ही सर्वांना असतेच. त्यांचे प्रमाण कमी जास्त होऊ शकते.या जगात मानसिक चिंता नसणारा एकही माणूस सापडणार नाही हे नक्कीच. मानसिक चिंतेत असंख्य गोष्टी येतील कीर्ती, पैसा, परिवार, व्यवसाय, नोकरी, भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ, यश व अपयश या सारखी असंख्य, अनंत कारणे असू शकतात. तुमच्या तपश्चर्येत पहिले येणारे विघ्न म्हणजे आधी .यामुळे तुमचे मन विचलित होते. एकाग्रता येत नाही. नको ते विचार मनामध्ये वारंवार येतात. आधी माणसाला कधी स्वस्थ बसू देत नाही. कुठले तरी भूतकाळातले आठवायला सुरवात होते आणि तिकडेच मन रमते.जुन्या स्मृती पावसाच्या सरी सारख्या एका मागोमाग येत राहतात आणि त्यामुळे आपले मानसिक संतुलन बिघडते.

**दोन व्याधी :-** परमार्थातील दुसरे विघ्न व्याधी. माणसात एकदा आधी निर्माण झाली की व्याधी तिचा पदर धरून येतेच. मानसिक चिंता जितकी जास्त तितका मधुमेह आजार चटकन होतो .

**व्याधीची तीन कारणे सांगता येतात.**

एक धातू. दोन रस. तीन करण.

वात पित्त कफ ही त्रिगुणी प्रवृत्ती प्रत्येक माणसाच्या ठिकाणी असते. याचे शरीरातील संतुलन कमी जास्त झाले की, माणसाला काही ना काही त्रास होतो.

धातू --- वात, पित्त, कफ यांना धातू म्हणतात.

रस --- आपण जे अन्न खातो त्यातून देहात जे सत्वयुक्त द्रव पदार्थ तयार होतात त्याला रस म्हणतात.

एक-- अन्नरस. दोन-- रक्त. तीन--
मांस, चार-- मेद. पाच-- अस्थि, सहा--- मज्जा. सात--- शुक्र किंवा वीर्य.

करण पाच ज्ञानेन्द्रिय पाच कर्मेंद्रिय त्यांच्या तन्मात्रा मात्रा. रूप रस, स्पर्श, शब्द, गंध चालणे, बोलणे हसणे, उपस्थ व पायू यांच्या ज्या क्रिया आहेत त्या सगळ्या क्रिया त्याच्यांत समाविष्ट असतात.

**अंतकरण :-** मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार हे नेहमीच कार्यरत असतात आणि आपल्या सोबतच राहतात.

धातू, रस, करण यात वैषम्य दुःख, मत्सर, खेद, विषाद, विरोध, विषमभाव, अननुकूलता निर्माण झाले की व्याधी निर्माण होते.

**तीन चित्ताची चंचलता :-**

परमार्थातील हे तिसरं विघ्न. चित्ताची चंचलता त्यालाच स्त्यान असेही म्हणतात. कमी जास्त प्रमाणात ही सर्वांच्या ठिकाणी असतेच. हे करू की नको? हे करू का नको करू? असा भाव आपल्या प्रत्येकाच्या चित्तात सदैव जागरूक असतो. ज्या ज्या वेळी माणसाच्या मना चंचलता निर्माण होते त्या त्यावेळी मनुष्य ठामपणे काहीही करू शकत नाही मन, चित्त एक वाहन तर एक वाहक आहे. चित्तात चंचलता असली की, मनुष्य भ्रमीत होतो. प्रकृती जितकी सुदृढ तितका परमार्थाचा लाभ लवकर प्राप्त होतो. चंचलता आले की, मनात आळस येतोच.

**चार संदेह:-** परमार्थातील चौथे विघ्न संदेह. संदेह म्हणजे शंका. या तीन प्रकारच्या असतात.

**एक ) कुशंका:-** जो तमोगुणी तामसी असतो त्याला कुशंका असते.

**दोन ) शंका :-** जो रजोगुणी राजस असतो त्याला शंका असते.

**तीन ) आशंका :-** जो सद्गुनी सात्विक असतो त्याला शंका असते.

ज्याच्या मनामध्ये संदेह किंवा संशय असतो त्याला सतत काहीतरी वाटत असते .काय होईल? कसे होईल? प्रवासाला गेलो तर प्रवास अर्धवट तर राहणार नाही ना? पूर्ण होईल की नाही? कोठे जावे ? हेही त्याला कळत नाही. हा मार्ग धरावा का तो मार्ग धरावा ? मला परमार्थ जमेल का? मी काही चुकत तर नाही ना अशा अनेक गोष्टी त्याच्या मनात येत असतात. परमार्थाच्या वाटचालीमध्ये श्रद्धा आवश्यक आहे.

**पाच प्रमाद :-** परमार्थातील पाचवे विघ्न प्रमाद. जी गोष्ट करायला हवी ती न करणे आणि जी गोष्ट करायला नको ती करणे म्हणजे प्रमाद होय. परमार्थात गुरुने वाट दाखवलेली असते त्याच मार्गाने सतत जायला हवे. वाट दाखवणे हे त्यांचे कर्तव्य असते. उपासनेच्या कंटाळा करणे हा ही एक प्रमाद आहे .अशा प्रमादाने केलेल्या तपश्चर्याचा पण नाश होतो. गुरुने दिलेल्या मार्गावर गेले की मन शुद्ध होते. चित्त स्थिर होते आणि प्रवृत्ती कमी होतात.

**सहा आळस :-** परमार्थातील सहावे विघ्न .आळस माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे .परमार्थात क्षणभर सुद्धा बेसावध राहून चालत नाही. परमार्थ साधनेत आळस बिलकुल चालत नाही .ईश्वराची उपासना करायला कधी कंटाळा करू नये आणि आळस तर करूच नये .उपासनेत नियमितता असावी लागते. बाकी सर्व काही करायला मनुष्य प्रवृत्त होतो. आळसामध्ये शरीर व मन दोघांना जडपणा असतो.

**सात विरति :-** परमार्थातील सातवे विघ्न. विरति म्हणजे उपासनेत खंड पडणे, सातत्य नसणे, सातत्य भंग होणे. परमार्थावर वाटचाल करताना मनुष्याची शक्तीने भरलेली इंद्रिये त्याला कुठेतरी नेतात आणि ती भरकटत जातात. इंद्रियाचे सामर्थ्य वाकड्या वाटेवर घेऊन जातात.

काम, क्रोध असे षढरिपू सतत जवळ वावरत असतात.

काम क्रोध हे रजोगुणातून निर्माण होतात. लोभ, मोह तमोगुणातून निर्माण होतात. काम, क्रोध ही जुळी भावंडे आहेत.


**आठ भ्रांतीदर्शन :-** परमार्थातील आठवे विघ्न. भ्रांतीदर्शन हे परमार्थातील उपासकाच्या मार्गातील मोठे विघ्न आहे. समाधी अवस्थेत चित्त आरुढ झालेले नसून ते चित्त आरुढ झाले आहे असे साधक समजतो. यातूनच त्याला चित्त दोष निर्माण होतो. यालाच भ्रांतीदर्शन असेही म्हणतात.

**नऊ अलब्धभूमिकत्व :-** परमार्थातील नववे विघ्न. अलब्ध भूमिकत्व यात असे होते की, साधकाची प्रगती हवी तशी व चांगली होत असते. या पुढील पायरी आत्मसात करायची यासाठी त्याचा प्रयत्न चालू असतो, पण कधी कधी काय होते की त्यातील काही चित्तदोषामुळे प्रगती खुंटून जाते. अशा प्रकाराला अलब्ध भूमिकत्व असे म्हणतात.

**दहा अनवस्थिततत्व :-** परमार्थातील दहावे विघ्न. अनवस्थिततत्व . ज्या योगभूमीवर योगी किंवा साधक आरुढ झालेला असतो, त्या ठिकाणी चित्त एकाग्र होत नाही. छोट्याशा कारणानेही योग्याचे व्युस्त्थान होते ( बाहेर पडणे ) योगभूमी जरी दृढ झाली असली तरी योग्यता प्राप्त होण्यास विलंब होतो यालाच अनवस्थिततत्व म्हणता येईल.

परमार्थातील दहा विघ्न अंतराय आधी ,व्याधी, स्त्यान ,संदेह,प्रमाद आळस ,विरति भ्रांतीदर्शन, अवलब्ध भूमिकत्व व. अनवस्थिततत्व.

# भंडारदरा धरण शताब्दी



**इतिहासात बिल्सन डॅम म्हणून ओळखले जाणारे भंडारदरा धरण १० डिसेंबर १९२६ मध्ये बांधले या धरणास नुकतेच शंभर वर्ष पुर्ण झाली. अभियांत्रिकीच्या उत्कृष्टतेचा आदर्श, चित्रपटसृष्टीचे आकर्षण आणि जीवनाचा आधारस्तंथ असलेल्या भंडारधरा धरणाच्या शताब्दी निमीत्त...**

निमीत्त
बुद्धभष दाभाडे

भंडारदरा धरण, इतिहासात विल्सन डॅम म्हणून ओळखले जाणारे, हे भारतातील प्रारंभीच्या व उत्कृष्ट दगडी धरणांपैकी एक आहे. १० डिसेंबर १९२६ रोजी मुंबई प्रांताचे तत्कालीन ब्रिटिश गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांच्या हस्ते या धरणाचे उद्घाटन झाले. भंडारदरा धरणाची संकल्पना १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रवरा खोऱ्यातील सिंचनाच्या गरजेतून आकारास आली. प्रवरा नदीवरील ओझर येथील बंधाऱ्यानंतर शाश्वत जलसाठ्याची आवश्यकता ओळखून ब्रिटिश अभियंत्यांनी नवीन साठवण धरणाचा अभ्यास सुरू केला. इंग्रज मुख्य अभियंता ऑर्थर हिल यांनी भंडारदरा (ता. अकोले, जिल्हा अहिल्यानगर) येथील जागेची निवड करून या प्रकल्पाचा पाया घातला. त्यांच्या योगदानाच्या स्मरणार्थ जलाशयास ऑर्थर लेक असे नाव देण्यात आले. १० डिसेंबर १९२६ रोजी झालेल्या उद्घाटनाने अकोले, संगमनेर, राहुरी, राहाता, श्रीरामपूर व नेवासा या कृषिप्रधान भागांसाठी परिवर्तनाच्या नव्या युगाची सुरुवात झाली. शतकापूर्वी केवळ सिंचनासाठी उभारलेले हे धरण आज अभियांत्रिकीचा मानबिंदू, सांस्कृतिक ओळख आणि निसर्गाधारित पर्यटनाचे केंद्र बनले आहे.

**अथियांत्रिकी उत्कृष्टता-** सन १९१० ते १९२६ या कालावधीत उभारलेले भंडारदरा धरण संपूर्णपणे दगडी बांधकाम, चुना व दगडापासून तयार केलेल्या क्रश सँडच्या साहाय्याने बांधण्यात आले आहे. त्या काळातील हे एक विलक्षण अभियांत्रिकी यश मानले जाते. दोन भक्कम डोंगररांगांमधील नैसर्गिक भूआकृतीचा योग्य बापर करून वक्राकार धरणरचना करण्यात आली, ज्यामुळे पाण्याचा दाब प्रभावीपणे वितरित होतो. ऑर्थर लेक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जलाशयाची उपयुक्त पाणी साठवण क्षमता ९०.७३९ टीएमसी आहे. धरणाची लांबी ५०७ मीटर असून पायापासून उंची ८२.२९ मीटर आहे. डावा व उजवा कालवा अनुक्रमे ७७ कि.मी. व ४५ कि.मी. लांबीचा असून लागवडीलायक क्षेत्र २३६५० हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळतो. दुष्काळी भाग हिरवळीने फुलले असून शेतीच्या उत्पादनक्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. याशिवाय १० मेगावॅट (टप्पा-१) व ३४ मेगावॅट (टप्पा-२) इतकी जलविद्युत निर्मिती ही या बहुउद्देशीय प्रकल्पाची आणखी एक महत्त्वाची बाब आहे.

**काळासोबत बळकट होत गेलेले धरण-** सन १९६७ मध्ये कोयना परिसरात झालेल्या ६.७ रिश्टर स्केलच्या भूकंपामुळे भंडारदरा धरणात काही तडे व गळती आढळून आली. त्यानंतर १९६९ ते १९७२ या कालावधीत धरणाचे व्यापक बळकटीकरण करण्यात आले. शिसे ओतणे, उभे बोअर घेणे, प्री-स्ट्रेस केबल्स बसवणे व ट्रेस उभारणे अशा प्रगत अभियांत्रिको उपाययोजनांमुळे धरणाची पाण्याचा दाब सहन करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आली आणि त्याची दीर्घकालीन सुरक्षितता सुनिश्चित करण्यात आली.

**सास्कृतिक व पर्यावरणीय महत्त्व-** भंडारदरा केवळ अभियांत्रिकोचा चमत्कार नसून निसर्गसौंदर्याने नटलेले रमणीय ठिकाण आहे. अँब्रेला फॉल, रंधा धबधबा, शांत जलाशय, हिरव्या दऱ्या- खोऱ्या आणि काजवा महोत्सव यांमुळे देशभरातील पर्यटक येथे आकर्षित होतात. १९४० नंतर अनेक हिंदी व मराठी चित्रपटांचे चित्रीकरण येथे झाले असून, त्यामुळे भंडारदर्याला महाराष्ट्राचे मिनी काश्मीर अशी ओळख मिळाली आहे.

**शतकभराची सेवा-** गेल्या १०० वर्षांपासून भंडारदरा धरणाने शेतीला पाणी, समाजाला समृद्धी, उद्योगांना ऊर्जा आणि पर्यटकांना प्रेरणा दिली आहे. दुष्काळी भागांना जलसुरक्षा देत शेतकर्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण करणे, शेतीपूरक उद्योगांना चालना देणे आणि प्रादेशिक अर्थव्यवस्थेला बळकटी देणे. ही या धरणाची अमूल्य कामगिरी आहे. शाश्वत जलव्यवस्थापन, दूरदृष्टीपूण नियोजन आणि उच्च अभियांत्रिकी कौशल्य यांचा संगम म्हणजे भंडारदरा धरण असून, निसर्गाशी सुसंवाद राखत विकास साधण्याचे हे जिवंत उदाहरण आहे. १९२६- २०२६ या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने या महान प्रकल्पाची संकल्पना मांडणारे द्रष्टे अभियंते, प्रत्यक्ष उभारणी करणारे मेहनती कामगार आणि या धरणासोबत जगणारा स्थानिक समुदाय यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्याची हीच योग्य वेळ आहे. अभियांत्रिकी वारसा, सामाजिक बांधिलकी आणि शाश्वत विकास यांचे प्रतीक असलेले हे धरण पुढील पिढ्यांना सातत्याने दिशा देत राहो, हीच सदिच्छा.

**भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रात नियमन करणाऱ्या संस्थांचे एकत्रीकरण करून, 'विकसित भारत अधिष्ठान आयोग' स्थापन होणार आहे. हा बदल केवळ प्रशासकीय नसून, शिक्षणाच्या तत्त्वज्ञानातील महत्त्वाचा टप्पा आहे. भारतीय ज्ञानपरंपरेशी सुसंगत, संशोधनाभिमुख आणि स्वायत्त उच्चशिक्षण व्यवस्था उभारण्याचा हा प्रयत्न आहे. त्याविषयी सविस्तर...**



# मेकॉलेच्या सावलीतून बाहेर पडताना...

नवी दिशा

**दिलीप बेतकेकर**

फ्रेडरिक मॅक्सम्युलरने १८६८ मध्ये तत्कालीन सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया जॉर्ज कॅम्पबेलला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, भारत एकदा इंग्लंडने जिंकला आहे. तो परत एकदा जिंकायचा आहे आणि दुसरा विजय हा शिक्षणाच्या माध्यमातून असे. १८२३ चा माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन रिपोर्ट, १८३५ची मेकॉले शिक्षणपद्धती आणि १८५४ चार चार्ल्स वूड्स डिस्पॅच यांच्या आधारावर भारतातील शिक्षणासंबंधी नीती, इंग्रजांनी निश्चित केली. त्यामुळे भारतातील स्वदेशी आणि मूल्याधारित शिक्षण परंपरा दुबळी होत गेली. भारतातील शिक्षणाचा सुंदर डेरेदार वृक्षच इंग्रजांनी उखडून टाकला.

प्राचीन भारतीय शिक्षणव्यवस्था केवळ रोजगार आणि उदरभरणासाठी नव्हती; तर ते मानवाच्या सर्वांगीण विकासासाठीचे एक सशक्त साधन होतं. आत्मसन्मान, चरित्रनिर्माण, मोक्षप्राप्ती यांना त्यात प्राधान्य होतं. तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला, वल्लभि यांसारख्या विश्वविख्यात संस्थानात शिक्षण, अनुसंधान, नवाचार आणि बहुविषयक अध्ययनाची वैश्विक केंद्रे होती. दर्शन, चिकित्सा, गणित, खगोलशास्त्र, व्याकरण, तर्कशास्त्र, कला, विज्ञान इ. क्षेत्रांतील उच्चस्तरीय शोध आणि शिक्षण तेथे होत असे. भारतकेंद्रित शिक्षणाऐवजी, इंग्रजी शासनाची प्रशासनिक आणि वैचारिक पकड मजबूत करणे हा इंग्रजांच्या शिक्षणाचा उद्देश होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही यात विशेष बदल झाला नाही.

भारतीय शिक्षणव्यवस्था प्राचीन परंपरेशी जोडून, भारत परत एकदा विश्वगुरूपदावर प्रतिष्ठापित करण्याच्या उद्देशानेच 'राष्ट्रीय शिक्षण नीती २०२०' आखली आहे. या नीतीनुसार उच्च शिक्षणात बहुविषयकता, स्वायत्तता, गुणवत्ता, अनुसंधान, आणि वैश्विक प्रतिस्पर्धा केंद्रस्थानी ठेवण्यात आली. 'विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक २०२५' याच दिशेने टाकलेलं दुसरं पाऊल आहे. 'राष्ट्रीय शिक्षा नीती २०२०'च्या शिफारसी व्यवहारात आणण्यासाठी उचललेलं हे पाऊल महत्त्वाचे आहे. उच्च शिक्षण, इनपुट आधारित नियंत्रणातून मुक्त करून परिणामोन्मुख, विश्वासाधारित आणि स्वायत्त व्यवस्थेच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न आहे. विश्वविद्यालय आणि अन्य उच्च शिक्षण संस्थांना अधिक स्वायत्त, पारदश, गुणवत्तापूर्ण आणि वैश्विक स्तरावर स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी हे विधेयक मोलाची भर घालणार आहे.

या विधेयकाद्वारे विश्वविद्यालय अनुदान आयोग (युजीसी), अखिल भारतीय तांत्रिक शिक्षा परिषद (एआयसीटीई), राष्ट्रीय अध्यापक परिषद (एनसीटीई) आदी संस्थानांच्या भूमिका एकत्र करून, नवा ढाँचा तयार होणार आहे. त्यातून विकसित भारत शिक्षा अधिष्ठान (व्हीबीएसए) ही वैधानिक शीर्षसंस्था स्थापन करण्यात येईल. ही संस्था उच्च शिक्षणासाठी नीतिगत मार्गदर्शन, दीर्घकालीन दृष्टी आणि समन्वय साधण्याचं काम करेल. दैनिक प्रशासनिक हस्तक्षेपापासून दूर राहून, संस्थानांना आत्मनिर्भर आणि स्वशासित बनवण्यात ही नवीन रचना साहाय्यभूत ठरेल. 'व्हीबीएसएअ'अंतर्गत तीन स्वतंत्र, परंतु परस्पर समन्वय राहील अशा परिषदांची व्यवस्था करण्यात येईल. त्यामुळे उच्च शिक्षण अधिक प्रभावी आणि परिणामकारक होईल.




**१. विकसित भारत शिक्षा विनियमन- परिषद-** जी उच्च शिक्षण नियामक संस्थेच्या रूपात कार्य करेल. संस्थानांमध्ये पारदर्शकता, आर्थिक शुचिता, सुशासन, तक्रार निवारण, अनावश्यक व्यावसायिकरणावर अंकुश ठेवून योग्य संस्थांना पदवी प्रदान करण्याची अनुमती देईल.

**२. विकसित भारत शिक्षा गुणवत्ता परिषद -** केवळ मान्यता आणि गुणवत्ता आश्वासनाशी संबंधित असेल. गुणवत्ता मूल्यांकन, परिणाम आधारित मानकांवर आधारित असेल. भवन, भूमी, फॅकल्टी संख्या अशा भौतिक संसाधनांवर आधारित नाही.

**३. विकसित भारत शिक्षा मानक परिषद -** शैक्षणिक मानक, पाठ्यक्रम ढाँचा, लर्निंग आऊटकम, क्रेडिट ट्रान्स्फर आणि योग्यता ढाँचा निर्धारण याकडे लक्ष देईल. या विधेयकानुसार शीर्ष स्थानी 'विकसित भारत शिक्षा अधिष्ठान' हा आयोग असेल.

आयोगाचा एक अध्यक्ष आणि १२ सदस्य असतील. तिन्ही परिषदांचे अध्यक्ष पदसिद्ध सदस्य असती. शिक्षण मंत्रालयाचे सचिव, राज्य उच्च शिक्षण संस्थानांचे दोन वरिष्ठ शिक्षण तज्ज्ञ, पाच प्रतिष्ठित विशेषज्ञ आणि एक सदस्य सचिव मिळून १३ जण त्यात असतील. उच्च शिक्षणाचं मूल्यांकन इनपुट आधारित न राहता, परिणाम आधारित असेल. पूर्व वर्गाचा आकार, इमारत, फॅकल्टी संख्या या गोष्टींना अधिक महत्त्व होतं. आता शैक्षणिक परिणाम, प्रशासन, गुणवत्ता, वित्तीय पारदर्शकता आणि सामाजिक प्रभाव यांना प्राधान्य देण्यात येईल. संस्थागत विकास योजना सार्वजनिक करणे, सर्व संस्थांनाच बंधनकारक राहील. हळूहळू संबंधता प्रणाली संपवून स्वायत्त, बहुविषयक आणि पदवी प्रदान करणाऱ्या महाविद्यालयाला प्रोत्साहन लाभेल. त्यामुळे विश्वविद्यालयांचं प्रशासनिक ओझं कमी होऊन नवाचार, शोध आणि कौशल्य आधारित शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करता येईल. पारदर्शकता आणि जबाबदारी मजबूत करण्यासाठी, सर्व उच्च शिक्षण संस्थानांमध्ये ऑनलाईन सार्वजनिक प्रकटीकरण अनिवार्य असेल.

वित्त, ऑडिट, पाठ्यक्रम, फॅकल्टी मान्यता आणि शैक्षणिक परिणाम अंतर्भूत आहेत. नियमभंग झाल्यास आर्थिक दंड, पदवी अधिकार परत घेणे, संस्थान बंद करणे, अशी तरतूद कायद्यात आहे. वर्तमान स्थितीत 'युजीसी', 'एआयटीसी', 'एनसीटीई', 'एएनसी' यांच्या भूमिका, ओव्हरलॅपिंग आणि अत्यंतिक नियंत्रण ठेवणाऱ्या असल्याची टीका होत आली आहे. या संस्थानांचं स्वतंत्र अस्तित्व संपणार आहे.

नव्या रचनेप्रमाणे या त्रुटी दूर करत नियमन, गुणवत्ता आश्वासन, मानक निर्धारण स्पष्ट रूपात वेगळं करत, निरीक्षणआधारित नियंत्रण कमी करणारी परिणामआधारित स्वायत्तता देण्याची गरज अधोरेखित केली आहे.

**विकसित भारत शिक्षण अधिष्ठान (आयोग)-** भारतीय शिक्षण उच्च शिक्षणाला नियंत्रणाकडून विश्वासाकडे, प्रक्रियेकडून परिणामांकडे नेणारा एक सशक्त प्रयत्न आहे. या विधेयकाचा प्रभाव केवळ प्रमुख संस्थानांपुरता सीमित नाही.

केंद्रीय, राज्य, खासगी विश्वविद्यालये, डीम्ड युनिव्हर्सिटी, स्वायत्त महाविद्यालये, तंत्रज्ञान संस्था, शिक्षण प्रशिक्षण संस्था, मुक्त आणि ऑनलाईन शिक्षण प्रदान करणाऱ्या संस्था आणि भारतात कार्यरत विदेशी विश्वविद्यालयांनाही लागू आहे.

भविष्यात कोणत्याही उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेण्यापूव, विद्यार्थ्यांनी पूर्ण माहिती करून घेणे आवश्यक आहे. विद्यापिठाची मान्यता, डोमेन, शुल्क घेण्याची पद्धत, माहितीपत्रक (ब्रोशर), मान्यतापत्र (अप्रूवल लेटर), नॅक ग्रेड आणि सरकारी सर्टिफिकेट यांची खात्री करून घेतल्याशिवाय प्रवेश घेऊ नये, असा सल्ला विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. पदवी प्राप्त करत असताना विद्यापीठांना मान्यता असेल, तर घाबरण्याचे कारण नाही. संस्थानाची मान्यता नंतर रद्द झाली असेल, तरीही घाबरण्याचे कारण नाही. अनिधिकृत, बेकायदेशीर चालणाऱ्या संस्थांना दहा लाख ते दोन कोटी रुपयांचा दंड ठोठावण्याचा आणि संस्था बंद करण्याचा अधिकारही आयोगाला असणार आहे. विधेयकानुसार येणाऱ्या नव्या आयोगाचे, नव्या रचनेचे स्वागत आहे.

---

**भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये कोणत्याही तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीला भारताने कधीही मान्यता दिलेली नव्हती आणि नाही, आजही हीच भूमिका कायम आहे. असे असतानाही काँग्रेसने अमेरिकी आणि चिनी नेत्यांच्या हवाल्याने यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे, हे राष्ट्रहितासाठी खचितच योग्य नाही.**



# संशयाची राजकीय पेरणी

परराष्ट्रकारण

**प्रतिनिधी**

भारत- पाकिस्तान संबंधांमध्ये कोणत्याही तिसऱ्या देशाच्या मध्यस्थीला भारताने कधीही मान्यता दिलेली नाही. भारताची ही भूमिका नवी नाही. भारताने ती स्पष्टपणे वेळोवेळी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरही मांडली. तरीही, आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर, काही देशांकडून अशा दाव्यांची पुनरावृत्ती होते की, त्यांनी भारत-पाकिस्तानमधील तणाव कमी केला किंवा थेट मध्यस्थी केली. अमेरिकेनंतर आता चीननेही असाच दावा केल्याने, हा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला. या पार्श्वभूमीवर भारताचे अधिकृत प्रत्युत्तर आणि देशांतर्गत राजकीय प्रतिक्रिया, विशेषतः काँग्रेसची भूमिका यांचे विलेषण आवश्यक असेच.

चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी नुकताच, चीनने भारत-पाकिस्तानसह जगातील अनेक संघर्ष थांबवण्यात यशस्वी मध्यस्थीचा दावा केला. चीनसारखा विस्तारवादी देश जो स्वतः सीमावाद, सामरिक दबाव आणि आंतरराष्ट्रीय नियमांच्या बाबतीत सातत्याने आक्रमक भूमिका घेतो, तोच आज स्वतःला जागतिक शांततेचा मध्यस्थ म्हणवतो हीच हास्यास्पद बाब. हा दावा भारताच्या सार्वभौम परराष्ट्र धोरणाला आव्हान देणाराच आहे. त्यामुळेच भारताने चीनला स्पष्टपणे सुनावले की, भारत-पाकिस्तान प्रश्नांमध्ये तिसऱ्या कोणत्याही पक्षाची मध्यस्थी भारताला मान्य नाही. भारत-पाक यांच्यातील सीमावाद असो, दहशतवादाचा मुद्दा असो किंवा युद्धविरामाचे करार असो, हे द्विपक्षीय चर्चेच्या चौकटीतच सोडवले जातील. हीच भारताची दीर्घकालीन भूमिका असून; 'शिमला करारा'पासून ते लाहोर घोषणेपर्यंत ती अधोरेखित करण्यात आली. काँग्रेसी नेते जयराम रमेश यांनी आता या मुद्द्यावर, थेट पंतप्रधानांकडूनच स्पष्टीकरणाची मागणी केली. त्यांचा दावा असा आहे की, ट्रम्प यांनी १० मे रोजी 'ऑपरेशन सिंदूर' थांबवण्यासाठी वैयक्तिकरित्या हस्तक्षेप केला, असे किमान सात देशांत, विविध व्यासपीठांवर ६५ वेळा सांगितले.

लोकशाहीव्यवस्थेत प्रश्न विचारणे, स्पष्टीकरण मागणे हा विरोधकांचा अधिकारच, यात शंका नाही. मात्र, या प्रकरणात काँग्रेसची भूमिका अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरते. तर भारत आणि पाकिस्तान युद्धात कोणतीही मध्यस्थी झाली नाही, भारताने सामरिक आणि राजनैतिक सामर्थ्यावरच परिस्थिती हाताळली, अशी अधिकृत भुमिका केंद्र सरकारने यापूव अनेकवेळा मांडली. काँग्रेस मात्र ट्रम्प यांच्या विधानांची मोजदाद करण्यातच अधिक रस दाखवताना दिसते. प्रत्यक्षात भारताने केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे जे नुकसान झाले, उद्ध्वस्त झालेले दहशतवादी तळ, तसेच भारताच्या सामरिक प्राबल्याची चर्चा अधिक महत्त्वाची ठरायला हवी. काँग्रेसला याचे योग्य भान आहे का? हा वेगळाच प्रश्न. ट्रम्प यांची विधाने ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, राजकीय शैलीची आणि आत्मप्रशंसक स्वभावाचीच परिणती आहेत, हे जगभरात सर्वांनाच माहीत आहे. अशा वेळी भारताच्या पंतप्रधानांनी प्रत्येक वेळी त्यांच्या प्रत्येक विधानांना उत्तर देणे किंवा त्यावर प्रतिक्रिया देणे, हे राजनैतिक परिपक्वतेला शोभणारे ठरेल का? भारताने अधिकृत माध्यमांतून आपली भूमिका स्पष्ट केली, एवढे पुरेसे मानले पाहिजे.

चीनचा दावा वेगळ्यासंदर्भात तपासून बघावा लागेल. चीन सध्या जागतिक पातळीवर स्वतःची प्रतिमा, एक जबाबदार महासत्ता म्हणून उभारण्याचा प्रयत्न करीत आहे. युक्रेन युद्ध, मध्य आशियातील संघर्ष, आफ्रिकेतील अस्थिरता अशा सर्व ठिकाणी चीन शांततेचा दूत असल्याचा दावा करतो. भारत-पाकिस्तानसारख्या संवेदनशील संघर्षातही स्वतःला मध्यस्थ म्हणून घेण्यामागे, चीनचा हेतू दक्षिण आशियातील प्रभाव वाढवण्याचा आहे. भारताने हा प्रयत्न ओळखूनच त्याला ठाम नकार दिला. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने घेतलेली भूमिका दुर्दैवीच म्हणावी लागेल. परराष्ट्र धोरणासारख्या संवेदनशील विषयावर राष्ट्रीय हिताला प्राधान्य देण्याऐवजी, सरकारला अडचणीत आणण्यासाठी विरोधकांनी आंतरराष्ट्रीय नेत्यांच्या विधानांचा आधार घेणे, हे भारताच्या भूमिकेला कमीपणा आणणारे ठरू शकते. चीन आणि पाकिस्तानसारख्या देशांना अंतर्गत राजकीय मतभेदांचा फायदा घेण्याची संधी देणे, हे अयोग्यच. याच संदर्भात सरकारने घेतलेला आणखी एक निर्णय महत्त्वाचा ठरतो. भारताने स्वस्त आयातीमुळे देशांतर्गत उद्योगांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी, काही स्टील उत्पादनांवर तीन वर्षांचा 'टॅरिफ' लावण्याचा निर्णय घेतला. याचा उद्देश मुख्यतः चीनमधून होणाऱ्या स्वस्त आयातीला आळा घालणे, हा आहे. चीनकडून येणाऱ्या स्वस्त उत्पादनांमुळे भारतीय उद्योगांचे नुकसान होणार असेल, तर त्याचा परिणाम दीर्घकालीन राष्ट्रीय सुरक्षेवरही होऊ शकतो. त्यामुळे व्यापार, उद्योग आणि परराष्ट्र धोरण हे एकमेकांपासून वेगळे नसल्याचे सरकारने यातून अधोरेखित केले. भारत-पाकिस्तान युद्ध रोखल्याचा दावा करणाऱ्या देशांना एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल की, सध्याचा भारत हा नवा भारत आहे. भारताची आर्थिक ताकद, लष्करी क्षमता आणि राजनैतिक आत्मविश्वास लक्षणीयरित्या वाढलेला आहे. कोणत्याही बाह्य दबावाखाली भारत आपल्या निर्णयांमध्ये बदल करेल, असा काळ केव्हाच संपुष्टात आला आहे. त्यामुळे चीन असो वा अमेरिका, अशा दाव्यांना भारताने ठाम नकार देणे हे राष्ट्रीय हिताचेही लक्षण. कोणी काय दावा केला हा प्रश्न नाही; तर भारताने काय साध्य केले? हा कळीचा मुद्दा आहे. भारताने आपल्या सीमांचे संरक्षण केले, दहशतवादाला चोख प्रत्युत्तर दिले आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली भूमिका स्पष्ट ठेवली. विरोधकांनीही याच मुद्द्यांवर सरकारला जाब विचारावा, धोरणांवर चर्चा करावी मात्र, विदेशी नेत्यांच्या विधानांवरून देशांतर्गत राजकारण तापवणे, सातत्याने संशय घेणे हे भारताच्या दीर्घकालीन हिताचे नाही.

भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये मध्यस्थी नको, ही भूमिका जितकी सरकारची आहे, तितकीच ती देशाचीही आहे. त्या भूमिकेला कमीपणा आणणारे कोणतेही दावे, मग ते विदेशातून असोत वा देशांतर्गत राजकारणातून, ते ठामपणे फेटाळलेच गेले पाहिजेत.

---

कथा

**प्रा. कमलाकर हणवन्त**

# इसवास

कारली लहानचुकलं गाव. सात-आठसे लोकवस्तीच. भिम्याचे घर म्हंजे काट्यातुराट्याचे कुडं, वरतुन चार-पाच टीन टाकले. भिम्याचे माय-बाप लहानपनीच देवाघरी गेलेले. थ्यो दिवसभर रानात जाये, काड्या-कुड्या जमा करे. सांजच्या पायरी मोई बांधे. बाजारात जाये. मोई विकून घरी येई. जेवला का त्यो वाकयीवरच आंग टाके, खाली लवंडला का थकल्या भागल्या भिम्याले पटकन झोप लागे. भिम्या सभावानं बी गरीब गाईसारका व्हता. कोनाच्या अधे ना मधे. आपलं काम भलं आन आपुन. थ्यो गाववाल्यासी कामा पुरताच बोले. नाहकच्या भानगडीत पडत नोता. तेला- बीडीकाडीचं कोनतंबी यसन नोतं. थेचा कवडीएवढाबी गाववाल्याले तरास नोता, मातर थ्यो मेनघुन्या सभावाचा नोता. सदा हसे. हसत बोले. असे दिस मागे पडत भिम्या लहानाचा मोठा झालता. तीसरीत शाया सोडून कामाले जात व्होता तोपावतर दारोदार भटकत व्हता. भाकर तुकड्याचे थ्ये दीस मांग सरले व्हते. झोडग्याला राहात व्हती, थ्या बायजेले किती दिसापासुन थ्यो पाहत व्हता. तीच्यासी लगन व्हावं, असं तेला वाटे. त्येनं एक दिस राम्या बुड्याले समदी हकिगत सांगतली आन राम्या बुड्याले घेवून थ्यो बायजेच्या घरी गेलता. बायजेच्या घरी गेल्या बरुबर थ्येच्या बाले भेटला. राम्या बुड्याने थ्यिच्या बाला भिम्याच्या गरीबीपासून समद सांगतलं. बुड्यानं लय लय तारीफ केलती. भिम्या किती गुनाचं थेबी बुड्यानं सांगतलं व्हत. बायजेच्या बानं बी मागचा-म्होरचा इचार आन चिन्ता न करता भिम्याचे लगन बायजेसी लावून देल्ल. बायजा आन भिम्याचे लगन झाल्या दिसापासून भिम्या आन बायजा लई खुस व्हते. देवाने आपला जनम व्हायाच्या अगुदर आपलं दोघाचंबी लगन व्हावं असं देवाले बी वाटे. तवापासनं थे दोघंबी गुन्या गोविंदाने एक एका दिसाले सामोरी जाये. भिम्याचा सभावबी साजरा व्हता. बायजा त्याच्याहुन साजरी व्हती. सुकात आन मजेत दिसा माग दिस सरत असतानी त्यायच्या लगनाले चार-पाच वरीस झाले. काई दिसानं बायजेला दिवस गेले, मंग काय भिम्या त बायजेले कोनतबी अधिकच काम करु देत नोता. हसत लाडीगुडीने बोलत संसाराचा गाडा म्होरं ओडत व्हता. असातच बायजेले पोरग झालं. पोराचं नाव महादेव ठिवलं. पर सबन जन त्याले महादू नाईत माहाद्या म्हनत व्हते. माहाद्या कायासावया व्हता. थ्यो सात वरसाचा झालता, तरीबी बायजेले दुसरं लेकरु झालं नोत.

माहादू पाचवीत सीकत होता, तवा त्येचा सायेत दूसरा-तीसरा नम्बर व्होता. माहादू दिसायले कायासावया असला, तरी सभावानं बी साजरा व्हता. कोनासी बी आपुनहून अघय पगय बोले. दोन-चारात साजरा दिसे. लय देकना नोता. नाकी डोई चरचर, सभावानं बी बेस होता. बोलका राघो नोता थ्यो, तरी बी त्याच्यासी कोनी बोल्लं का थ्यो मन मोकया बोले. तेच्यासी बोलणारा खूस आन तो बी खूस व्हायचा. त्याले आपली परीतीथी मालूम व्हती. तोबी कामापुरताच बोले. लहान असूनबी मोट्या मानसापरमाने वागे. म्हुनसान तो लहानग्यात लहान, मोट्यात मोठा परमान वागे. एकदा काय झालतं, माहादू खेयता खेयता गड्यात पल्ला, ते गालवाल्या पाटलानं पायल व्हतं, त्याले गावच्या सेठच्या पोराने ढकलून देलं. पन माहादूनं म्याच गड्यात पडल्लो. ईतका थ्यो समजुतदार व्हता म्हुनसान गाववाले माहादुले जीव लाये. सायेची दोन दिसासाटी मुलाची ट्रीप बाहेरगावी जानार व्हती. माहाद्याला गाववाल्यानं पीरमापोटी जाले भाग पाल्ल. माहाद्याले वाटे की जाउ नोये. माहाद्याने भिम्याला आन बायजेले इचारल. 'अबे, माहाद्या गाववाल्यानी तुले पिरमान परवानगी देल्ली. तू आमची कायजी करु नग. मस्तपैकी मजा कर. दोन दिसानं परत येसील ना बे माहावाल्या राजा! गेला नाई त गाववाले नाराज व्हतील ना!'' कवापासनं आसुसलेली बायजा मन्ली, ''माहाद्या आम्ही मन्तो म्हून गेला नाई त चालल्ल असतं, तुले गाववाले जा म्हते त आता तुले जालेच पायजे. गाववाल्याचा तुले मान ठेवालेच पायजे.'' माहाद्याले मायबाने समज देल्यान थ्यो ट्रिपले जाले राजी झाला. माहाद्या आलाता ट्रिपवरून घरी आलता तवा बा ले एकला बघून नाराज बी झालता. पर थ्यो बाले काई बोल्ला नाई ''बा, गुरुजीनं सांगतलेली कवीता म्या तुले म्हुन दखोतो. माहावाल्या गुरुजीने केलती सायेत. थ्ये मराठीत शिकोते पर तुले. समजली पायजे.''

''न समजाले काय झाल मले?'' ''बर, ऐक, गुरुजीच्या भाषेत हाये...'इवलुशा पणतीचा पसरतो घरभर प्रकाश, आन अंधारावर करते मात. तिला असते प्रकाशाची साथ!' आन पुडं गुरुजी मन्ले 'जेव्हा वीजेरी दिवे होतात गुल तेव्हा घरातल्याचा होत असतो शुळ वीजेरी दिव्याची केली जाते विनवणी तेव्हाच आठवण होते पणतीची...''''पुड ऐक बा... 'या संघर्षात प्रश्न पडतो कोण लहान कोण मोठा काहीही म्हणा आणिबाणीत असतो पणतीलाच मान!' बा, माह्या गुरुजीची कविता तुले समजली का नाही?'' ''मले समजली बे! मुनशान तूले धाडलं व्हत ना ट्रिपले. माहाद्या, समद एकाच दिसी सांगू नोको, आता झोप. उद्याले काई सांगजो.'' सकाळी भिम्या बाजीवर उठुन बसला. थंडीगार हवा अंगाले झोंबत व्हती. माहाद्या बाजीवर नीजुनच व्हता. त्येच्या अंगावरची खालची पडेल वाकय भिम्याने माहादूच्या अंगावर टाकली...